१९८
. ग्रं. सं. ठाणे
२५३
१०९५

(...णी मधुकर.)

महाभारतांतील नायिका

# सती द्रौपदी.

(...तिहासिक साध्वी चरित्र)

(...दर्भ.)

REFBK-0000992

...आ वाद्र पेश आपले
म हरन्द छापखान्यांत छापून
...

# अनुक्रमणिका.


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १ जन्मकथा | १ |
| २ [illegible]त्यासाठीं. | ६ |
| ३ स्वयंवर. | ११ |
| ४ सासरीं. | १६ |
| ५ राजसूय. | [illegible] |
| ६ द्यूत. | २६ |
| ७ कौरव सभेंत. | ३२ |
| ८ न्याय कीं अन्याय ? | ३६ |
| ९ वस्त्र हरण. | ४१ |
| १० वनवास. | ४८ |
| ११ दुर्वास भोजन. | ५२ |
| १२ तीर्थयात्रा. | ५६ |
| १३ जयद्रथाची फजिती. | ६२ |
| १४ विराटाच्या घरीं. | ६७ |
| १५ कीचकाकडे. | ७३ |
| १६ खलबत. | ७८ |
| १७ कीचकवध. | ८३ |
| १८ गोग्रहणादि. | ८९ |
| १९ पुढें काय ? | ९५ |
| २० रणभूमीवर. | १०२ |
| २१ छापा. | ११० |
| २२ भेटी. | ११५ |
| २३ निष्कंटक व्यवहार सुख. | १२० |


वा. क. ९९२

REFBK-0000992

# प्रस्तावना.

सुकृतपूर्ण, उदात्त, नीतिरम्य अशा या अद्भुत पौराणिक साध्वी चरित्रांत, वास्तवीक माझें असें कांहीच नाहीं. महामुनि व्यास प्रणीत महाभारतांतलि भारतीय मूळ कथेंत सूत्ररूपानें ग्रथित झालेलें दिव्य द्रौपदी चरित्र, पांडवप्रतापा सारख्या प्रासादिक मराठी ग्रंथांतून वाचीत असतां, प्रसंगोपात्त आधुनिक वाचनाभिरुची वाङ्मय कादंबरी पानाची हौस, साफल्यें करून पूर्ण झाल्याचा मला स्फूर्तिदायक प्रत्यय आल्यावरून, तोच नवलकथा भाग एकत्र करून हें चरित्र लिहिण्याचा अल्प प्रयत्न मजकरवीं त्याचे [illegible]श-स्फूर्तीनें आज तडीस नेली आहे. जुनी गोष्ट कांहींशा नव्या आवडीच्या चटकदार भाषेंत लिहिण्याची, माझ्या योग्यते बाहेरचें ही एक छोटी खटपट आहे. ती कितपत साधली आहे, हें रसिक बंधुभगिनी वाचक, सहृदयतेनें पाहतीलच. मूळच्या सर्वांगसुंदर गुण पूर्ण चरित्रास प्रचलित भाषेचा, थोड्या नव्या तऱ्हेचा पेहेराव चढवितांना जे लेखनदोष घडले असतील, ते माझे आहेत. जुन्याला नव्या रूपांत नटविण्यानें तरी, नवी कादंबरी म्हणून, जुनें पूर्वार्जित अमृत पिण्याची संवय लागल्यास, तें एक वाङ्मय कार्यच होईल, एवढ्याच दृष्टीनें वाचकांनीं मला माझ्या दोषांबद्दल क्षमा करावी.

इंदुवार
विजयादशमी
शके १८३६.

" दर्भ "

# महाभारताची नायिका.

## प्रकरण पहिलें.

### ( जन्मकथा. )

गुरुद्रोणाचार्य हे अग्निवेशासारख्या तेजस्वी ऋषीश्वरापाशीं धनुर्वेदादि पुरुषार्थ विद्या शिकले होते परम प्रतापी प्रत्यक्ष परशुरामानें, त्यांना संपूर्ण अस्त्रविद्या दिली होती, शारद्वती सारखी सुशील गृहिणी जोडली होती, तिच्या पोटीं शंकरासारखा निधडा वीर अश्वत्थामा जन्मास आला होता, पण असल्या अमृतमय गृहस्था-श्रमीं सुखनिधींत, दारिद्र्याचें मीठ पडल्यामुळें व्यव-हारतः प्रपंच समुद्र दुस्तर भासू लागला होता. शेजारच्या भाग्यवंताची मुलें सुवर्ण पात्रांतून दूध पितांना पाहून गरीबीची कल्पना नसणाऱ्या ल्हा-नग्या द्रोणपुत्रानें दुधाचा हट्ट घेतला असल्यास, त्यांत नवल तें काय ? मुलाला पिठाचें पांढरें पाणी देऊन, असला हट्टपुरविणारीं भाग्यहीन आईबापें, या दुनि-येंत काय थोडीं थोडकीं आहेत ? अशाच तऱ्हेचा खडतर प्रसंग, गुरुद्रोणावर बेतल्यामुळें अशाच तऱ्हेनें मुलाची समजूतही खोट्या दुग्ध-पानाच्या फसव्या आनंदानें पटली खरी, पण मुलाचें हें अकृत्रिम समाधान दरिद्रतेच्या कृत्रिमानें घर केलेल्या मातापितरांच्या प्रेमी हृदयास झोंबल्या शिवाय राहिलें नाहीं ! लेकराच्या निसर्ग मधुर हास्य लहरींत द्रोणमहारा-जांना दारिद्र्याची भीषणता भासली, व त्यामुळें त्यानीं, दुःखपुर्ण लांब सुस्कारा सोडून, ह्मटलें " शिव. शिव ! परमेश्वरा, हालअपेष्टांत बायकामुलांना, कष्ट देण्यासाठींच कां तूं मला अकिंचन स्थितींत या प्रपंचांत घातलेंस ?

[illegible] बालमित्र द्रुपद, अग्निवेशाच्या आश्रमांत मजबरोबर धनुर्वे

पढत होता. तो आतां पित्यामागें पांचाल देशाचा राजा झाला आहे. तो मला खचीत विसरला नसेल. तेव्हां त्याच्याकडे जाऊन आपण आपल्या बाळाला, दुधासाठीं म्हणून एखादी गाय तरी मागूं ”

भिकमागयाचें भिकमागे बेत अमलांत येण्यास कितीसा उशीर ? पांचालपुरांत दरबारीं जाऊन, मोठ्या सौजन्यानें द्रोणांनीं आपली लहानपणची ओळख, द्रुपदराजाला सांगितली; पण ऐश्वर्य मदाच्या धुंदींत राजानें त्याला ओळखलें नाहीं एवढेंच नव्हे, तर राज्याधिपतीला गुरुबंधु मानणाऱ्या भिकारड्या भटाची निर्भर्त्सना करून नृपश्रेष्ठाची अशी बेअदबी करण्यास राजसभेंत यापुढें क्षणभरही न राहण्याविषयीं त्या दरिद्री द्रोणाला, धमकीच्या सुरांत बजावण्यासही द्रुपदराजानें कमी केलें नाहीं अपमान ! अनपेक्षित अपमान !! दारिद्र्याचे चटके असह्य करणारा अपमान !!! आणि तोही क्षात्रविद्या विशारद मानधनतपोनिधी द्रोणासारख्याचा, भरसभेंत मदोन्मत्तपणें झालेला मानपान ! मग तो त्या दरिद्री महापुरुषानें गुपचुप कसा गिळावा ? रागाच्या आवेशांत राजाला शिष्याकरवीं बांधून नेऊन त्याची घमेंड जिरविण्याची स्पष्ट प्रतिज्ञा द्रुपदराजाच्या तोंडावर बोलून दाखवून, द्रोणाचार्य विशाल विलिंद वृत्तींत झटकन् निघून तेथून चालता झाला.

लौकरच पुढें, त्यांना स्वत:च्या अंगाच्या अलौकीक गुणामुळें, गुणज्ञांची गांठपडून बरे दिवस आले; व मग दारिद्रहरण झालें. कौरव पांडवाचे गुरुत्व द्रोणाचार्यांकडे येऊन राजकुल विभूषित शिष्य मंडळी, धनुर्विद्येंत पारंगत झाली. प्राप्तविद्या सुफलित होण्यास गुरूला गुरूदक्षिणा देऊन संतुष्ट करावें लागतें. शिकलेल्या विद्येनें द्रुपदाला जिंकून त्याला आपल्यापुढें बांधून आणण्याचीच गुरुदक्षिणा, द्रोणगुरूंनीं शिष्यांना मागितली शिष्यवर अर्जुनानें ही कामगिरी फत्ते करून पांचाल देश काबीज केला; व योग्य मरातबानें उचितमान देऊन, द्रुपदाला गुरुमहाजापुढें आणून उभे केले. पराभूत द्रुपदराजा लज्जितपणें खालीं मान घालून उभा होता. द्रोणांनीं त्याला पूर्वीची ओळख देऊन म्हटलें, “ राजा मजसारखा दरिद्री ब्राह्मण व तुजसारखा राजानिंदासन भूषण, यांची गुरुगृहीं गुरुबंधूच्या नात

समतेंत मैत्री होणेंच शक्य नाहीं, असे ठासून ह्मणणारे तेच ना आपण ? द्रुपदानें अज्ञान तमांत आपल्या हातून तो प्रमाद घडला, असें कबूल करून ज्ञानवंतानीं तो अपराध पोटांत घालावा हेंच उचित अशी विनवणीही राजानें केली. ब्राह्मणाचा प्रेमनिर्भर सात्वीक राग, ओळख पटण्यापुरताच होता.

गुरुद्रोणांनीं लगेच द्रुपदाला आलिंगन देऊन सद्गदितपणें ह्मटलें, तुह्मीआह्मी गुरुवर्य अग्निवेशाच्या आश्रमांतले बाळपणचे दोस्त. ते निर्व्याज आनंदाचे दिवस, मला अजून ताजेपणानें आठवतात. बाबा, लक्ष्मीच्या दुपारच्या सावलीनें असा उद्दाम होऊन आपल्या गरीब बाळमित्राला विसरूं नकोस. आतां शिष्या करवीं तुझें जिंकलेलें राज्य अर्धें मी तुला परत देतों खुशाल तेथें राज्य कर. मजबद्दलचा वृथाद्वेशभाव पार सोडून दे, आणि सुखानें नांद. " अशा गौरवानें द्रुपदराजाचा मोठा सन्मान करून द्रोणानें त्याला स्वनगरीप्रत पाठविलें. पण द्रोणापुढें लाचारपणें खालीं मान घालण्यांत द्रुपदाचा झालला मान भंग, ह्मणजे कांहीं भणगभिकाऱ्याचा किंवा भटा भिक्षूकांचा झालेला सात्वीक अपमान नव्हे. की, जो येन केन प्रकारेण, भरून निघेल ! दंश धरणाऱ्या महा भुजंगाच्या शेपटीवर–नव्हे–तोंडावर, मुद्दाम लत्ताप्रहार केल्यासारखा झालेला हा राजकीय अपमान ! त्याचा उपशम सत्वसंशुद्ध उपायानीं कसा व्हावा ? रजोगुण संमर्दित महाभयंकर सुडाच्या कल्पनेंत, या खंडनचें पर्यवसान झालें, व द्रोणाचा नाश करणारा अयोनिसंभव कुमारनिर्माण करण्यासाटीं खडतर तपश्चर्या करून वेळीं अर्पणावरही प्रसन्न करून, घेण्याची विलक्षण प्रतिज्ञा राजा द्रुपदानें केली.

असला रजो गुणी वैराग्नी पोटांत भडकत राहिल्यानें राजाला घरदारगोड लागेना, अन्नपाणी रुचेना, अर्थात चैन ह्मणून पडेना, त्यानें रान घेतलें. आपलें इच्छित कसें साधेल, हा एकच विचार सारखा डोक्यांत घोळत होता. जातांजातां गंगेच्या कांठीं तो शांत व रम्य अशा एका आल्हादप्रद ऋषीच्या आश्रमापाशीं गेला. तेथची तपोनिष्ठ उपशम वृत्तीची ऋषी

मंडळी पाहून राजाला फार बरें वाटलें; पण त्यांतल्या त्यांत याज व उपयाज या नांवाच्या बंधुद्वय ऋषींचें अगाध तपस्तेज पाहून द्रुपदराजा आश्चर्यचकित झाला. तपसामर्थ्यांच्या बळावर ज्याच्या विषादानें ब्रह्मांडाचीही होळी होईल, किंवा संतोषानें इंद्राचें इंद्रपद अनायासें मिळेल, व जेथें ऋद्धीसिद्धी हात जोडून उभ्या आहेत, अशा मूर्तिमंत तपःसिद्धी सिद्धापुढें इच्छित हेतु मनांत धरून, द्रुपदराजानें अनन्य प्रणिपात केला. द्विजश्रेष्ठ उपयाजथाणें राजाला " काय इच्छा आहे ? " म्हणून विचारतांच, बद्धांजलीनें करद्वय जोडून, परम नम्रतेनें द्रुपद म्हणाला, " महाराज, पोटीं संतान नाहीं तरी, झालेल्या माझ्या अपमानाचा सूड घेउन कौरव-पांडवांचे गुरु द्रोणाचार्य, यांना समरभूमीवर ठार करील असा महान पराक्रमी अयोनीजन्मकुमार, मला आपल्या कृपेनें प्राप्त व्हावा, व ज्याच्या धर्मनितीनिबद्ध, अलैकिक, युद्धनिपुण, विजयानें पराजित स्थितींतहि मला धन्यताच घाटली, त्या धनंजय वीराला मोठ्या हौसेनें, स्वतःचा जामात जोडण्या सारखी, व जिच्या तुलनेला उमा रमाहि कमीच पडतील अशी लावण्यवती परमसद्गुण सुंदर कन्याही, आपल्याच आशिर्वादानें मला लाभावी अशी फारफार इच्छा आहे. "

पुण्यपावन अशा त्या ऋषींच्या आश्रमांत एकवर्षपर्यंत, द्रुपदराजा, एकनिष्ठेनें त्याउभयता ब्रह्मनिष्ठ मुनिवर्यांची अविश्रांत सेवा करीत राहिला. तेव्हां ते प्रसन्न झाले, व आपल्या जिव्हाग्रीं बसलेली सिद्धि, शुभवाणीनें प्रगट करूनच कीं काय राजाला ' इच्छित दिलें ' असें म्हणाले. राजाला परमानंद झाला. आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें त्यासवाटून त्याचें सारे शीण हरण झाले. यज्ञासाठीं त्यानें सर्व सामग्रीसह पांचालपुराहून, ऋषिआज्ञेनें, आपल्या स्त्रीला तेथें आणलें, उपयाज ऋषी हवनद्रव्यें मंत्रासिद्ध करीत होते. व याजमहाराज स्वतः हवन करीत होते. पूर्णाहुती पडतांच अग्निकुंडांतून, देदीप्यमान कुमार धृष्टद्युम्न प्रकट झाला, व त्याचक्षणीं वेदीन प्रत्यक्ष दिव्यशक्तीच एकाएकीं सुंदर कुमारी रूपानें जन्मास आली. तीच चरित्र नायिका याज्ञसेनी " द्रुपदकन्या द्रौपदी होय.

याज्ञसेनीचें असंभाव्य तेज, शांत व शीतल असून, तें आकाशासारखें श्यामल होतें. जणू इंद्रनील मण्याचा रस करून त्याचीहि कृष्णमय मूर्ती ओतली होती. तिची रेखल्यासारखी स्वरूप ठेवण स्वर्गीच्या दिव्यांगनानांहि उणपणा आणण्यासारखी नयनमनोहर व चित्तमधूर होती. नवविकसित मृदुनील कमलासारख्या तिच्या सुहास्यवदनांत, दंतपंक्ती हिऱ्यासारख्या झळकत होत्या. प्रसन्न चित्त करणाऱ्या तिच्या निश्वास सुवासाला लुब्ध होऊनच कीं काय, सभाग्य कुरळ केशाच्या रूपानें, काळेभोर भृंगेच तिच्या गोजिरवाण्या मस्तकावर मिलिंदायमान झाल्याचा भास होई. अशी सुरम्य बाळा अवतरलेली पाहून चिदाकाशांत हर्ष लहरी आंदोलित झाल्या व भवितव्यता वाणी स्फुरण पावली कीं, ही कुमारी सकल स्त्रियांची स्वामिणी जन्मास आली आहे, पंचभूताशींहि न्यायाच्या स्वबळानें झुंजणारे प्रज्ञावंत पंचवीर हि वरील, हिला प्रत्यक्ष परमेश्वर सहाय्य होईल, व क्षत्रियत्वाची फाजिल माजलेली रग, संरक्षक न होतां, उलट संहारक झाल्यामुळें, हिच्यानिमित्तानें तिचा नाश होऊन, भूभार हलका होईल; तिचा भाऊ धृष्टद्युम्न समरांगणीं द्रोणाचा अंत करील. द्रोणवधाच्या जळजळीत हृद्गताशीं तादात्म पावणारा असला अदृष्ट ध्वनि ऐकून, द्रुपदाच्या मनाची तळमळ शांत झाली. याज-उपयाजांना अत्यंत औदार्यानें पूर्ण संतुष्ट करून पत्नी समवेत नूतन प्राप्त कुमार कुमारी बरोबर घेऊन तो भाग्यशाली नृपति द्रुपद, आपल्या नगरास परत आला.

# प्रकरण २ रें.

## वर शोधनासाठीं.

द्रुपदकन्या द्रौपदी मातापितरांना, आपल्या निर्हेतुक गोड बाळ लिलांनीं, आनंद देतदेत, मोठी होऊं लागली. जसजशी ती नेणतशाची जाणती होऊं लागली, तसतशी ती सरभरीतपणें अधिकच लावण्यसुंदर व गुणमधूर होत चालली. मुलीच्या वयाबरोबरच, तिला अनुरूप वर पाहण्याची आईबापाची चिंता वाढत असते. ईश्वरी वरप्रसादानें प्राप्त झालेली प्रियकर कन्या द्रौपदी अर्जुन वीराला अर्पण करण्याचा संकल्प, तिच्या जन्मकरणांतच द्रुपदानें योजिला असल्यामुळें, स्थळ हुडकण्याच्या या बाबतींत, राजा बराच निर्धास्त होता. पण कन्येसाठीं वर-शोधनाच्या कामीं, असला ठामपणा विवाह-समारंभाला कदाचित् स्थळांच्या मानहीन पायपिटीच्या उद्वेगजनक अनुभवांतील खारट तुरट पाण्याची चव आणीत नसेल म्हणूनच कीं काय एकटा अर्जुनच नव्हे, तर पांची पांडव व सहावी कुंती, अशीं वारुणावतीला कौरवांच्या कपटरचित लाक्षागृहांत जळून दग्ध झाल्याची दुःखःवार्ता, राजाच्या कानीं पडल्यापासून, त्याला चैन पडेनासें झालें होतें. द्रौपदी अर्जुनालाच द्यावी, असा राजाचा पूर्ण मनोदय खरा पण आतां अर्जुन नष्ट झाल्याच्या वार्तेनें मनांतला बेत जागच्याजागींच ठेवणें भाग झालें; व यामुळें आतां द्रौपदी सारख्या अद्वितीय रत्नाचें पाणी-ग्रहण करणारा योग्य वर, साऱ्या दुनयेंत तरी मिळेल कीं नाहीं, अशातऱ्हेची काळजी द्रुपदाला सारखी लागून राहिली. मधून मधून लाक्षागृहाच्या जोहरांतूनही, श्रीकृष्णकृपेनें पांडव सुरक्षितपणें जिवंत राहून, गुप्त रुपानें वनवासी वृत्तींत, भटकत आहेत, अशा अर्थाच्या आशाजनक पण निराधार वार्ताहि, राजाच्या कानावर आल्या शिवाय राहिल्या नाहींत. यामुळें राजाच्या वृत्तींतही संशयानें घरसोड होई. अर्जुन जिवंत असून, द्रौपदी दुसऱ्याला अर्पण करण्याची कल्पनाच द्रुपदाला असह्य वाटत असे.

द्रौपदी तर उपवर झाली. तिच्या रूपगुणाला भुलून, मोठमोठ्या राजांनी तिला मागणीही घालण्यास कमी केलें नाही. द्रुपदाला मोठा विचार पडला. सिंहाचा भाग उपटसुंब कोल्ह्याला मिळूं नये म्हणून, खऱ्या पराक्रमाची परिक्षा पाहून, सत्वाला टिकणाऱ्या प्रतापी वीरालाच, असलें कन्यारत्न अर्पण करण्याच्या हेतूनें द्रुपदानें मत्स्ययंत्र भेदाचा कठीण पण लावून द्रौपदीचें स्वयंवर मांडलें. देशोदेशाच्या श्रीमंत, धीमंत प्रतापवंत राजांना अत्यादर पूर्वक आमंत्रण पत्रिका रवाना झाल्या. येणाऱ्या पाहुणे मंडळीसाठीं, ज्याच्यात्याच्या योग्यते नुरूप, शिबिरें बांधण्याची धांदल, पांचालपूर शहरभर मोरवी उडून राहिली. नोकर चाकरांना कामाची गर्दी होऊन गेली. स्वयंवरासाठीं भव्य व विस्तीर्ण असा ऐश्वर्यमंडीत शृंगारमंडप जरूरीच्या सर्व सोईसह, व्यवस्थितपणें उभारण्यांत आला. हा स्वयंवर समारंभ पाहण्यासाठी, लांब लांबचे लोक येऊन, गावांत दाटी होऊं लागली. एवढ्या मोठ्या स्वयंवर प्रसंगीं दानधर्मही अगणित होईल अशा मनकामनेनें, आपापलें दारिद्र हरण करून घेण्याचीही सुसंधी साधण्यासाठीं, भिक्षुकांच्या झुंडीच्या झुंडी पांचालपुराकडे लोटूं लागल्या. योजलेल्या या द्रौपदीस्वयंवराची माहिती जितकी आगाऊ आणि लांबवर पसरल, तितकी अधिक वीरमंडळी आपल्या कुशल शरसंधानाच्या विश्वासावर, मत्स्यभेद करण्यासाठीं पांचाल पुरास येऊन, स्वयंवराचा थाट विशेषच बहारीचा होईल, असें राजाला वाटत होतें. अंतस्थ हेतु हा कीं अशा वाजलेल्या गाजलेल्या प्रसिद्धीनें पृथ्वी तलावर पांडव जिवंत असल्यास, अज्ञातवासांतही ही बातमी त्यांच्या कानीं जावी व धनंजय वीरानें धनुर्धराच्या वीरश्रीनें स्वयंवराला येऊन खऱ्या शौर्यानें त्याचा भाग त्यानें जिंकून न्यावा. व आपल्याला कृतार्थ करावें, पण राजाची ही उत्कंठित मनीषा पूर्ण होण्याचा रंग दिसेना.

स्वयंवरासाठीं छप्पन देश, सप्तपुऱ्या, सप्तद्विपें इतक्या लांब लांबून लहान मोठे राजे महाराजे, जमूं लागले होते. पांचालपुराभोंवती अनेक कोस पर्यंत, सेनासमुह व श्रीमंती लवाजमा यांचे तळ पडले होते. ऐश्वर्य पूर्ण शिबिरें थाटलीं होतीं. त्यांचे सुवर्ण कळस झळकत होते. रथांचे ध्वज तळपत होते. भाग्यवंतांचा भाग्यपूर तेथें महासागरासारखा पसरला होता.

दुर्योधनादी सकल कौरव सेनेसह मोठ्यादिमाखानें आले होते. यादवांसह यदुपती श्रीकृष्णही समारंभ साजरा करण्यासाठा, येण्यास चुकला नव्हता. पण पांडवांची वार्ताही नसल्यामुळें, लाक्षागृहांतच ते अग्निमुखीं पडून दग्ध-झाले, हें स्पष्ट दिसणारें सत्य, भयप्रदपणें राजा द्रुपदाला पदोपदीं दुःखी करूं लागलें. आतां आपल्या लाडक्या द्रौपदीला मनासारखा नवरा कोण ज़ोडला जाणार, हेंच त्याला समजेना. त्या परम सुकुमार नवयौवन नील कमलिनीवर झेपावण्यासाठीं, अनेक मत्तभंग, तेथें उत्सुकतेनें जमले होते खरे, पण त्या पैकीं कोणता शीलवंत प्रतापचंद्र, आपल्या निर्दोषयशाच्या शुभ्र किरणांनीं नववधू नलिनीला प्रेमहृष्ट करून, प्रफुल्लतेनें हसवील, हेंच बिचाऱ्या राजाला अजमावतां येईना. जो तो मी मी म्हणून, मिशीला पीळ भरून, दंडच थोपटीत होता.

अशा रीतीनें पांचालपूर गजबजून गेलें होतें. सर्वत्र ऐश्वर्यमदाचा टेंभा पाजळलेला दिसत होता, म्हणून दीनहीन दुबळी दरिद्रता, तेथें नव्हती असें मात्र नाहीं, तर ऐश्वर्या बरोबरच अकिंचनताही. पै पैशाच्या, अन्न-सत्राच्या किंवा थोर दानधर्माच्या आशेनें तेथें जमली होती. देवळें, ओऱ्या, धर्मशाळा अशा सार्वजनिक धर्मादाय जागा, भटभिक्षुक, अतीथ अभ्यागत, तडीतापडी, बैरागी गोसावी, अशा सारख्यांनीं गच्च भरून गेल्या होत्या. शिवाय मोठमोठे विद्वान वैदिक ब्राह्मण, शास्त्रीमंडळी, अग्नी होत्री, तपस्वी ऋषी असा विशेष सन्माननीय विप्रसमूवही कांहीं थोडाथोडका जमा झाला नव्हता. स्वयंवर मंडपाच्या नगारखान्यांत कर्ण मधुर चौघडा झडत होता. सर्वत्र गुढ्या तोरणें उभारलीं होतीं. पुष्पमाला नक्षत्रासारख्या शोभत होत्या जो तो स्वयंवर उमेदवार, आपआपल्या परीनें ऐश्वर्य आणि सौंदर्य, यांचें डोळ्यांत भरणारें प्रदर्शन मांडल्याप्रमाणें, मोठ्याथाटानें मंडपांत येत होता. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें, आगत स्वागत होऊन, शिस्तीनें ठरविलेल्या जागेवर, जो तो अत्यादरांत स्थानापन्न होत होता. भिक्षुक मंडळी आप-आपल्या दर्जाप्रमाणें ब्रह्ममंडपांत बसवली जात होती. भणंग भिकाऱ्यापर्यंत सर्वांची दाद लागण्याची सोय झाली होती. लहानापासून थोरापर्यंत प्रत्ये-काची यथोचित वर्दी घेण्यांत वाह्य हेतु एवढाच की, एवढ्या मोठ्या समारंभांत

कोणासीही हेळसांड होऊं नये, व अंतस्थ इच्छा अशी कीं, द्रौपदी साठीं मनानें निश्चित केलेल्या श्रेष्ठवर अर्जुनाचा अगाऊ सुगावा लागल्यास ही पाहावा; दहादहा पांचापांचाच्या टोळ्यानीं, येणाऱ्या ब्राह्मणाच्या झुंडीतून वल्कलें, रुद्राक्ष, आजिन, आणि विभूती या मधूनही चमकणारा तेजाचे तेचा वन्हि, एखाद्या पांचाच्या टोळींत विशेष दीप्तिमंत दिसल्या शिवाय राहिला नाहीं, पण अर्जुना विषयी निराश होऊनच, द्रुपदराजाला धगधगीत मनानेंच स्वयंवर कार्याला सुरवात करणें प्राप्त झालें.

परम मंगलप्रद व लक्ष्मीकारक अशा छानदार सजविलेल्या हत्तिणीवर रत्नजडित डोल्हाऱ्यांत बसून द्रौपदी स्वयंवर मंडपांत आली. गांजलेल्या भूपमातेचा ताप हरण करून, तिला सुखी करण्यासाठींच अवतरलेल्या द्रौपदी-रूप जगन्मातेला आपल्या पाठीवर ऐश्वर्य मंडित शुभस्थान दिल्याबद्दल, त्या हत्तिणीला धन्यता वाटूनच कीं काय, चतुरस्रतेच्या बहुरंगी वेल पत्तीनें सुशोभित केलेली आपली सोंड चौरीसारखी सुखानंदांत हलवून ती हत्तीण संथिरतेनें मंदमंद डुलत होती. दासी चामरें ढाळीत होत्या. वेत्रपाणी सुवर्ण दंडानें पेस करीत होते नववधूच्या शांत व सुनील छटेच्या अंगकांतीनें राज, सभा दिपून थक्क झाली होती. तिच्या गौरवर्णांत मिसळलेली निळी झांक-फारच मोहक दिसत होती व ही कृष्णवर्ण समता द्रुपदकन्येला "कृष्णा" या नांवानें फारच अन्वर्थक शोभत होती. बहुमोल वस्त्रालंकारांना नवरीचा प्रमाणभूत रेखलेपणा मजेचा उठाव देत होता. तारुण्यबहारीची जरी एक विलक्षण चमक तेव्हां द्रौपदीच्या कमलनेत्रांत खुलत होती, तरी तिच्या काळ्याभोर डोळ्याचें नैसर्गिक शुद्ध तेज, खोट्या अंतःकरणाची गाळण उडवून वर डोळा न उचलूं देण्या इतकें विलक्षण सामर्थ्यवंत दिसत होतें. म्हणू-नच कीं काय, मंडपांत नवरीला पाहतांच पुष्कळांच्या माना, त्यांना स्वतःला नकळत, एकदम खालीं झाल्या होत्या! द्रौपदीच्या अंगाचा सद्गुणसुवास मंडपांत सद्भावनेनें दरवळून राहिला होता. तिनें आपली पुण्यदृष्टि एकवार जमलेल्या सभेवरून फिरविली. मग तिचा भाऊ धृष्टद्युम्न याणें स्वयंवरासाठीं आलेल्या राजांची यथाक्रम थोडक्यांत माहिती सांगून बहिणीला परिस्थितीची ओळख करून दिली.

नंतर स्वयंवर सभेला उद्देशून स्पष्टपणें धृष्टद्युम्न म्हणाला, " ऋषिगणादि परमपूज्य ब्रह्मवृंदहो, क्षात्रतेज विभूषित महावीरांनो आमच्या विनम्र आमंत्रणाचा अत्यादर करून आपण या समारंभास आला याबद्दल राजेश्वर द्रुपद-महाराजातर्फें मी आपले अनंत आभार मानतों. तसेंच आमचा वेडावाकडा पाहुणचार गोड करून घ्यावा, अशी विनंति आहे. स्वयंवरकार्यांत गुणज्ञपणें गुणपरीक्षा करूनच नवरीनें आपल्या जन्माचा सांगाती निश्चित करावा, या हेतूनें क्षात्रकर्म-रुचीला अनुसरून,खऱ्या वरशोधनासाठीं मत्स्ययंत्राची योजना करण्यांत आली आहे. हें प्रचंड लोहकोदंड चढवू , खालीं कढईतल्या तेलांत पाहून, वरतीं फिरणाऱ्या चक्ररंध्रांतून, पलीकडच्या मत्स्यनेत्राचा एकाच बाणानें जो अचुक भेद करील, त्याच भाग्यशाली वीर पुरुषाला ही राजकन्या द्रौपदी माळ घालील. " असला कठीण पण ऐकून जमलेल्या वीरमंडळीच्या तोंडचें पाणीच पळालें. रिकाम्या फक्कडांचे फक्कड बायको मिळविण्याचें फक्कड बेत, रिकामपणीं जागच्या जागींच थप्पड खाल्ल्याप्रमाणें जिरून गेले. अवजड लोहधनुष्य पाहून तर बिकट पण अधिकच अवघड वाटूं लागला. अहंमन्य वीर नुसते एकमेकांच्या तोंडाकडेच पाहात राहिले. मत्स्यवेध करण्यासाठीं कोणीच रणझुंझार पुढें होईना.



# प्रकरण ३ रें.

## स्वयंवर

विरांचें नांव राखण्यासाठी कौरवांतून कर्णवीर उठला. द्रौपदीला आपली पट्टराणी करण्याच्या इर्षेनें, त्यानें तें प्रचंड धनुष्य कसेंबसें गुडघ्यापर्यंत वर उचललें असेल नसेल तोंच जनक सभेंत उरावर शिवचाप घेऊन उताणा पडणाऱ्या रावणाची नक्कल करण्याचीच स्फूर्ति विनोदी कर्णाला झाली कीं काय कोण जाणें ! म्हणूनच वृक्ष उन्मळून पडल्याप्रमाणें धापा टाकीत कर्णानें रावणानुकरण केलें, व त्यामुळें मस्तकावरचा मुकूट उसळून भलतीकडेच जाऊन पडला ! कंठांतले रत्नहार तुटून, पदकें विस्कळीत झालीं, व घळघळणाऱ्या दीप्तिमंत मोत्यांतूनच कीं काय, हसणारांच्या दंतपंक्ति झळकल्यामुळें कौरवमंडळी खजील झाली ! जणुं या फजीतीवर कळस करण्यासाठींच द्रौपदी ठासून म्हणाली, " जातना गोत अशा या कुलहीन कर्णानें आतां फजीत पावुन, यंत्र भेद केला तरीही त्याला वरण्याची मला बिलकुल इच्छा नाहीं." असल्या अपमानानें लज्जित होऊन, कर्ण आपल्या जागेवर जाऊन, निमूटपणें खालीं पहात बसला. तेव्हां द्रुपदराजा गर्जुन उत्तेजित स्वरानें म्हणाला, " काय ? पृथ्वीतल निर्वीर्य झालें ! किंवा आजच भूमाता निःक्षत्रिय झाली ! समजावें तरी काय ?

इतक्यांत एखाद्या गिरिकंदरांतल्या गुहेंतून जसे खडबडून वनराज बाहेर पडावे त्याप्रमाणें ब्रह्मसभेंतून दोघेजण उठले. ते चंद्रसूर्यासारखे तेजस्वी दिसत होते. तिकडेच साऱ्यांचे चकित नेत्र गुंतून राहिले. दोघांपैकीं एकानें त्या धनुष्याला प्रदक्षिणा करून, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच तें उचलून त्याला प्रत्यंचा चढविली; व आपल्या हृदयस्थ जनार्दनाचें स्मरण करून जोडीदार पाठराखीत उभा असतां, अचुक नेम घेऊन एकाच बाणानें मत्स्याचा डोळा त्यानें उडवून दिला ! तत्क्षणीं सर्वत्र जयजयकार झाला. स्वर्गांतून पुष्पवृष्टि होऊं लागली. दुंदुभीनादानें अंबर दणाणून गेलें. हत्तिणीवरून सुहास्यवदन द्रौपदी खालीं उतरली, व तिनें आपल्या हातांतली दिव्य माळा

पण जिंकणाऱ्या त्या भटाच्या गळ्यांत घातली ! पण यामुळें पदरीं वीर्यहीनतेचा अपमान बांधून घेणारे घमेंडखोर कौरवादि दुर्जन खवळले. ते म्हणाले, "जर नजरबंदी हात चलाखीनें अगर एखादे वेळीं एखाद्याला चुकूनमाकून मत्स्यवेध साधला म्हणजे कांहीं तो अचुक शरसंधानी ठरला, असें खास नव्हे. म्हणून त्याला राजकन्या देणें म्हणजे आह्मां राजकुलवंतांचा भाग भणंगाला देऊन राजरोसपणें आमचीं मुद्दाम नाकें कापल्यासारखेंच अनिष्ट होय. याचें प्रायश्चित्त द्रुपद व धृष्टद्युम्न यांस दिलेंच पाहिजे." असें म्हणून दुष्ट उठले. पण या रणधुमाळींत त्याच विजयीजोडीनें द्रुपदातर्फे हाकार घेऊन एकानें धनुष्यबाणानें रिकाम्या वाचाळांना जर्जर करून सोडलें, तर दुसरा झाडें उपटून तीं केरसुणीसारखीं हातीं घेऊन, अन्यायानें उठलेल्या शत्रुसेना, मारे झोडीत सुटला ! एकंदरींत त्या जोडीनें तेथें कोणाचें कांहीं एक न चालूं देतां, नवरीवरील आपला हक्क, आपल्या अंगच्या पराक्रमानें प्रस्थापित केला.

यदुवीर कृष्ण त्या विजयी जोडीविषयीं हस्तसंकेतानें बळिरामाला कांहीं आनंदवार्ता सांगत होता. जमलेले देशोदेशीचे वीरही, इतका पराक्रम पांडवाशिवाय शक्य नव्हे असें ह्मणत होते. इकडे ती जोडी आपल्या तिघां सोबत्यांसह, द्रौपदीला बरोबर घेऊन आपल्या बिऱ्हाडाच्या जागीं एकीकडे कुंभारवाड्यांतल्या पडक्या धर्मशाळेंत निघून गेली. बाहेरूनच ते पांचही जण धर्मशाळेंत बिऱ्हाड राखीत बसलेल्या आपल्या आईला विजयानंदानें हांक मारून म्हणाले, "आई, आई, आज आम्ही छानदार भिक्षा आणली आहे. पाहिलीस कां ?" आईही आंतूनच प्रेमानें उत्तरली, "बाळानों फार बरं, सारखी वाटून घ्या ह्मणजे झालें !" असें बोलून उत्सुकतेनें ती ममताळू माता बाहेर येऊन पाहते तों याज्ञसेनी राजकन्या आणलेली ! यावर ती वीर माता उजगरून, पहिले आपले शब्द परत घेण्याच्या हेतूनें बोलली छे., नकळत मी जें कांहीं बोलल्यें तें बाळांनो, खरें धरूं नका. ही कांहीं पांचांनीं वाटून घेण्याची भिक्षा नव्हे. जन्मवेरी पुरणारी गृहस्थाश्रमाची ही सिद्धभिक्षा म्हणजेच गृहलक्ष्मी, ज्यानें वास्तविक पण जिंकून मिळविली त्याचीच शुभ वरी " पण प्रत्यक्ष पण जिंकणारा वीर रदबदलीनें ह्मणाला

" आई, तसें मुळींच होणार नाहीं. तुझ्या मुखांतून प्रथम निघालेली सहज प्रसादाची वचनोक्ति, केव्हांही असत्य होणें शक्यच नाहीं ! " इतक्यांत तेथें व्यास महाराजही प्रकट झाले, व त्यानीं ही पांचाली या पांडव पंचकाचीच असें त्या कुंतिसातेला सांगितलें. बळिरामासह कृष्ण परमात्माही त्याच वेळीं तेथें आला. त्या यदुवीरांनीं पितृभगिनी म्हणजेच आत्याबाई कुंतीला क्षेमालिंगन देऊन, पांडवांचें कुशलवृत्त श्रवण केलें, व भोगलेल्या क्लेशानंतर आतां ऐश्वर्याचे दिवस खास येतील, असें सांगून गुप्तरूपानें व्यासासह ते दोघे निघून गेले.

द्रौपदीला आपण कोणाच्या पदरीं पडलों हें समजून आनंद झाला. कृष्ण दर्शनानें तिला धन्यता वाटली. तिचा बाप द्रुपद मात्र, आपली लाडकी पोर, कोणत्या वाटच्या वाटसरानें जिंकून नेली हें न कळून, संशयांत पडल्यामुळे तळमळूं लागला पण धृष्टद्युम्नानें पांडवांच्या हालचालींवर गुप्त नजर ठेवण्यासाठीं, मुद्दाम योजलेल्या हेरांनीं, ते साऱ्यारात्रभर युद्धकथा वद्दलच वीरश्रीनें बोलत होते असें सांगून, खचीत ते महान् क्षत्रिय असावेत असा अदमास प्रकट करतांच द्रुपदाला अंमळ बरें वाटलें; व ते पांडवच असतील असेंही त्याच्या मनांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. मोठ्या सन्मानानें गौरवून, त्यांना त्या पडक्या ठिकाणांतून थाटानें राजवाड्यांत आणलें, व नम्रभावें राजानें त्यांचें कुलवृत्त विचारल्यावर, ते पांडवच असल्याबद्दल धर्ममुखानें द्रुपदाची खात्री पटली. मग तो इच्छित साधल्याचा आनंद काय विचारावा ? आपल्या मुलीनें आपल्या मनासारखेंच भाग्य काढून, तिला धनंजयासारखा वीरश्रेष्ठ पतिजोडला याबद्दल द्रुपदाला कृतार्थता वाटली. पण धर्मानें " जिंकलेली नवरी पांचाची " असें म्हणतांच द्रुपदराजा तुचकळ्यांत पडला. पांडवासारख्या पंचवीराची एक बायको द्रौपदी, हा जनरुढी विरहित विपरीत प्रकार राजाला समजेना. आपल्या जिवाची " एकुलीच लेक " याक्षरांनी म्हणजे " लाडकी बाळबाई " खरा, पण तिनें आपल्याला आणलें तीनशेसाठ नव्हे पण " पांच जावई ! " हा प्रकार द्रुपदाला हास्यास्पद रीतीनें कसासाच वाटला.

पांडवाविषयीं राजाला पूज्यभाव नें परम आदरच वाटत होता पण

नाहींतेंच करून एका मुलीचें पांच नवऱ्यांशीं लग्न कसें करून द्यावें, हें व राजाला कोडें पडलें. भक्ताचें सांकडें दूरकरण्यास सदा तत्पर असलेला श्रीकृष्ण-परमात्मा, व कृष्णद्वैपायन व्यास महाराज यानीं तेथें येऊन राजाचे समाधान केलें. व्यास म्हणाले " द्रौपदीनें पूर्वीं पतीसाठीं तप करून पंचवदन श्रीशंकराची आराधना केली, व उत्सुकतेनें त्या भक्तवत्सल शिवाला, पांच वेळ " पति दे दे दे दे दे " असें म्हटलें. प्रसन्न झालेल्या भोळ्या शंकरानेंही " घे घे घे घे घे " असें पांचवेळ म्हणून तिला इच्छित दिलें असल्यामुळें द्रौपदीला शिवइच्छेनें पांचवरच योजलेले आहेत, तेव्हां ही परम मंगल यांशसेनी पांचपांडवांनाच अर्पण करणें इष्ट होय व्यासाज्ञा द्रुपदानें शिरसावंद्य मानली. काशीखंडांत द्रौपदीच्या पंच भ्रतारा विषयीं वेगळी कथा आहे. द्रौपदी हा पार्वतीचाच अवतार होय. पार्वती ही हिमालयाची कन्या एकदां ती शिवाज्ञेनें माहेरपणासाठीं हिमालय पित्याकडे गेली असतां, तेथें एका डोंगराच्या पाठारावर कामधेनु विहार करीत होती. तिच्या मागें कामोत्सुक पांच वृषभ अहमहमिकेनें धावत होते. हें पाहून हैमवतीला हसें आलें. ती आश्चर्यानें म्हणाली " काय बाई चमत्कार ! कोवळ्या कामधेनुला हे मेले पांच लठ्ठ बैल ! " ही कामधेनुची थट्टा कामधेनुला सहन झाली नाहीं. तिनें पार्वतीला शापदिला कीं तूं मला हसलीस, त्या तुला,जगाविरहित, पांच पती वरतील. पुढें पार्वतीनें शंकराला ही कामधेनुच्या शापाची हकीकत सांगितली. तेव्हां शंकर म्हणाले, " कामधेनुचें वाक्य खोटें होणार नाहीं आणि तिची वाणी कार्य योजितच आहे मला अंशरूपानें पांडवांचा अवतार घ्यावा लागणार आहे, तेव्हां या माझ्याच पंचमूर्तीची पत्नी होण्यासाठीं द्रौपदीरूपानें तूं अवतरशील.सृष्टिकार्यात जगत्कल्याणेच्छेनें आपणास अवतरणें भाग आहे." म्हणून द्रौपदी पांचांची बायको, असाच विधिसंकल्प होता अस्तु.

द्रुपदराजानें यथाविधि पांडवांपैकीं प्रत्येकाशीं द्रौपदीचें लग्न लावून एक कन्या पांच जावयांनां अर्पण केली, व कन्याऋणाच्या जबरदस्त ओझ्यांतून राजा मोकळा झाला. लग्नसोहळा मोठ्या थाटाचा व विशेष कौतुकाचा झाला अपरंपार दानधर्म झाला. जावयांनां मनमुराद आंदणें देऊन संतुष्ट करण्यांत आलें. रुसवारुसवीला जागाच उरूं दिली नव्हती. लग्नांत

सारे सांडे सोहळे मोठ्या आनंदानें पार पडले. अशा रीतीनें आजवर आई-बापाच्या घरीं, खुशालीखुशालींत, खाऊन पिऊन मौजेनें तान्हुल्या बालवृत्तींत असणारी द्रौपदी, आतां पांडवांची गृहिणी झाली; व पांडवांच्या विश्वव्यापी प्रपंच सूत्रांची परिणामकारक चालना, जबाबदारीनें तिजवर येऊन पडली. पांडव जोहरांतून वाचले, व त्यांचा पांचालीशीं विवाह झाला, या वार्तेनें हस्तिनापुरांत जरी आंतून विशाद वाटत असला तरी बाह्यतः तो दाखवितां येत नव्हता. एका म्यानांत जशा पांचसुऱ्या सुखानें नांदत नाहींत त्याप्रमाणें द्रौपदीसारख्या सर्वांग सुंदर तरुणीशीं, धर्मादि पंचपांडव सुरतसंबंधी तक्रारीनें गृहकलह खास माजवितील, आणि म्हणूनच असल्या कलहनीजाला हस्तिनापुरास न आणतां, श्वशुरगृहींच पांचाल पुरास राहूं द्यावें, असा दुर्योधन कर्णादिकांचा आपमतलबी कटाक्ष होता; पण धृतराष्ट्र व विदुर यांच्या विचारें पांडवांना परत हस्तिनापुरास गौरवानें आणण्याचें ठरलें. पुढें द्रौपदीसह पांडवांची स्थापना इंद्रप्रस्थास करण्याचा विचार, धृतराष्ट्रनें योजून ठेवला होता. विदुरानें पांचालपुरास जाऊन, अत्याग्रहानें धृतराष्ट्रावतीं पांडवांस मागील गोष्टी विसरून,परत हस्तिनापुरास चलण्याची विनंती केली. विदुराचा तेथें योग्य सन्मान झाला; व मोठमोठ्या देणग्या आणि आंदणें देऊन, राजानें पांडवांबरोबर, सद्गदित मनानें, मुसमुसणाऱ्या कन्येची सासऱ्यास रवानगी केली. पाठीराखा श्रीकृष्ण त्यांच्या बरोबरच हस्तिनापुरास गेला

# प्रकरण ४ थें

## सासरीं.

पांडवांचा हस्तनापुरांत जयजयकार झाला. द्रौपदीचाही यथोचित परम सत्कार झाला. ही नवी स्नुषा धृतराष्ट्रानें प्रेमभरानें बाकीच्या सुनासारखीच जवळ केली. पण कौरवांच्या मनांत पांडवा विषयीं वैरभाव धुमसत असल्यामुळें, पांडवांना हस्तनापुरांतच राहूं देणं अंधालाही इष्ट वाटलं नव्हतें. महोत्साहानें धर्मादि पांडवांना यथाशास्त्र अभिषिक्त करून, त्यांची इंद्रप्रस्थास योजना झाली, व तेथेंच द्रौपदीसह पांडव राज्य करूं लागले, कृष्णाच्या इच्छेनें प्रत्यक्ष इंद्रानें हें इंद्रप्रस्थ विश्वकर्म्या करवीं हस्तनापुराहून अधिक सुंदर रचलें व मग कृष्णपरमात्मा द्वारावतीस निघून गेला. तेव्हां पांडवांनातर वाईट वाटलेंच, पण द्रौपदीला माहेरचा पाठीराखा गेल्यासारखें दुःख झालें. तिनें अश्रुजलानें कृष्णाचें पादप्रक्षालन केलें, तेव्हां कृष्णानेंही मी तुमच्यासाठींच अवतार घेतला असून, तुमच्या निमित्तानें दुष्टांचा संहार करून, आपण भूभार उतरूं, " असें म्हटलें.

नारद महामुनि आले. त्यांची विधियुक्त पूजा पांडवांनीं केली त्यावर नारदानें तिलोत्तमेच्या पायीं सुंद आणि उपसुंद हे भाऊ भाऊ कसे भांडले, व विनाश पावले हें सांगून, पांचाची एक द्रौपदी, हें जिवंत भांडणाच्या अनर्थपाताचें विषबीज, नाहींसें करण्यासाठीं, मुनिवर्यांनें वर्षाचे दिवस पांच नवऱ्यांत सारखे वाटून दिले. पांडवांपैकीं प्रत्येकानें पाळी पाळीनें फक्त दोन महिने बारा दिवसच द्रौपदीशीं संबंध ठेवावा, व दुसऱ्याच्या पाळींत जर द्रौपदीचा एकांत पाहण्याचा एखाद्या पांडवावर प्रसंगच आला, तर तें ब्रह्महत्येसारखें पातक प्रायश्चित्तानें नाहींसें करण्यासाठीं, त्यानें बारावर्षे पर्यंत तीर्थाटन करून आलें पाहिजे हे कडक नियम अणुमात्रही मोडल्यास, शाप देण्यास नारद समर्थ होता. मनस्वी द्रौपदी एकापतीकडचे दोन महिने बारा दिवस संपून, दुसऱ्या पतीकडे जाण्यापूर्वीं वन्हि कुंडांत सचैल अग्निस्नान करून, तावलेल्या बावनकशी सोन्याप्रमाणें दिव्याच्या शुद्धपणानेच नव्या पतिचरणीं सतीत्वाच्या उज्वलतेनें सादर होई.

अशारीतीनें द्रौपदीचें रतिसुख नारदाज्ञेनें नियमित करून टाकल्यावर एकदां शस्त्रागारांत द्रौपदी व धर्म यांच्या एकांतात अर्जुनाला, चोरीस गेलेल्या ब्राह्मणाच्या गायी सोडविण्यासाठीं, शस्त्रें आणण्यास शस्त्रागारांत जावें लागलें. यामुळें अर्जुनानें, नियमानुसार, बारावर्षें तीर्थयात्रा केली, व येतांना कृष्णभगिनी सुभद्रा हिचें पाणिग्रहण करून तिला आपल्याबरोबर घेऊन आला. ही नवी बायको घरात सांभाळण्यासाठीं द्रौपदीच्या हवालीं करतांना, सवतीमत्सरानें द्रौपदी रागावेल कीं काय, अशी अर्जुनाला व्यव. हारी भीति पडली होती. द्रौपदीनेंही वरकरणी तसाच प्रेमाचा रुसवा करून "हिला मी सांभाळल्यावर, मला कोण सांभाळणार? नववस्त्र आवडलें तरी जुनें म्हणजे कांहीं लगेच पोतेरें होत नाहीं!" अशा रुष्ट शब्दांनीं विनोद करून, सुभद्रेला हृदयाशीं धरून म्हटलें, "तुम्ही आम्ही खरोखरच एकाच कृष्णाच्या बहिणी! आतां एकाच प्रेमपाशानें अगदी एकजीव एक झालों हें आपलें केवढें भाग्य? द्रौपदीच्या या निर्मत्सर गोड शब्दांनीं धनंजय-वीर किती बरें सुखावला असेल? लौकरच द्वारकेहून यादव दळभारासह बळिराम श्रीकृष्ण सुभद्रेच्या समाचारासाठीं म्हणून बहुमोल अहेरादी आंदण घेऊन इंद्रप्रस्थास आले. पांडवांनीं भावभक्तिपूर्वक त्यांचा जयजयकार केला. बळिरामासह सकलयादव परत गेले. एकटा श्रीकृष्ण मात्र इंद्रप्रस्था-सच राहिला. त्याचें सुभद्रेपेक्षांही द्रौपदीवर अधिक प्रेम होतें, आणि याबद्दल सुभद्रेलाही, हेवा न वाटतां संतोषच वाटे.

पुढें उष्णकाळीं अर्जुनाच्या इच्छेवरून, अर्जुन, द्रौपदी, सुभद्रा, व कृष्ण अशी मंडळी यमुनेच्या कांठीं शीतल सुख घेण्यास जाऊन राहिली. तेथेंच नदीतीरावर सायींचीं शिबिरें बांधून सर्व सोई करविल्या होत्या. सकळ स्त्रियांसह द्रौपदी सुभद्रा, तेथें नौकाक्रीडनाच्या स्वतंत्र रंगांत मग्न सुख मग्न होऊन जात. अशा आनंदांत द्रौपदीचा काळ जात होता. अर्जुनकृष्णही नेहमी स्वैरविहार करीत असत. एकदां यमुनातटाकीं वैश्वानर, ब्राह्मणरूपानें येऊन, खांडववन भक्षणार्थ देऊन आपली क्षुधा हरण करण्यासाठीं, हरि-हरासारख्या कृष्णार्जुनांस विनवूं लागला. कृष्णासह अर्जुन तिकडेच वळला. व वैश्वानराचा इच्छितार्थ पुरवून, पुन्हा यमुनातीरीं जेथें द्रौपदी

सुभद्रा आनंदानें राहिल्या होत्या तेथें ते उभयतां येऊन मगच सर्व मंडळी इंद्रप्रस्थाकडे परतली. द्रौपदीला धर्मापासून प्रतिविंध्य, भीमापासून श्रुतसोम, पार्थापासून श्रुतकर्मा नकुलापासून शतानिक व सहदेवापासून श्रुतसेन असे पांच पुत्र झाले होते. सुभद्रेलाही अभिमन्यू नामें पराक्रमी मुलगा झाला. अशा रीतीनें पांडवांचा वाढता प्रपंच, इंद्रप्रस्थास निर्विघ्नपणें भरभराटींत चालू होता. पांडवांना वेगवेगळ्या सुंदर आणि चतुर अशा भोगांगना होत्या. पण गृहस्वामिणीचें एकछत्रीराज्य मात्र द्रौपदीच सुभद्रेच्या सल्लामसलतींत, पूर्ण अधिकारानें चालवीत असे.

इंद्रप्रस्थीं पांडव सुखानें राज्य करीत होते. दिवसेंदिवस त्यांची भरभराटच होत होती.खांडववन दहनाच्या वेळीं, जीवदान देऊन अर्जुनानें वाचविलेल्या मयासुरानें पांडवासाठीं "न भूतो न भविष्यति" अशी सुंदरमय सभा निर्माण केली. दिग्गजासारखे मोगले इंद्रनीळाचे हत्तीघडवून त्यांना हिऱ्याचें दांत लावले होते. अशा हत्तीवर दिव्य मंडपाची रचना केली होती. मातीसारखें सोनें दगडासारखीं रत्नें वाळूसारखीं मोत्यें, अशा कल्पनातीत ऐश्वर्यसाहित्यावर दैत्यकुलांत प्रति विश्वकर्मा विधाताच अशा मयासुरानें अद्वितीय कल्पक चातुर्यानें मयसभा निर्माण केली होती. यांत्रिककलेच्या पूर्णावस्थेंतील कळसूत्री खेळ तर मयसभेंत पाहणारांना थक्कच करून सोडीत. पाचूचे रावे बोलत. रत्नपुतळे आज्ञांकितपणें धांवत. यंत्रघंटा नियमित गजर करीत. सुंदर पुतळ्या नृत्यगायन करीत, व भगवद्भजनाचा रंग उडवून देत. प्रत्येक यांत्रिक सोय मानवाच्या हितासाठीं, अगदीं दक्षतेनें तेथें सज्ज असे. स्वयंप्रकाशित रत्नदीपांमुळें मयसभेंत दिवसरात्र समजत नसे. स्फटिकभूमि भरलेल्या जलसंचयासारखी दिसून नवख्याची तेथें फसगत होई, व निर्मळ जलाच्या पुष्करणी स्फटिकवत् भासून विशेषच फजीती उडे. कारागिरीच्या कौशल्यानें भिंतींत दरवाजा न उमगण्या इतकी कळाशी साधली होती; आणि सर्वत्र भिंतीवर दारें रत्नमय असल्यामुळें दारासाठीं चाचपतांना प्रेक्षकाचें हंसें होई. तेथल्या पुष्करणींत खऱ्या सोन्याचीं कमळें फुलत, त्यांचा मनोहर सुगंधही सुटे, व वर कर्तबगारीचा कळस म्हणून असल्या कमलावरून नीलमण्याचे भुंगे सजीवतेनें रुंजी घालीत. यामुळें प्रेक्षकाला फारच

कौतुक वाटे. एकंदरींत खऱ्या सुविचारगामी तरतरीत मानवी तर्कालाही अगम्य अशा अशक्याची शक्यता त्या मयसृष्टींत जादूसारखी भरली होती. असली अद्भूत रम्यमय सभा स्वामित्वानें निर्माण करण्यास कारण झालेल्या आपल्या कीर्तिमंत पतीबद्दल द्रौपदीसारख्या सद्गृहिणीला सानंद अभिमान वाटला असल्यास त्यांत नवल तें काय?

पण असल्या अभिमानानें ती ताठून गेली नाहीं. उलट सावधगिरीनें ती विनम्रच झाली. कारण मय सभेच्या वास्तुशांति निमित्त जेव्हां अमित अन्नशांति झाली, राजसूय यज्ञ दानशूरतेनें जगभर दणदणला. अनंत वेद-घोष झाले, अखंड शास्त्रचर्चा झाली, तेव्हां समारंभासाठीं आलेल्या आपल्या कौरवभावोजींत राजा दुर्योधनाचा, स्फटिक चौकांत जलाभासानें जो कपाळ मोक्ष झाला, याबद्दल अंधसुताला चीड येण्यासारखा सर्वत्र जरी हशा पिकला होता, तरी द्रौपदीनें स्वतःचें हंसें होईल तितके आवरून, जाउबाई जवळ परम खेदच प्रदर्शित केला होता. " ठाऊक नसलें ह्मणजं माणसाचं तसंच व्हायचं! त्यांत हंसायला नको कांहीं.' नी आलंच हसं, तर ते दावा-यला नको का? फिदिं फिदि हसणं बायकाला तर बाई मुलींच शोभत नाहीं! असें समाधानाचें सारवण घालण्यासही द्रौपदीनें कमी केलें नसेल, पण ती हंसली, ही गोष्ट दुर्योधनाच्या मात्र मनांत दंशत्वानें राहून गेली. द्रौपदीनें कौतुक वृत्तींत सर्व स्त्रियांना मय कर्तुत्व शुद्धबुद्धीनें दाख-विलें. तिच्या वागणुकींत अहंमन्यतेचा गंधही नसे. हें सारं करणें जगदी-शाचें, त्याचा अभिमान आह्मा दुबळ्या मानवाला काय ह्मणून? अशी कृष्ण-भक्त द्रौपदीची दृढ समजूत होती. चक्रनेमिक्रमानें असेच दिवस कायम राहतील, हें शक्य नाहीं: हे अंतर्यामी जाणून, सदा इशचिंतनांतच खरा आनंद मानण्या इतकी द्रौपदीसति भगवद्भक्त होती.

इकडे धर्मराजालाही नारदांनीं उत्कृष्ट प्रश्ननीति सांगून, संसार सांकडे सुकर होण्याची तजवीज केली होती. अशारीतीनें पांडव सह धर्मचारिणी-सह, सावधपणें विहित कर्मी रतझाले होते खरे, परंतु त्यांच्या भरभराटीच्या विभवाच्या लखलखाटानें दिपलेले कौरवादी भाऊबंद, मत्सरानें सारखे जळत

होते. पुढें पितरोद्धारार्थ नारदाच्या आज्ञेनें पांडवांनीं इंद्रप्रस्थास राजसूय यज्ञ करण्याचें योजिलें. चारी दिशांना त्यांनीं हरिकृपें दिग्विजय करून, अगणित करभार जमविला. जरासंधाचा वध करून बावीस सहस्त्रराजे बंधमुक्त केले. करभाराच्या द्रव्याचे असंभाव्य पर्वत सांठले. शाण्णव कुळीचे राजे, द्रुपदादिक सोयरे धायरे, विराटादी महानृप, यादवांसह बलराम श्रीकृष्ण, शापानुग्रह समर्थ असंख्य ब्राह्मण, असा थाट यज्ञासाठीं जमला. कामाच्या वाटण्या झाल्या. कृष्णानें ब्राह्मणांचे पायधुणें व उष्टीं काढणें, हीं दिसण्यांत हलकीं पण वस्तुतः शेलकीं कामें उचललीं होतीं. द्विजराजांच्या पंक्तीला वाढण्याचें एकट्या द्रौपदीवर सोपविण्यांत आलें होतें.



# प्रकरण ५ वें.

## राजसूय.

राजसूय यज्ञ मोठ्या धडाक्यानें चालला होता. नित्य कल्पनातीत अन्नशांती सुरू होती. देवांनीं देखील तेथच्या दिव्य अन्नाची लाळ घोटावी इतकें तें अन्न स्वादिष्ट आणि प्रसादपूर्ण होतें. जेथें प्रत्यक्ष भक्तकाम कल्पद्रुम लक्ष्मीपति पुरविणारा, व प्रत्यक्ष अन्नपूर्णा भगवती द्रौपदी वाढणारी, तेथच्या जेवणाची अपूर्व गोडी काय वर्णावी ? लक्षानुलक्ष ब्राह्मणांना एकटी द्रौपदी अत्यंत चपलत्वानें वाढीत होती. तिच्या हातांतले रत्नखचित चुडे बिजेसारखे चमकत होते, व त्यांचा उजेड जेवणारावर पडत होता. तिश्यामलांगी, चारुगात्री, कृष्णभक्त, कृष्णभगिनी नामसंकीर्तनांत अक्षय सावधान असल्यामुळें, वाढण्याचे श्रम तिला अणूभरही बाधत नव्हते. शिवाय तिच्या हातच्या अन्नाला तूट म्हणून कधींही पडत नसे. वाढण्याचें हें अचाट कार्य, अश्रांतपणें मोठ्या हौसेनें द्रौपदी करीत असतां, धर्म व श्रीकृष्ण तिचें नयन रम्य रूपडें मोठ्या कौतुकानें अवलोकन करीत होते. कृष्ण रंगांत रंगलेल्या कृष्णेचा सारा श्रमभार कृष्णानें सोसला होता. यामुळें कृष्णाचा मुखचंद्र घामाघूम झाला होता. कपाळाचें कस्तुरी गंध घामानें भिजलें होतें. पितांबर झळकत होता. गळ्यांत मुक्ताहार डोलत होते. कौस्तुभ तेजानें त्रिभुवन दिपलें होते. अशा श्यामसुंदर रुक्मिणीकांताला पाहून, द्रौपदीला धन्यता वाटली. व पाठीशी तो विश्वात्मा सदासर्वदा उभा असल्यानें, तिला वाढण्यास ताजें बळ आलें.

दुर्योधनादि नृपांच्या पंक्ति जेवावयास बसल्या होत्या. द्रौपदीनें पदर सरसावून वाढण्यास सुरवात केली. जशा पावसाच्या सरीवरसरी याव्या, तोंडांतून शब्दामागें शब्द निघावे, समुद्राच्या लाटा एकामागें एक उठाव्या तशा बिजलीच्या चपलाईनें द्रौपदी वाढीत होती. वरचेवर मागें वळून, ती श्रीकृष्णाला न्याहाळीत होती. कृष्णाच्या अंगची केशरादि सुवासी मिश्रणाची उटी जागोजाग घामानें वाहवली होती. इतके तो द्रौपदीचे श्रम स्वतः सोशीत होता ! भक्ताचे कष्ट सोसण्यांत कृपानिधि देवाला कौतुकपूर्ण सुखच वाटतें ! द्रौपदीला श्रमाची वार्ता तिळभरही बाधत नव्हती. ब्राह्मण तृप्त झाले ...

तेज एकवटून, ओतलेलें कृष्णरूप त्यासमयीं द्रौपदीला अनुपमेय भासत होतें. कृष्णानेंही " माझे जिवलग कृष्णाताई, आज तूं फार श्रमलीस, दमलीस, " असें म्हणून तिच्या पाठीवरून हात फिरविला. प्रभूच्या सुखदायी करस्पर्शानें द्रौपदीची तनु हर्षरोमांचित झाली. तिला मुठभर मास आल्यासारखें झालें तिनें सप्रेम कृष्णाच्या सुहास्य वदनाकडे पाहिलें तों त्याच्या मुकुटाभोंवतीं मोत्यासारखे श्रमाचे घर्मबिंदू उभे राहिले होते ! आपल्यासाठी हा आपला प्राणसखा भाईराया किती तरी कष्ट सोशीत आहे. याची मी उतराई कशी होऊं ! अशा सद्गद भावानें अंगीं प्रेम दाटून, तिची चोळी तटतटली, व कौरव पंक्तींत चोळीचें विरडें तुटलें, आणि अंगावरचा पदरही विस्कळीत झाला !

जगांतल्या खऱ्या प्रणयाची मोहोरबंद पेटी, सत्प्रीतीचा अंतस्थ पवित्र देव्हारा, व निसर्गदत्त विनयाचे पल्लवाच्छादित सुफलित भांडार, म्हणजेच स्त्रीची मृदुमनोहर छाती, भर पंक्तींत पुरुषांदेखत, उघडी पडण्याचा विपरीत प्रसंग आल्यामुळें, ती महासति लज्जितपणें घाबरून कावरी बावरी झाली. हात अन्नपात्रांनीं गुंतलेले, काडीभर पदरही सावरण्याची सोय नाहीं, अशी फजीतीची वेळ बेतली ! हात आवरून, ती तटस्थपणें भ्यालेल्या कुरंग दृष्टीनें सर्वत्र पाहूं लागली. दुर्जनाला सहजींच फावलें. शकुनी, दुर्योधन, कर्ण अशा सारखे दुरात्मे एकमेकांकडे पाहून, खुणांनीं कुचेष्टा करूं लागले. असली संधी साधून प्रत्येक दुर्मति मुद्दाम वेगवेगळा पदार्थ मागून, रिकामा पुकारा करूं लागला. त्यावर कोणी " आज अन्न नाहीं, दुष्काळ पडला ! " असें म्हणूं लागले, तर कोणी " आज हरिदिनी आहे. " असें सांगत सुटले. कित्येक तर प्रतिष्ठितपणें " द्रौपदीवहिनी, अशा उभ्याकां आम्हाला वाढतांना ? " अशा वाग्बाणांत घोळलेल्या कडू शब्दानीं टोंचूं लागले ! व्याघ्र गर्जनेनें भांबावलेल्या हरिणीप्रमाणें, लज्जामरणानें व्याकुळ झालेली याज्ञ सेनी द्रौपदी, लहान तोंडकरून, हात आंखडून स्तिमितपणें उभी होती. नेत्रांतून घळघळ अश्रुधारा आलेल्या होत्या. या नादवेंद्रा श्रीरंगा, तुझी ही यशाची पहिली कसल्या फजीतीच्या फेऱ्यांत सांपडली आहे, हें तुला नाहीं का दिसत हिच्यावर आपल्या कृपेची शाल पांघरून, हिची अब्रूरक्षण करणारा, तूं

भरंवशाचा भाऊना ? ” अशी मनातल्यामनांत ईश्वराची करुणा भाकून, तिनें आशापूर्ण नेत्रांनीं, मागें श्रीकृष्णाकडे पाहिलें. तिची ती कारुण्यमूर्ति पाहून, पाषाणालाही द्रव आला असता, पण पंक्तीतल्या दगडांना चेष्टेचाच चेव आला ! गहिंवराच्या अविर्भावानें एकजण द्रौपदीला ऐकूंजाईलसें मोठ्यानें ह्मणाला “ काय करील विचारी ! नाजुक सुकुमार केळ ! तिच्यावर पांच हत्तींच्या थडाका पडल्यावर, ती बापडी किती टिकणार ? रात्रीं पंच-प्राणेश्वराच्या सेवेचे ते श्रम दिवसा हें गृहकार्यममतेचे वाढण्याचे श्रम: असला असह्य बेश्रमपणाच तिच्या कपाळीं ! ” खरोखरच कुचेष्टेखोर मंडळीला याहून अधिक बेशरमपणा त्या पंक्तींत काय करता आला असता ? म्लान वदन पांडवकांता बहिऱ्या कानांनींच हें ऐकत होती. तिचें चित्त एकाग्रतेनें कृष्णचरणीं तद्रूप झालें होतें. दृष्टि सावळ्या कृष्णमूर्तीवर खिळून राहिली होती. तेंच सगुण मनोहर ध्यान तिच्या हृदयांत भरलें होतें. मग भिन्न भावतो काय उरला ? अर्थात आपपरभाव विसरलेला विमल हृदयांत श्रीकृष्णपरमात्मा, आपलेपणानें प्रकटझाला असल्यास त्यांत नवल तें काय ! त्याजगन्मोहनानें क्षणार्धांत कृष्णेला भुजावरभुजा निर्माण करून, आपल्या सारखीच आत्मस्वरूपी चतुर्भुज केली ! मग काय उशीर ? परमेश्वराच्या या नवकृपाकरांनीं सुटलेल्या चोळीची गाठ बांधून, पदर सरसावतांच, द्रौपदीचा मुखचंद्रमा टवटवला. तिला अवसान आलें. वाढण्याची नवी नवीश्री चढली. कृष्णकृपेनें एकदांच सारें त्रिभुवन जेवूं घालून, तृप्त करीन, अशी धमक कृष्णभगिनीला त्यावेळीं वाटूं लागली, चतुर्भुजकृष्ण आणि चतुर्भुज कृष्णा, अशा भिन्न भिन्न कृष्णमुर्ती पाहून, पंक्तीतले दुर्जन खळ लाजले. खोट्या हाकाटीनें मागितलेले पदार्थ भराभर चतुर्भुज अन्नपूर्णेच्या हस्तानें पानात पडूं लागले, व ते न खाल्ल्यास शेंडीला बांधण्याचा धाक भीमसेन पाडूं लागला ! शुंभ निशुंभ दैत्य निवटून विजयी झालेल्या भवानी देवी सारखी, सति द्रौपदी जयश्रीनें तळपत होती.

भोजनोत्तर हात धुतांना गंगात्मज भीष्म महाराज, उन्मत्त कौरवादिकांना ह्मणाले, “ बाबांनो, ही पांचाली ह्मणजे प्रत्यक्ष अंबेचा अवतार. या अद्भुत देवीचा उपहास करून, तिला क्षोभविली तर कुळक्षय करील

तिला शरण जाऊन क्षमा मागा. " मदांध मंडळी तुच्छतेनें नुसती हंसली. इकडे द्रौपदी पंगत उठल्यावर, घरांत परत गेली. पाठोपाठ वैकुंठनाथ होताच. द्रौपदीनें घट्ट कृष्ण चरण धरले, आणि स्फुंदस्फुंदून रडूं लागली. पांच पांडवही जमले. त्यांची कुंति माताही आली. साऱ्यांनाच गहिंवर दाटला. " कृष्णा, तुझें काय काय बाबा, उपकार आठवूं ? तूंच आमचं जीवन सर्वस्व आहेस " असें ह्मणून त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले ? श्रीकृष्णानें पांडवानां पाटाशीं धरून, त्यांचें सांत्वन केलें. कुंतीला शब्द फुटेना तरी ती तशीच दाटक्या आवाजानें ह्मणाली, " कृष्णा, द्रौपदीला समजाव. हा पहा तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या आहेत ! आणिबाणीच्या ऐनवेळीं अद्‌भुत करणीनें तिची तूं अब्रू संरक्षिलीस, याबद्दल उपकारी कृतार्थ भावानें तुझें कसं उतराई व्हावं, हेंच तिला काय नी आह्मा साऱ्याना काय, कृष्णा, उमगत नाहींसें झालं आहे. " भक्तकैवारी कृष्णानें द्रौपदीची समजो घालीत घालीन ह्मटलें, " द्रौपदी, सद्‌गुणखाणी द्रौपदी तूं मला प्राणाहूनही प्रिय आहेस. लक्षावधि पंक्तीला एकटीनें विनवोभट वाढण्याचें असंभवनीय काम, प्रत्यक्ष कृतीच्या संभवानं, चुटकी मारवं सुकर करून दाखविण्यांत. बाई, फार श्रमित झाली असशील ! बैस, विश्रांती घे " द्रौपदी भक्तिभावानें उद्‌गारली, " कृष्णा, तुझ्या जिवावर मला कसले श्रम ? कुठं दाटेल तेंथ मी जन्माची आश्राहीन, पण यदुराया तूं माझा कैवारी पाठिराखा भाऊ असत जा, ह्मणजे झालं "

साऱ्यांची जेवणें झाल्यावर कृष्णाच्या पंक्तीला, पाच पांडव द्रौपदी आणि कुंतीही नित्य अपाप्य भोजन सुख घेऊन, देवाधिदेवा सह तृप्त होत. अशा रीतीनें कार्यक्रम चालविणारा राजसुय यज्ञ एक वर्षभर चालला होता. कृष्णानें काढून टाकलेल्या उष्ट्यांतले शितकण वेचून, ब्रम्हवेत्ता शुक महाराज तेंही तृप्त झाला व त्याच्या तृप्तीनें स्वर्गघंटा सारखी खणखणत राहिली. यज्ञ समाप्तिच्या वेळीं, भीष्माज्ञेनें अग्रपुजेचा मान. श्रीकृष्णाला देण्यांत आला यामुळं दुरात्मा शिशुपाल खवळला. त्यानें भर सभेंत कृष्णाला शिव्या देऊन आपले शतापराधाचे घडे भरून घेतले. व मग सुदर्शन चक्रानें त्याचा शिरच्छेद करून यदुवीरानें शिशुपालाचा उद्धार केला. प्रसंग मध्यंतरी यज्ञ

कुंडाजवळ एका स्त्रीनें पतीचें प्रेत आणून टाकल्या वेळींही, तें प्रेत ब्रह्मचर्य संकल्पानें उठवून, श्रीकृष्णानेंच यज्ञ कार्यातलें विघ्न नाहींसें केलें होतें. तरी कुंड वेदिकेवर बसून, भविष्यार्थ बोलणाऱ्या जंबुकाच्या वाणी वरून पुढची तेर वर्षें हाहाःकाराचीं जातील, व सकल राजे आटून वसुंधरा निर्वैर होईल" या भेसूरणें भविष्यामुळें **द्रौपदी** सारख्या मृदु मनाच्या गृहिणीला, अंतरात्म्यांत धगधगीत काळजीचा चटका लागल्या शिवाय राहिला नाहीं.

# प्रकरण ६ वें.

## द्यूत.

पांडवांचें वाढतें ऐश्वर्य पाहून दुर्योधनादि कौरव मत्सरानें जळूं लागले. भीमाला विष घालण्याचा दुर्योधनी बेत फसला, पांडवांना लाक्षागृहांत जाळून भस्म करण्याचा कौरवी व्यूह ढासळून पडला; द्रुपदसभेंत स्वयंवराचा पण जिंकून, द्रौपदी सारखें स्त्रीरत्न पांडवांनाच लाधलें; मयासुराधारल्या असुरा विधात्यानें त्यांच्यासाठींच लोकोत्तर मयसभा निर्माण केली; त्यांनाच दिव्य रथ आणि धनुष्यबाण अग्निनारायणानें प्रसन्न होऊन अर्पण केले; त्यांनींच राजसूय यज्ञासारखें दिगंत कीर्ति करणारें पुण्यकर्म जोडलें; त्यांनाच देवकीनंदन सर्वथैव अनुकूळ झाला; शत्रूंच्या अशा भरभराटीच्या परंपरेनें दुर्योधनाच्या मनाला सारखी आग लागून राहिली. या हेव्याच्या वणव्यांत पांडवांचें वैभव केव्हां एकदां भस्म करून, थंड होईन असें त्यास झालें होतें. स्वयंवरसभेंत प्रथम डोळ्यांत भरलेली परम सुंदर याज्ञसेनी, मयसभेंतील आपल्या स्फटिकजलाभासाच्या फजीतीच्या वेळीं खुदकन् हसून, दंशरूपानें पक्की ध्यानांत राहून गेल्यामुळें, नागवणुकीनें केव्हां तिला एकदां दीन गाय बनवून, अंकित करून सोडीन, अशी पापमय उत्कंठा दुर्योधनाला सारखी व्याकूळ करीत होती.

कपटपटु शकुनीमामाच्या दुष्ट सल्ला मसलतीनें, पांडवांना त्यांच्या चलतीच्या शिखरावरून ओढून, पडतीच्या पंकगर्तेत ढकलून देण्याचे डावपेंच, दुर्योधनानें योजून ठाम केले होते. विदुराकरवीं मोठ्या अत्यादरानें पांडवांना महोत्साह पाहण्याच्या निमित्तानें हस्तनापुरास येण्याविषयीं अगत्याचें बोलावणें गेलें होतें. सन्माननीय विदुरकाकांचें पांडवांनीं प्रेमभावानें योग्य आदरातिथ्य केल्यावर, त्या ज्ञानी पुरुषानें आपल्या आमंत्रणातील गर्भितार्थ सुचवून ठेवण्यासाठीं, "हस्तनापुरीं गेल्यावर दुर्जन कौरवांच्या सभेंत, द्यूत खेळूं नकोस, निदान पण ठेवून तरी खेळूं नकोस, काळ फार विपरीत दिसत आहे सावधान

ऐस," असें धर्मराजास बजावण्याला कमी केलें नव्हतें. या कठिण काळाची वर्दी, व्यासनारदांनीही आगाऊच आपल्या दूरदृष्टीनें पांडवांना देऊन ठेवली होती. सति द्रौपदीलाही दुष्ट स्वप्नें जाणवत होतीं; आणि म्हणून तिनें आपणां सर्वांना दीन करून, कौरवसभेंत कौरवांनीं सर्वस्वी नागविण्याचा यत्न केल्याचें अशुभ स्वप्नही पांडवांना सांगून टाकलें होतें. पण होणाऱ्याची गति कशानें कुंठित होणार ? विधिघटना कोण खोटी पाडूं शकणार ! "आलें भगवंताचे मना। तेथें कोणाचें चालेना" हेंच खरें.

कुंती द्रौपदीसह पांडव हस्तनापुरास गेले. तेथें कौरवसभेंत धर्मराज करमणुकीसाठीं द्यूत खेळण्यास सिद्ध झाले. डावाला रंग येण्यासाठीं ते पण बोलूं लागले. शकुनीला वश असलेले राक्षसाच्या दाताचे फासे, जरी प्रथम प्रथम भीमाच्या आरोळीनें दचकून धर्मासारखेच डाव देत, तरी भीमाला गप्प बसविल्यावर, ते कौरवाला अनुकूल असेच पडूं लागले. अर्थात् धर्माचा प्रत्येक डाव हरल्यामुळें, द्यूतविजयश्री कौरवांना वरूं लागली. द्यूत भूमीवर पराजित झाल्यामुळें, द्यूताला विन्मुख होणें क्षत्रियतेला अनुचित होय, अशी कुटिल नीतीची भर शकुनीमामा देऊं लागले. भोळा धर्म भरी भरला. द्यूत भ्रमानें त्याला भ्रमिष्ट करून, अधिक हाव भरल्यामुळें, अविचारानें वाटेल तें पणाला लावण्यास युधिष्ठिरानें कमी केलें नाहीं. पांडवाची धनदौलत, चीजवस्त, घरदार पात्रापात्र, दासदासी, गुरेंढोरें सर्व कांहीं हरण झालें. तरी हाव थांबेना. द्यूत मद्यानें झिंगलेला धर्म, अधिकाधिक मोलाचे पण बदकून नागवला जाण्यास सिद्धच होता. या अनर्थपातानें कळवळलेल्या विदुर महाराजांना गप्प बसवेना. त्यांनीं भरसभेंत धृतराष्ट्राला नीतिबोध करून द्यूत बंद करण्यास सुचविलें. "पांडव उदार असल्यामुळें त्यांनीं वाटेल तें कौरवांना द्यूताशिवायही प्राप्त करून दिलें असतें, द्यूत कर्म वाईट आहे. द्यूतानें जिंकलेलें सारें ऐश्वर्य, ज्याचें त्यालाच अखेर परत जाईल. मात्र घनघोर रणसंग्रामानें कौरवासह सकल राजे कुळीस मिळून, धृतराष्ट्रालाच अंती

दुर्दशेची वेळ येईल. ईश्वरीमाया पृथ्वि निर्वैर होण्यासाठीं कौरवांच्या हातून अन्याय करीत आहे. म्हणून धृतराष्ट्रा, वेळींच सावध हो " अशा तऱ्हेचीं अमृतवचनें, द्यूतकर्मी रत झालेल्या रंगीरंगांत कोण चालूं देणार ! शकुनीनें या द्यूतयज्ञांत पूर्णाहुतीनें असला थोर याग पुरा करण्यास धर्माला खोटी भर दिली, व प्रज्वलितपणें रसरसलेल्या अग्नींत, पतंगानें जशी मोठ्या खुषीनें उडी टाकावी, त्याप्रमाणें भुललेल्या धर्मानें पुत्रबंधूही पणास लावून हरले ! पुढें स्वतःलाही लावून स्वतःचें हरण करून घेतलें ! ! व विसाव्याडावीं द्रौपदी सारखें त्रिभुवन निधानही पणाला लावून तें प्रतिपक्षानें डावांत जिंकून घेतल्यावरच, करंटा धर्म हायसा थोडा स्वस्थ बसून विसावा घेऊं लागला ! !

सभेंत एकच हाहाःकार झाला. सारे सज्जन हळहळले. भीष्मद्रोणा-च्या डोळ्यांला दुःखानें पाणी आलें, तर द्यूतांत सर्वस्वी विजयी झालेले कौरव, मदतनीस दुष्ट जनासह आनंदाश्रु ढाळूं लागले ! धृतराष्ट्राला मना-तल्या मनांत बरें वाटलें, पण वरकरणी दुबळी त्रयस्थवृत्ति त्यानें धारण केली होती. द्रौपदी आतां राजा दुर्योधनाची दासी झाली असल्यामुळें, तिला भरसभेंत आणून तिचें पातिव्रत्य चवाठ्यावर सभाजनांस उघडें करून दाख-विण्याची आत्मघातकी टूम दुर्योधनानें काढली, विदुरानें खऱ्या हितवचनांनीं त्याचा तीव्र निषेध केला, पण मदांध राजानें तिकडे लक्ष न देतां, पांचालीला सारी भीडभाड सोडून एकदम सभेंत घेऊन येण्यास द्यूताला आज्ञा केली. द्यूतांतील विजयतोऱ्यानें उन्मत्त बनलेल्या धन्याचा दूत, स्वतःचा दर्जा विसरण्या इतका निसर्गतः अविचारी नव्हता. त्यानें द्रौपदीकडे जाऊन, धर्मानें आपल्या हातानें द्यूतांत समग्र हारविल्याची दुर्दैवी कहाणी सांगून दुर्योधनानें द्रौपदीला राजसभेंत बोलावल्याची वर्दी दिली. असल्या अनिष्ट वार्तेच्या आगीचा लोळ द्रौपदीसारख्या सुमन मृदु लतिकेवर पडल्यामुळें ती मनानें होरपळल्यासारखी झाली. तिजवर वीज कडाडल्याप्रमाणें ती व्यथाव्याकूळ होऊन गेली. पण पेंचाच्या कठीण प्रसंगीं नुसते अश्रु ढाळीत हाय हाय करीत बसून कर्तव्य आणि सारासार विचार, यांचें अवधान विसरण्या इतक्या दुर्बल मनाच्या साधारण कोटींतल्या स्त्रियांपैकीं द्रौपदी नव्हती. ती

उच्च कोटींतली सधीर, सुसंस्कृत, व मुत्सद्दी अबला होती. तशा आणीबाणी-च्या वेळींही न गांगरतां, तिला आत्मसंरक्षणाचा न्याय्य युक्तिवाद सुचला; व तिनें तो निरोपानें त्याच दूताकरवीं राजसभेंत पाठवून दिला. ती म्हणाली "भीष्मद्रोणांना विचार कीं, तुमच्यासारखे विचारशील राजसभा मंडीत करीत असतां, असली विपरीत करणी शोभते तरी कशी? शिवाय जर धर्मानं आधीं स्वतःलाच हरवून, ती धर्ममूर्ति सत्तेनं कौरवांचीच होऊन चुकली, तर मग मला पणाला लावण्यास त्यांचा आमचा अर्थाअर्थी तरी संबंध काय उरला? शिवाय मी पांचांची अर्धांगी, नारदानें माझ्या पतिसेवेच्या कालाची अलोट सीमा बांधून टाकलेली आहे. या दिवसाच्या वाटणीनें हल्लीं मी भीमकांता असतांना, मला पैजेला लावून हरविण्याचा युधिष्ठिराला काय अधिकार?

विचारा दूत परत सभेंत येऊन **द्रौपदी** ऋतुस्नात असल्याचें सांगून तिचें म्हणणें राजाला कळवूं लागला. तेव्हां दुर्योधन आज त्या दूताचें म्हणणें नीट न ऐकतां त्याची हेटाळणी करून म्हणाला. "तूं अगदीच मख्ख आणि अजागळ! तुझें तें कामच नव्हे. अरे मूर्खा **द्रौपदी** आतां आपली बटीक झालेली. तिचं काय म्हणणं ऐकायचं आहे? पुढें घालून चापून घेऊन यायची. दुःशासना धावपाहू त्या दासी **द्रौपदीची** शिरीं धरून तिला खेचून घेऊन ये. बटकुराची काय मला प्रतिष्ठा हवी!" ज्याप्रमाणें तंतूशीं यत्किंचित् पाय चिकटलेल्या माशीवर झडप घालण्यासाठीं, जसा टपलेला बुभुक्षित कोळी चटकन् तरतरतो. बिचाऱ्या हरिणीवर दुष्ट व्याघ्र जसा वेगानें झेपावतो, अप्राप्य राजभांडारावर जसा एखादा उपटसुंभचोर हावरेपणानं घालाघालतो, तसा तो निर्द्रव दुःशासन, लांडग्याच्या वृत्तीनें **द्रौपदीला** ओढून सभेंत आणण्यासाठीं, कृतांतासारखा धांवला. विमलवृत्तीच्या पांचा-लीला उद्धटपणें गांठून, चांडाळ हास्यांत स्वतःच्या वृत्तीच्या भीषणतेनें तिला त्यानें थरारून सोडलें, व हुकमतीच्या आवाजानें दुर्योधनाच्या अलोट आज्ञेप्रमाणें, राजसभेकडे एकदम चालण्याविषयीं, त्यानें **द्रौपदीला** कडक हुकूम फर्मावला; मग हिंस्रवृत्तीच्या बेफिकीरीनें तो म्हणाला, "ए! खुपसु-रत दासी, तुझे ते पांच धडधाकट नवरे, आतां आमचे बंदे गुलाम झाले आहेत.

तशीच तूंही एक सहात्री. आतां तुला काय क ? अग, अगदीं भिऊं नकोस. पांच टोळभैरवांनीं तुझ्यासारख्या एका, कोवळ्या, नाजूक स्त्रीशीं समान हक्कानें रत होण्यांत, धडधडीत व्यभिचार मांडला, म्हणून आ ॥ शौर्यनिधी शंभर भाऊ कांहीं तसा अनन्वित कर्म करण्यास प्रवृत्त होणार नाहीं. तूं आतां आमच्या एकट्या दुर्योधन दादाच्या गळ्यांतील ताईत-कशी लाडकी पुतळी होऊन रहा कशी! उशीर नको. विचार विकार कुचकामाचा. उठ आणि चालूं लाग. नाहींतर मी तुझ्या झिज्या धरून, अशीं फरफटत घेऊन जाणार! तेव्हां शहाणी असलीस तर तशी शोभा करून घेऊं नकोस. दया, माया, आणि क्षमा, शांती असल्या भाकूबाई वृत्तीचा लेशही मजपाशीं मिळायचा नाहीं. शिवाय तुझ्यासारख्या अंकित माणसाचं जन्माचं हित करण्यासाठींच जर दुर्योधनाची ही योजना, तर नसत्या आचरटपणांत वेळ फुकट कां दवडावा? तुझं कल्याण तूं अज्ञानानं करीत नसलं, तरी तें आम्हांला दूरदर्शित्वानं उमगून चुकलं आहे."

प्राणाहून प्रिय अशा आपल्या ठिसूळ अब्रूची निष्प्रतिबंध, आवरणहीन उघडी वाच्यता दिराच्या तोंडून ऐकून, त्या साध्वीच्या जिवानें ठाव सोडला. जीवन सर्वस्वाचें आदिकरण होऊन राहिलेल्या इज्जतीच्या मृदुतंतूशीं दांडगे-पणानें हिसकाहिसक करूं पाहणारा दुःशासन, तिला निष्ठुर काळाहूनही महा भयंकर भासला! व्याघ्रमुखांत सांपडलेल्या दीन गाईप्रमाणें, भयव्यग्र दृष्टीनें, दुःशासनाची करुणा भाकून, सद्गद कंठानं द्रौपदी म्हणाली, ' भावोजी, हें तुम्ही आरंभलंत तरी काय! मी तुमची वहिनी म्हणजे तुम्हांला मातृ समान ना? त्या गांधारी मातेसारख्या मला राजसभेंत ओढून, किळस-वाणें भलभलते अत्याचार करण्यांत, तुमचं तरी बरं होईल कां हो? तुम्हींच माझे पाठिराखे बापभाऊ होऊन, या अघोर प्रसंगांतून, वाटेल त्या उपा-यांनीं माझी सुटका करा. तेंही शक्यच नसलं, तर माझा, आपल्याच हातानं इथं अंत करून, पुढली विटंबना तरी वाचवा. एवढी मला भीक घाला. मी तुमच्या हातानं आनंदानं मरेन नी सारं जग, आपण माझी अब्रू बचावल्याबद्दल आपली वाहवाच करील; म्हणून म्हणतें भावोजी, दुरितांच्या राशी जोडणारे हे भलतेच चाळे खेळून, माझे अनन्वित हाल

नका हो करूं ! भावोजी, आईच्या हृदयानं दयार्द्र होऊन, मजकडे पहा, नी ममतेच्या पांघरुणानं माझी लाज राखा." पण खाटकाला कोठून दयेचा पाझर फुटणार ? वाटपाड्याला कोठून मायेचा उमाळा येणार ? कर्म-चांडाळाला कशानें उपरती होणार ? विषाचें अमृत होणें जसें अशक्य, तसें दुःशासनाला सुबुद्धि सुचणें, असंभवनीय होतें. तो शेफारलेल्या चढेल-पणांत, तिच्या दीनवाणीची थट्टा करून म्हणाला, "किती बडबडशील वाचाळे, दासीच्या जातीला इतकं बोलणं शोभत नाहीं. हूँ, आटप, चलूं लाग. दुसरी वात नाहीं. कीं ओढूं बुचडा ?" हाय, हाय ! काळाच्या वक्रदृष्टीनें राजेश्वरी पांडवपत्नी दीनाहून दीन होऊन गेली; ती या विप-रीत अरिष्ट भयानें घाबरून प्रसंग टाळण्यासाठीं घरांत लगबगीनें जाऊं लागली, तत्क्षणीं त्या नराधमानें तिजवर झडप घातली. तिचा सुंदर गंभीर केशकलाप हातीं धरून, हिसक्यासरशीं त्या निराधार अबलेला, वादळानें केळ जशी कडकडून आडवी पडावी त्याप्रमाणें त्यानें धरणीवर पाडलें.

# प्रकरण ७ वें

## कौरव सभेंत.

जिच्या अंगाच्या सद्गुण सुवासानें दिग्मंडळ प्रसन्नतेनें सुवासिकें होऊन जाई व जिच्या सत्वधीर तेजस्वितेच्या सत्प्रकाशानें वसुंधरा हसल्यासारखी उजळून जाई, तीच यादवेश्वराची प्रियतम भागिनी, व इंद्रप्रस्थाधिपतींची कोमलांग धर्मपत्नी, दुःशासनाच्या दुष्कृतीनें धुळींत दुःखवेगानें लोळवितांच, सज्जनांना ब्रम्हांड डळमळलें, सप्तसागर उचंबळले, चंद्रसूर्यही ढळले, पण पापराशी दुःशासन स्वतःच्या कुमार्गापासून रतिभरही मागें सरला नाहीं. द्रौपदीचे केश आकर्षून, तो तिला राजसभेकडे फरफटा ओढीत सुटला. अश्रुधारांनीं पृथ्वीमाता भिजवीत भिजवीत, अधोवदन करून बिचारी द्रौपदी, दुःशासन धावडवील तशी फरफटत, ठेचकळत, कलमडत, कशीतरी घाईघाईनें चालली होती. पाषाणहृदयी दुःशासनाचें हृदय, "हळू चाला, पदर घेऊं द्या" अशा शुष्क बाबतींतील द्रौपदीच्या केविलवाण्या विनंतीनेंही, सारखें जास्तजास्तच कठोर बनत जालले होतें; हें जाणूनच कीं काय द्रौपदीदेवी, ओढवून आलेल्या अब्रूच्या महत्संकटापेक्षें, वास्तविक मुळींच किंमत नसलेल्या शारीरिक अल्पस्वल्प व्यथांनींही अत्यंत व्याकुळ झाल्यासारखी चांडाळ भावोजीची काकुलतीनें करुणा भाकी, आणि त्याला आपल्या वाढत्या दुष्कर्मानें, पापाचे घडे लौकर भरून घेण्यासच संधि साधून देत होती ! मानेला कळ लागण्यासारखे, मनाच्या आणि हाताच्या वाकड्या ओढीनें आखडून धरलेले ते मार्दवशाचिर तुळतुळीत व भृंगरुचिर कुळकुळीत द्रौपदीचे चडचडणारे केश, तिच्या दीनवाण्या म्हणण्यावरून, केसभरही सैल सोडण्याची त्याची तयारी नव्हती. जणुं लगाम आखडून, अकडीत वर मान करून चालणाऱ्या मानी घोड्याप्रमाणें, वर तोंड केलेली तिची दुबळी दैना, रस्त्यांतल्या जनांना स्पष्ट करून दाखविण्यांतच, त्याला पुरुषार्थ वाटत होता, पण सुजनवृत्तांच्या लोकांनीं या पापमय धिंडवड्याकडे डोळेझांक केलेली, त्याच्या ध्यानींच नव्हती ! द्रौपदीला जरासा पदर सावरण्याचीही फुरसत देण्याची त्याला सोय नव्हती.

कारण दासीजनांनीं असे उघडझापांचे नटवे अंगविक्षेप करून, नखरा दाखविण्यांतच, श्रेष्ठ-जन-मन सुप्रसन्न होण्याचा लाग असतो, हा नवा धडा दासी वहिनीला शिकवायाचा होता ! जलद चालण्यापासून होणारे द्रौपदीचे सुकुमारतेचे अति श्रम, हळू चालून, कमी करण्याची त्याची इच्छा नव्हती. कारण हलकीं मोठीं राजवाड्यांतलीं दासींचीं कामें धावपळीनें करून, यजमानाची मर्जी संपादन करण्याची संवय, द्रौपदीला आतांपासूनच असलेली बरी, असा दुःशासनाचा पोक्त विचार होता ! बिचारीची जीभ कोरडी पडली, ओठ वाळले तरी त्याला पर्वा नव्हती. कारण त्याच्या मतें दासी झालेल्या तिला आतां तेवढा काटकपणा हवाच होता ! द्रौपदीचीं भूषणें विगलीत होऊन वाटेंत दिव्य रत्नहाराचीं मोत्यें गळत होतीं, पण असली क्षुल्लक गोष्ट दुःशासनाच्या खातरेंत नव्हती. कारण विगलित गात्रें व विस्कळित भूषणें यानींच दासी द्रौपदीला भूषित करून, अधिक मनोहरपणें राजसभेंत तिला उभी करावयाची होती !

जशी अंधेरांत वीज चमकावी, तसा द्रौपदीचा प्रकाश कौरवसभेंत लकाकला. त्यामुळें सभासद चपापून दिपले. आणि सज्जनांनीं तर, द्रौपदीची प्रत्यक्ष अन्नपूर्णा देवीच्या अवतारलेल्या या सगुण गुणनिधानाची सभारंगणांतील आपत्ति आळखूनच, आपले चर्मचक्षु घट्ट मिटले. पापिष्ठ मात्र तिचें तें मोहून सोडणारें कृष्णमय कृष्णस्वरूप पापदृष्टीनें न्याहाळून, जिभल्या चाटूं लागले ! अंगजराज कर्ण सुखाच्या गुदगुल्या झाल्यासारखा, सस्मितपणें द्रौपदीला कळवळीच्या आविर्भावानें ह्मणतो, " पांचाली, अशी परकेपणानें तिष्ठत, तूं दूर दूर कां उभी ? राजा दुर्योधनाच्या मांडीवर बैस. तेंच तुझें खरें सिंहासन. त्याच सुवर्ण कोंदणांत तुजसारखं रत्न शोभणार ! कपाळकरंटे झालेले तुझे अपेशी, जुगारी खापरे पांडव आतां तुला कशाला हवेत ? ते तुझे दासानुदासही न शोभण्यासारखे हीन दीन झाले आहेत. तूं मात्र भाग्य काढलेंस, ह्मणूनच दुर्योधनाच्या वामांकीं बसण्याचा अप्राप्य मान, तुला मिळाला. " हे जालीम शब्दविष सतीच्या अत्यंत विमल अंतःकरणाच्या सुकुमार अंतरंगाला जाऊन झोंबतांच, तेथच्या तिच्या साऱ्या रुद्रवृत्तीच्या भावना, उचंबळून तिच्या चेहेऱ्यावर प्रक्षुब्धपणें प्रतिबिंबित झाल्या, व तिच्या

धावरलेल्या ंचक हरिण नेत्रांतून त्या पांडवांशीं—विशेषतः भीमार्जुनाशीं, दुखवलें होत. अबलेच्या सबलतेनें बोलूं लागल्या. हताश झालेल्या हृदये-श्वरीचें तें मर्मी नेत्र संभाषण, सतिनिष्ठ पतीलाच अर्थपूर्णतेनें हृदयांतरी पटणारें बावरलेलें दृष्टिक्षेपण, अब्रूसाठीं प्रेमशूर हृत्कपाटांत लप-ण्याला सुरक्षित जागा मागणारा विश्वासपूर्ण विलोल चक्षुसंकेत, म्हणजेच साधिच्छळाच्या यथायोग्य सूडाच्या मर्दांनी प्रतिविचारास चेतविणारी द्रौपदीची एकच दृष्टिपाताची ठिणगी भीमकर्म्या भीमाला घडणाऱ्या अन्या-याविरुद्ध प्रज्वलित करण्यास पुरेशी झाली !

आवेशानें गदा पडताळीत, क्रोधावलेला भीम सिंहासारखा उठला, व सभेला गर्भगळीत करून सोडणारी आरोळी देऊन, संतप्त गर्जनेनें तो म्हणाला, " या प्रतापी गदेनें, साऱ्या कौरवांची शिरं, येथच्या येथं, ठेंचून टाकतों. कोणता सात्वीक पति आपल्या प्राणजीवन स्त्रीची असली अमानुष कथा गांजणूक मुकाट्यानें सहन करील? गांजलेल्या द्रौपदीच्या केविल-वाण्या जळजळीत अश्रुपूर्ण पाहण्यानें, माझें हृदय विदीर्ण होऊन गेलें आहे. निर्लज्जपणें अनन्वित अनाचार घडूं देणारा मागूबाईविचार, मला मुळींच संमत नाहीं. अत्याचारीं सहनशीलता म्हणजे अनर्थपूर्ण प्रमादच होय. व्यवहारांत जशासतसें, सोट्यास सोटा, आणि खोट्यास खोटा, असाच बाणा बाळगला पाहिजे, तरच निभाव लागतो " या सणसणीत शब्दांतली जरब कृतींत उतरण्यास भीमाला अवकाश नव्हता; पण धर्मराजानें म्हटलें, 'भीमा असला अविचार शीलाळा बट्टा आणील क्षमाशीलतेनें विवेकशील होणें, हेंच सज्जनाचें [illegible] होय. त्यांनीं आपल्याला जिंकून गुलाम केलें आहेना ? अर्थात आधीन [illegible] त ते आपल्याला वागवतील, तसेंच आपल्याला वागलें पाहिजे. उगीच तक्रार करून काय उपयोग ? असले सत्वधीर प्रसंग भगवद्भक्तांची परीक्षा पाहण्यासाठींच दयाळू ईश्वर मुद्दाम आणतो, त्यांतून धिमेपणानें पार होणें हेंच आपलें कर्तव्य म्हणून असला उतावीळपणा सोडून दे, आणि शांत हो " [illegible] अधिकारी धर्मानीतीच्या गंभीरपणानें आज्ञा केली भीम थोडा [illegible] आला [illegible]

म्हणाला, " पण दादा, हें अज्ञान सांगणारे तुम्हींच या सर्व दुःखाचें मूळ आहांत. व्यासनारदांनीं द्यूत खेळूं नको, म्हणून तुम्हाला बजावून सांगितलें असतां, तें वर्जित द्यूत खुशाल अंगीकारून, आम्हां सर्वांना तुम्ही संकटांत लोटलें, म्हणून ज्या हातानें फासे खेळून आम्हाला आपण फासांत घातलें, ते तुमचे हातच माझ्या गदेनें तोडून टाकतों." धर्मानें निर्धास्तपणें होकार देऊन, तोडून घेण्यासाठीं आपले हात, भीमापुढें केले. रागावलेल्या भीमानें गदा उचलली. तों अर्जुनानें वरचेवर धरून म्हटले, "भीमसेना वेडातर नाहींस? धर्मासारख्या धर्मरत्नावर हात उचलून, नुसती अपकीर्ति जोडण्या पलीकडे आपण काय मिळवूं? सत्यवृत्ति, अजातशत्रु, पुण्यमूर्ति धर्ममहाराज आपल्याला वडिलांचे स्थानींच आहेत. त्यांच्या गुंतलेल्या शब्दानें आपल्या सर्वांचे जीवचरीत सारखें बद्ध होण्याइतकी अढळ एकी अबाधित राखणें, हें कांहीं सामान्य सामर्थ्य नव्हे त्याचीच जोड आपण मिळवूं. तीच जयाला जाईल. एकनिष्ठाच्या एकीचें बळच अजिंक्य होईल. बाकी मायामय प्रपंचांतील चढउतारांची स्थिती बाळगण्यांत काय अर्थ? ही दुपारची सावली अशाश्वतच. भाग्यवान राजे मागें कैक झाले, पुढेंही असंख्य होतील. सत्त्व हानी न होऊं देतां, आल्या प्रसंगाला नेटानें तोंड देणें म्हणजे झालें. सहकारी कृष्ण सर्व कांहीं यथोचित करील." अर्जुनाच्या या सौजन्य पूर्ण वचनामृतानें भीमाचा क्रोधाग्नि शांत झाला, व धर्माला वंदन करून तो जाग्यावर बसला.

# प्रकरण ८ वें.

## न्याय कीं अन्याय ?

उलट्या काळानें ऐश्वर्य खुडलेल्या दुबळ्या पांडवांना हा कोरडा समाधानी वेदांत ऐकून, स्फुरण चढलेल्या दुःशासनानं आपल्या हातीं, ठेवीसारखे सांपडलेले **द्रौपदीचे** केंस जोरानें हिसकून, ती गुणनिधान स्त्री ह्मणजे एक कःपदार्थ असें कौरवांच्या हातचें खेळणें करण्याचा डाव सहज लीलेनें सुरू ठेवला, एवढेंच नव्हे, तर राजसूययज्ञाच्या शेवटीं अवभृतस्नानाचेवेळीं, केश मोकळे सोडून बांधलेली वीरगुंठी, आपल्या मगरमिठीच्या बोटांनीं किवचून केसाच्या ओढाताणीनें, **द्रौपदीच्या** मानेला हिसडे देण्यांत, त्या नरपशूनें मोठेंच शतकृत्य केल्याचा आव आणला ! तेव्हां ती पंगू झालेली पांडवांची चिच्छक्ति, भीष्मद्रोणाकडे अपेक्षित नेत्रांनीं पाहून, दीनपणें उद्गारली, " ज्ञानानं आणि अनुभवानं, मानानं आणि वयानं, राजसभा भूषित करणाऱ्या न्यायसागर सत्वमूर्तींनों, तुमच्या डोळ्यादेखत हा धडधडीत अन्याय होत आहे, इकडे डोळेझांक करूं नका. निःपक्षपातानं यांनीं मला खरोखरच जिंकलं काय, तें स्पष्ट सांगा. नसत्या धिडवड्यांनीं गांजलेली मी गयावया करून, आपल्यापाशीं अनपेक्षित दया भाकीत नाहीं, पण पदर पसरून न्याय मागतें. आपल्या दयेच्या देणगीला मी कदाचित पात्र नसेन, पण खऱ्या न्यायाच्या मागणीला मी खचीत पात्र आहे. नव्हे, तो माझा—माझाचसा काय, पण प्रत्येकाचा-विश्वास मूढ हक्क आहे. ह्मणून माझी दाद घेऊन, न्याय द्या. कौरवांनीं मला पणांत जिंकून अंकित केली असल्यास, न्यायाला आवडून होणाऱ्या हालअपेष्टेबद्दल, दाद मागण्याचें ठिकाण हें नव्हे एवढं मला समजतं. "

सभा स्तब्ध झाली. तिला न्यायाची वाचा फुटेना. खऱ्या न्यायाची स्वर्गीय देणगी, जर या मृत्युलोकावर इतकी सुलभ झाली असती, तर " वळी तो कान पिळी " या दुःखमूळ ह्मणीला ठावच उरला नसता. शिवाय " बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें " या तत्वानुसार जनतेला न्यायनिष्ठुरतेनें राजनिष्ठेचें वळण शिकविणाऱ्या न्यायाला, स्वनः

राजनिष्ठ असावयास नको काय ? आणि याच दृष्टीनें न्यायाचा कांटा राजाच्या बाजूस झुकता दिसल्यास, तो एकंदरीनें अन्याय नव्हे, असेंच ह्मणतां येईल. राजसभा दुर्योधनाची, भीष्मद्रोण हे शूर मुत्सद्दीही त्याचेच, अर्थात् न्यायही राजाचा बाजू संभाळूनच व्हावयाचा, आणि ह्मणूनच भीड न तुटून, भीष्मद्रोणांना स्पष्ट बोलतां येईना. अन्नाचा गुण आणि मिंधेपणाचा पगडा भीष्मद्रोणासारख्या करारी, पराक्रमी, सत्यनिष्ठ, निस्पृह आणि तेजस्वी पुरुष श्रेष्ठांना देखील वृत्तीची नरमाई आणण्यास कमी करीत नाहीं, तेथें दुसऱ्या पामरांची काय कथा ! संदिग्ध, गुळ-गुळीत, दुटप्पी, वस्तुत: इच्छित प्रश्नास निरुपयोगी आणि अर्थहीन, पण स्वपक्षाची बाजू संभाळून दिलेलें उत्तर, विश्वासलेल्या द्रौपदीला मुळीच पटण्यासारखें नव्हतें. भीष्म पेचांत सांपडलेल्या द्रौपदीला गौरवपर विशे-षणांनीं संबोधून ह्मणाले, " पांचाली जेथें धर्मात्मा युधिष्ठिरच स्वमुखानें " आह्मी सगळे जिंकले जाऊन, कौरवांचे अंकित झालों, " असें ह्मणतो तेथें आमच्या न्यायवचनाची काय जरूरी ? " कौरवाला स्वत्व विकलेले प्रतापी गुरुद्रोणही, भीष्मवचनालाच शेव लावून हळूंच ह्मणाले, " आणि शांत, दांत, तत्वसागर धर्म विपरीत वचन कधींच बोलायचा नाहीं. " श्रेष्ठांच्या शुद्ध वाणीतून निघालेल्या या भारदस्त न्यायाचा अर्थबोध अगर बोधार्थ, संकटव्याकुल द्रौपदीला किनपतसा हितकर हातभार लावणार होता ? एकंदरींत सुरवतीच्या मर्यादशील, चमकदार, श्रीमती बुरख्या-खालीं राजसभेतल्या सत्यपणाला, जनानी मुरके मारतां मारतां, मर्दानी निर्भिडपणा व्यक्त करण्यास, अवसरच मिळेना. राजेतरांनीं राजनिष्ठ असावें हें जितकें अगत्याचें, तितकेंच या राजनिष्ठेसाठीं राजांनीं न्यायमुखानें सत्य-निष्ठ असावें हेंही खरें आहे. ह्मणूनच कीं काय राजवंशांतल्या सत्याचा पक्ष राखण्यासाठीं, दुर्योधनबंधु विकर्ण सत्यनिष्ठेच्या आवेशांत, भांगेतल्या तुळशीसारखा सत्याच्या कैवारानें दंड थोपटून उभा राहिला; व कड-कडीच्या आवाजानें बजावून ह्मणतो, " द्रौपदीला जिंकली ह्मणताल त्याच्या जिव्हा झडतील हालहाल होतील, प्राण जातील. याशमनी जिंकली गेली नाहीं असें मी एकदां नव्हे, शंभरदां स्पष्टपणें ह्मणतों, येथें सारा अन्याय

मातला आहे. या सभेंत सद्वृत्तीचा गंधही दिसत नाहीं. धृतराष्ट्र अंतर्बाह्य आंधळा झाला आहे. पुत्रलोभानें त्याची सद्बुद्धी नष्ट झाली आहे. भीष्म द्रोण भिडेनें खरें बोलत नाहींत. शकुनी, कर्ण हे तर या कुलक्षयाचें मूळ कारणच आहेत. असल्या चांडाळचौकडींत शोभणारा राजा असुराहून असुर आहे. आज तो साम्राज्यसुखानं जरी डोळ्यांत सुखावला असला, तरी या पापाचा वचपा काढणारा अनर्थ फार दूर नाहीं, हें खूप लक्षांत ठेवा. ''

मनोवृत्तीच्या धडाधडीला, संकुचितपणाचा आळा घालणाऱ्या राजनिष्ठेची विकर्णाला फिकीर वाटत नव्हती, जरी त्याच्या स्फुटोक्तीचें एक कारण असलें, तरी असल्या अनुकूलतेचा असा स्पष्ट फायदा घेऊन, निर्भिडतेनें सत्याचें आविष्करण केल्याबद्दल त्याच्या भाषणाला देवांनीं पुष्पवृष्टि केली, व सज्जनांनीं माना डोलविल्या, आणि ह्मणूनच खलवृत्तीचा कर्ण भलतीकडेच खवळून गेला व ह्मणतो, " या धर्मानें आपल्या तोंडानें बोली करूनच जर याज्ञसेनी पणाला लावून,ती तो हरवून बसला तर त्यांत आमचा काय दोष ? आणि प्रत्यक्ष घडलेलें हें सारें खोटें ठरवुन, भलतेंच बडबडत सुटण्यांत काय अर्थ ? विकर्णा, या फाजिलपणाबद्दल तुला देहांत प्रायश्चित्त या घडीलाच दिलें असतें, पण गांधारी मातेकडे पाहून मी तुझी गय करतों. शतमूर्खा, बडालधाऱ्या माणसांना, उगीच नावें ठेवून, मारे आजोबा सारखी प्रतिष्ठित बुद्धि शिकविण्याच्या झोकांत, द्रौपदीला सभेंत आणणें अयोग्य ह्मणतोस, तें काय ह्मणून ? दासी सभेंत आणली, यांत अप्रशस्त तें काय ? त्याबद्दल एवढा बाऊ कशाला ? पांचाजणांत एक समाईक बायको, हा कुठल्या शास्त्रांतला आवडता न्याय ? आणि असली स्त्री ह्मणे महान् पतिव्रता ! चैनीनं पांच जणांनीं गमतीनें हें एक माघुक पांखरूं ठेऊन दिलें होतं झालं ! तिची कशाला एवढी प्रतिष्ठा ? घ्या या पाचा चोरांची वस्त्रें भूषणे हरण करून, आणि करा या कुलटेला नागडी. तिचें काय भय ? आणि तिला कसली लाज ! '' द्रौपदी स्वयंवराचेवेळीं फजीत पावलेल्या कर्णाला याज्ञसेनी ' कुलहीन ' ह्मणाली होती. तेव्हांचा दंश प्रसंगानुरूप उगवून घेण्यासाठींही, कर्ण द्रौपदीवर यावेळीं असा बिथरला असेल.

मलिनहृदय कर्णाच्या या विभत्स भाषणानें दुर्योधनाला अवसान चढलें. शेफारलेल्या वृत्तींत आपली मांडी उघडी करून, ती थोपटीत थोप-टीत, निर्लज्जपणें हसऱ्या चेहेऱ्यानें तो द्रौपदीला ह्मणतो, " ये, भोळे द्रौपदी ये, इकडे, या माझ्या मांडीवर बैस, आणि खुशाल माझी पट्टराणी हो." भीमाला क्रोध अनावर झाला. गदा गरगरवीत तो उठला. तो गर्जून ह्मणतो, " दुर्योधना, माझी प्रतिज्ञा ऐक. या माझ्या गदेच्या प्रहारानें तुझी मांडी चूर्ण करून, तुझा जीव घेईन, तरच मी नावाचा भीम. हें जर माझ्या हातून न घडेल, तर मला प्रसवणारी कुंती माता वंध्या म्हणावी लागेल. सोमवंशाला काळा ठिक्कर कलंक विद्रूप करील, आणि कृष्णदसयत्न व्यर्थ होईल." प्रत्यक्ष दुर्योधनाची प्राणघात करण्याची ती रणघोर वीर प्रतिज्ञा पण चालू घडीच्या घातकी सद्दीचा गोड कैफ चढलेल्या अंध पुत्राला ती दुबळ्याची पोकळ धमकावणी वाटली, एवढेंच नव्हे, तर आपल्या पुरु-षार्थी डावाला, बहारीची नवी लज्जत चढविणार तो एक खुषमस्कराचा खुशामती विनोदच आपल्याला नवी ईर्षा चढवूं लागला, असें समजून, भीमाच्या शब्दांचा उपहास करण्यासाठीं, तो आतुरतेनें द्रौपदीला म्हणाला, " प्रिये पांचाळी, तर मग तुला त्वरा केली पाहिजे. तुझें निर्भय सुखासन म्हणजेच या दुर्योधन वीराची मांडी, ती धड आहे. तेथपर्यंत चटकन् तिच्यावर बसून धन्य हो कशी ! तूं आपली ! आतां तर मी आपल्या सोन्नुकलीला अधिकच कौतुकानें मांडीवर घेईन."

असले अश्लील जहरी शब्द कोणती सत्शील साध्वी मुकाट्यानें सहन करील ? सहनशील द्रौपदीच्या अंगाचा तिळपापड झाला. प्रलयाग्नि सारखी ती लाल झाली. विजेसारखी कडकडून ती चडफडत ह्मणते, " मेल्या तुझ्या त्या अभद्रवाणीला किडे पडोत, चंडाळा तुझ्या पापी दृष्टीचे कोळसे होवोत. हिसका, इतका कसा अगदीं अवगलास ? थोडा दमधर. असा उता-वीळ होऊं नकोस. तुझ्यासाठीं भीमसेन महाराजांनीं आतांच निश्चित केलेली गदेची नवरी, रणांगणीं सुखानं मांडीवर घेऊन, थंड हो. कपाळ फुटलेल्या तुझ्या बायका, छाती बडवून भयंकर वाजंत्री वाजवतील, लढाईतल्या तुमच्या रक्ताच्या पाटांत कालवलेल्या मातीची तुला हळद लागेल, तेव्हा आपली

लाडकी सोनुकली गदा हृदयाशीं घट्ट धरून, रणभूमीच्या पलंगावर मनसोक्त सुखसोहळे भोग, आणि बंधूसह यमसदनींच साद बोलीव. " वर्मी झोंबणारे असले स्त्रीशब्दाचे शस्त्रघात दुर्योधनाला सहन झाले नाहींत. तो चवताळला आणि बेफामपणें म्हणतो, " या अवदसेचे तिळा एवढाले तुकडे करून टाका, हिची चुरचुरणारी जीभ छाटा, नाक कान कापा, दुःशासना पाहतोस काय ? फेड तिचें लुगडें आणि राजसभेंत तिला नग्न करून दाखीव. "

माकडाच्या हातांत कोलीत. तेथें कसला विचार ! दुःशासनानें आपल्या डाव्या हातानें द्रौपदी माउलींचा केशकलाप, लगामासारखा आवळून धरला व दुष्कर्मासाठीं फुरफुरणारा त्याचा उजवा हात, चमत्कारिक अडचणीत सांपडलल्या त्या तेजस्वी सतीचं कोमलांग उघडें करून, तिची भर सभेंत, लज्जाहरण करण्याच्या हेतूनें, द्रौपदीच्या नेसत्या वस्त्राच्या निऱ्या हिसकण्यास निःशंक प्रवृत्त झाला. थोडासा कठीण प्रसंग, व त्यांत कोठेंशी निराधारपणाची जाणीव, अशा स्थितींत कोणीही माणूस जर देवावर म्हणा, अगर दैवावर म्हणा, हवाला ठेवून, आपल्या आकुंचित कल्पनें पलीकडच्या अचिंत्य आणि परम मंगलमय, अशा पूज्य दैवी शक्तीची करुणा सहजींच भाकतो, तर प्राणाच्या किंमतीनेंही बचावण्यास योग्य अशी पतिव्रतेची अब्रू दुष्टांच्या अमानुष करणीनें अगदीं निराश्रित वृत्तींत सपशेल उघडी पडण्याचा दुर्धर प्रसंग येऊन ठेपतांच, मुळचीच सहृदय, ईश्वरपरायण, प्रेमळ कृष्णभक्त कृष्णा, अनन्यभावानें, हरिचरणी लीन होऊन परमेश्वराच्या दयार्द्र अंतःकरणाला प्रीतीचे पाझर फोडणाऱ्या कळवळ्यानें, मनोमन त्याला आळवीत आळवीत, पाठीराख्या यदुवीराचा सद्गदितपणें, धावा करूं लागली असल्यास, त्यांत नवल तें काय ?

# प्रकरण ९ वें.

## वस्त्रहरण.

वैकुंठपीठ निवासी भगवान् श्रीकृष्ण परमात्मा, द्वारावतीच्या भूवैकुंठांत, स्वानंद पर्यंकावर, सुखेनैव मजेंत लोळत पडला होता. स्वानुभव समाधीच्या समाधान रंगांत हरिगुण गाणारे नारद तुंबरासारखे स्तुतिपाठक आपल्या प्रेमोहाच्या आलाप लहरींनीं परमेश्वराचें श्रुतिरंजन करीत होते. उद्धव अक्रूर सारखे महान् भगवद्भक्त, यदुरायाची अप्राप्य शब्दसुमनें झेलून एकनिष्ठेनें सेवासुख जोडण्याचा स्वार्थसाधीत साधीत, भक्तवत्सल प्रभूला सारखे प्रसन्न राखण्यासाठीं, तन्मयतेच्या उत्सुकतेनें अखंड झुलत होते. क्षीरसागरनिवासी जगत्पित्याच्या कनवाळू भक्तकार्यासाठीं, मनोवेगाहून चपलतेनें धावणारा, विष्णुवाहन गरूड, सप्रेम हात जोडून, शेषशयनाचे सगुण मनोहर ध्यान, हृदयांत सांठवीत सांठवीत, आज्ञेची वाट पहात सारखा उभा होता. जन्माचे जन्म तपःसिद्धीनें खर्ची घालून, ज्याच्या चरणरज प्राप्तीसाठीं, भक्तांच्या अक्षय्य भिक्षा पडतात, त्या श्रीरंगाची जगत्पावन पद्‌कमल, चरण सेवेसाठीं, क्षीराब्धीरत्न चिच्छक्ति, श्रीरुक्मिणीदेवी, मांडीवर घेऊन, थाटलेल्या प्रपंचातील गुलगुलीत सुखकथा, मधुर हास्यानें आनंदघनाला सांगत सांगत, ईशपदी रममाण होऊन राहिली होती, व चंद्रसूर्यांच्या दीप्तीलाही दिपविणाऱ्या हरीच्या पायाच्या नखाग्रांत अनंत ब्रम्हांडाचे खेळ पाहात पाहात, तल्लीन होऊन, ब्रम्हानंदांत हर्ष निर्भर होत होती. असल्या किल्मिषहीन प्रेमविलासांत, श्रीकृष्णाचा उदार मुखचंद्र एकदम म्लान झाल्या सारखा दिसला. त्याच्या धीर गंभीर चित्तज्योतीला, चंचलतेचा वारा लागून चेहऱ्यावर व्यग्रताही दिसूं लागली. सच्चिदानंदाचा दृश्यदेह, जरी त्या निष्पाद विलास भुवनांत, सुखासनीं पहुडला होता, तरी त्याचें लोण्याहूनही मऊ मन कोठेतरी आतुरतेनें दूर गुंतल्याप्रमाणें, बाह्यशून्यता व्यक्त होत होती; व कानही कांहीं अदृष्ट करुणावाणीच्या श्रवणांत सहानुभूतिपूर्वक गर्क झाल्याप्रमाणें, सावळी कृष्णमूर्ति दंगहोऊन राहिली होती. श्रवणसंपुटांत एखाद्या भक्तवराचा मनोभंग हंबरडा घालून, आव्हाण करीत असल्याचा भास होत होत

श्रीकृष्ण अवचितपणें भ्रमिष्टासारखा रुक्मिणी देवीला म्हणाला, " ऐकलास ना माझा अंतरात्मा घराकून सोडणारी, स्नेहा जिव्हाळ्याची ही हाक, खचीत माझ्या प्रिय भावजयीणीचीच ! " देवी योगश्रुतींनी तो कौरव सभेतला **द्रौपदीचा** धावा जगाच्या मातापितरांनी द्वारकेस स्पष्टपणें असा ऐकला:--

## पद.

( चाल--कधि करिती लग्न माझें० )

" धांवे, मजसि पावें । या समया श्रीहरी ॥ धृ० ॥
कौरवें द्यूत मांडिलें । प्राण जिंकिले ।
मजसि गांजिले । विडंबन भारी ॥ १ ॥ या समया०
पांचही वीर कुंठले । पाश बांधले ।
बळ तें न चले । हो निराधारी ॥ २ ॥ या समया०
दुष्ट हे वचन बोलती । कठिण तरि अती ।
सहन करुं किती । तूंच अवधारी ॥ ३ ॥ या समया०
गाय ही, दीन एकली । व्याघ्र वृक खलीं ।
छळें कोंडिली । अनंता तारी ॥ ४ ॥ या समया०
नाचती, भुतें भ्यासुरीं । होत बावरी ।
हृदयिं तूं धरी । भीति मम वारी ॥ ५ ॥ या समया०
पीडनीं, द्वेष पेटला । अग्नि हरिणिला ।
जीव पोळला । शत्रु कांतारीं ॥ ६ ॥ या समया०
सावळ्या, मेघ तूं खरा । ये दया करा ।
वर्षें जलधरा । शीघ्र गिरिधारी ॥ ७ ॥ या समया०

मी तुम्ही, बहिण माधवा । ये रमा धवा ।
तोडि या भवा । त्रस्त संसारी ॥ ८ ॥ या समया०
आपुलें, ब्रीद राखणें । पांडवा उणें ।
काय तव गुणें । विघ्न संहारी ॥ ९ ॥ या समया०
गुंतला विसावा कुठें । जीव हा तुटे ।
धीरही सुटे । हाक मी मारी ॥ १० ॥ या समया०
हंबरे, वत्स माउली । झोंप लागली ।
दीन साउली । ऊठ कैवारी ॥ ११ ॥ या समया०
झोंबतो, मला हा अरी । झटत अंबरीं ।
दिसेना बरी । गती कंसारी ॥ १२ ॥ या समया०
गेलिया, लाज श्रीपती । देह सोडिती ।
गुजसि हुरुकिती । प्राण बाहेरी ॥ १३ ॥ या समया०
अवकळा, अशी मजकशी । प्रभू पाहसी ॥
हो न आळशी ॥ झाकि बाहेरी ॥ १४ ॥ या समया०
लज्जितां, फिटलिया निरी ॥ उरेना उरी ॥
भोंसके सुरी ॥ पितांबर धारी ॥ १५ ॥ या समया०
झणिं धांवें मजसी पावें, या समया श्रीहरी ॥धृ०॥

देवी कृष्णेची अशी ही आर्तवाणी ऐकून, कृष्णाला कोठचा दम धरवतो ? भक्तकामकल्पद्रुमाला गंहिवर आवरेना. जगन्मातेच्या हातांतला चरण तसाच ओढून घेऊन, तो लगबगीनें उठला. पितांबराचा सोगे तसेच अस्ताव्यस्त गळवळले होते. मस्तकीं मुकुट धारण करण्याचेंही स्मरण उरलें नव्हतें अर्थात् परमेश्वराचे मोकळे सुटलेले रेशमासारखे लकलकीत काळेभोर सडक केस इतःस्ततः सहज सुंदरतेनें विखुरले होते. केसाचे कुरळ आकडे क्वचित् कपाळावर येऊन शोभा देत होते. कौस्तुभादि रत्नहार कंठांत अस्ताव्यस्तच रुळत होते. साजिऱ्या सुमनमालतील सुगंध सुमनें ठाई ठाई विकळीत होऊन सांडत होतीं. अशी ती निसर्ग रुचिर कृष्णमूर्ति गरुड वाहनाची जरूरी न ठेवतां मनोवेगालाही मागें टाकून, द्रौपदीची पाठ राखण्यासाठीं कानीत लोळणाऱ्या दिव्य शेल्याचा बोळा मारून, तशीच योग्य मार्गानें धावली ही लौकीक दृष्टि झाली वस्तुतः हृदयस्थ जनार्दन ज्याचा त्याच्यापाशींच अगदीं जवळ आहे, पण तेथच्याही अलौकिक दृष्टीनें, आत्म आणि जनार्दन यांच्यामधील कल्पनातीत अंतर ओळख पटेपर्यंत, दोन ध्रुवाहूनही, कितीतरी पटीनें जास्तच असते ! द्रौपदीची अनन्यभावानं हरिचरणी एक तानता होतांच, स्थिरचर व्यापून राहणारा श्रीकृष्ण परमात्मा भक्तापाशी उभाच होता ! याच भक्तीलक्षणानं द्रौपदीच्या हाकेसरसा धावलेला यादवेंद्र, गांजलेल्या बहिणीच्या पाठीशीं उभा राहतांच, त्याच्या तेजानें द्रौपदी झांकून गेली ! सभेंत विलक्षण प्रकाश पडला. सुमन सुवासानें सभा दरवळून गेली पण हे सर्व भाव भगवद्भक्तांनाच जाणवले. द्रौपदी आल्हाद बळानें सुखावली. कृष्णानें धीर देतांच कृष्णेला अमळ अवसान आलें. “ यायला किती उशीर लावलास हा ! ” अशा लाडक्या तक्रारी बरोबरच, आसवें आणून, दुर्जनाच्या अनन्वित गांजणुकीची कहाणी स्फुंदत स्फुंदत ती मनोमन कृष्णाला सांगू लागतांच, देवानें तिचें सांत्वन करून म्हटलें, ‘ ही सारी छळणा तुझी नव्हे. तर माझ्या देवकी मातेची, असेंच मी समजतों. ’ पंडवांना कृष्णाचें येण्यानें धन्यता वाटली व त्यांच्या डोळ्यांत भक्तिपूर्ण अश्रु उभे राहिले. विदुराला अष्टभाव दाटले. भीष्मद्रोणांना परम समाधान वाटलें, पण हे सारे सभान दितरंग दुर्जनांना, कसे होत. ?

अजून द्रौपदीचें वस्त्र फिटलें नाहीं, म्हणून दुर्योधनराजा क्रोधायमान् झाला. तो रागारागानें म्हणतो, "अरे ए मदड दु:शासना, वाट कशाची पाहतोस ? भीड कुणाची धरतोस ? किंवा तूं कुणाला भितोस ? फेड तिचें लुगडें, नी कर सर्वांग उघड ! मला डोळेभर पाहूं दे." दु:शासनानें तत्काळ निरीला हिसका देऊन द्रौपदीचें वस्त्र फेडलें. तों काय चमत्कार ! आंत शुभ्र जरतारी पातळ. सर्वांना नवल वाटलें. दुष्टांना स्त्री चरित्रांचें महदाश्चर्य होऊन आपण एकवसन आहों असें सांगणारी द्रौपदी, लुगड्यांत लुगडें नेसलेली पाहतांच, तिच्या कांगावखोरपणाबद्दल त्यांना चीड आली. दु:शासनानें तेंही वस्त्र ओढून फेडलें तों आंत पिवळी साडी ! सभा तटस्थ झाली. द्रौपदीचें अंगुष्ठमात्र शरीरही उघडें मात्र पाडतां येईना, म्हणून हिरमुष्टी झालेल्या दु:शासनाला चेव आला. त्यानें तेंही वस्त्र फेडलें. तों आंत डोळे दिपविणारा भर्जरी शालू! द्रौपदीजवळ कांहीं तरी भूतचेष्टा आहेत, असेंच दुर्जनांना वाटलें. पण या साध्या भूतचेष्टा नसून महदद्भुताचे विश्वरूपी खेळ आहेत, एवढें जर त्यांना कळतें, तर त्यांना सुजनच म्हणावें लागलें असतें. वस्त्रें फेडणाराला हाव भरत चालली, व इकडे द्रौपदीच्या वस्त्रांत वस्त्र, हा क्रम सारखा सुरू झाला. त्या लुगड्यांची गणनाच करतां येणें शक्य नाहीं. लुगडीं फेडण्यांत तद्रूप झालेल्या दु:शासनाला, किंवा पाहण्यांत गढलेल्या दुष्ट सभाजनांना हा काय प्रकार घडत आहे हेंच उमगेना. बिचाऱ्या दु:शासनाचे हात वस्त्रें फेडतां फेडतां थरून आले. तरी एकावर एक उंची वस्त्रें आंत आहेतच ! तांबडीं, हिरवीं, पोपटी कुसुंबी, निळीं, अस्मानी, पिवळीं, जांभळी चौकडी, पोफळी, नामावळी, गुजरी, सहस्रकोटडी, दोरवा, चुनडी, चंद्रकळा सूर्यकळा नक्षत्रठशाचें अशीं सर्व तऱ्हेचीं.आणि सर्व देशांचीं लुगड्यांचीं ढिगें घेऊनच जर द्वारकेचा चाटी, द्रौपदीला लुगडीं पुरवीत होता तर तेथें उणें काय?

पांचालीला अनंत हस्तानें अनंत लुगडीं अनंत नेसवीत असतां आणि जिवाच्या बहिर्गामाळीं अनंत लुगड्यांचीं अनंतरूपें प्रत्यक्ष अनंतच अनंत स्थान नटून अनंत संचारांत. या अंबर वतारा ... भर घालून, आपल्या अनाद्यनंतत्व धवधवा ... प्रत्यास अर्पीत असतां. ... पाहणारा आपुल्याण

दुर्मती दुःशासन कितीसा टिकणार ? पुढें पुढें तर या बहुमोल लुगड्यावरून सृष्टिलेखनही, वेल पत्तींतून केलेलें दिसत होतें. रामायण, भारत, भागवत, हरिहर चरित्रें सहस्रनामावळ्या, यांचेंही अक्षर कुशल सुवर्ण चित्र, वस्त्रावरून सुशोभितपणें खुलत होतें. भविष्यार्थ बोलणारा भारतीय युद्धाचा चित्रपट रेखाटून, रणांगणावरील कौरवांची दुर्दशा स्पष्ट केली होती, व दुर्योधनाची मांडी फोडून, आणि दुःशासनाचें वक्षस्थल विदारून, सत्य प्रतिज्ञ रणविजयी भीमही घवघवीत चितारला होता. पण लुगड्यावरल्या या शिकारखानी चित्रांनीं सावध होण्याइतके सभेतले कुरुजन भानावर नव्हते. शेवटीं श्रीकृष्णानें आपला दिव्य पितांबर द्रौपदीला नेसविला, व ओठ चावून आपल्याशींच ह्मणाला, "या महावस्त्राला या साध्विछळक दुष्टाचा हात तर लागूं दे, कीं सुदर्शन सुटलेंच !" असें ह्मणून देवानें सुदर्शन उचललें. विदुर, द्रोण व भीष्म यांनीं हा भावी अनर्थपात धृतराष्ट्राला स्पष्टपणें जाणविला. तेव्हां भयाभित झालेल्या दुर्योधनानें खजिलपणें दुःशासनाला आवरलें.

असला दुर्मिळ उंची वस्त्रभार, भांडारांत सांठविण्याचा हुकूम राजानें दिला खरा, पण अभाग्यांना तेथें आतां एकही वस्त्र दिसेना ! दुष्टांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडलीं. सृष्टींत दुश्चिन्हें जाणवूं लागलीं. मोठमोठे केतू आकाशांत दिसूं लागले. रक्तधारा घन वर्षूं लागला. कौरवांना धडकी भरली. सज्जनांनीं द्रौपदीस नमन केलें, व कौरवांना धिक्कार देत देत नगरजन निघून गेले. धृतराष्ट्रानें आपला दुबळेपणा व्यक्त करून गोड शब्दांनीं द्रौपदीची समज घातली, व झाल्या गेल्या गोष्टी विसरण्यासाठीं, तिची इच्छा पुरविण्याचें कबूल केलें. त्यावरून द्रौपदीनें द्यूतपणांत जिंकलेले सर्वभव पांडव मुक्त करून त्यांना इंद्रप्रस्थास बोळविण्याची विनंति केली, व धृतराष्ट्रानें ती लगेच मान्य केली. बायकोच्या जिवावर मुक्त झालेल्या पांडवांचा "षंढतील ह्मणून कर्णानें उपहास केला. तेव्हां अर्जुन कर्णाला म्हणाला, "कोळ्याच्या अन्नावर वाढलेल्या कुलहीना,वेळ आली म्हणजे कोण नपुंसक तें कळेल. हीच माझी प्रतिज्ञा कीं, रणांगणीं तुझें शिर उडवीन. तरच मी पंडु पुत्र विजयी विजय." घरीं गेल्यावर पांडवांनी विशेषतः द्रौपदीनें श्रीकृष्णाचे किती व

कसे उपकार मानले असतील, हें वर्णन करून सांगतां येणें कठीण आहे. भाविकपणानेंच हा भाव कळणारा आहे. कृष्णानेंही द्रौपदी, असाच मजवर लोभ आणि भाव असूं दे, म्हणजे मीही असाच तुझ्या कार्याला क्षणोक्षणीं होऊन धांव घेईन," असें सांगून तिचें सांत्वन केलें.

# प्रकरण १० वें.

## वनवास.

धृतराष्ट्रानें पांडवांचा द्रौपदीसह मोठा गौरव करून त्यांची रवानगी करण्यांत अक्षम्य मुत्सद्दी चूक केली, असें कौरवांना वाटलें. महासर्पाला डुखवून, मग तो गळ्यांतल्या ताइतासारखा प्रेमानें जवळ घेणें, म्हणजे आत्मघात करणें होय. तेव्हां कपटद्यूतानें छळलेले पांडव असे सुखासुखी मोकळे सोडणें हितकर नव्हे, असा बुद्धिभेद शकुनीकर्णादि खळ प्रतिपादूं लागले. दुर्बळ मनाच्या पुत्रहितवादी धृतराष्ट्राला तेंही खरें वाटलें. पांडवांना परत बोलावून, पुन्हां दोन डाव खेळण्याची भर देण्यांत आली. होणारें चुकत नसतें! नेमानेम ईशेच्छेनें योजलेले असतात. ईश्वरी करणी जगाच्या हितासाठींच झटत असते, असें समजून उगीच पुरुषार्थाला उणेंपणा न आणण्यासाठीं, धर्मराज, भवितव्यतेच्या प्रेरणेनें, दोन डाव टाकण्यास सिद्ध झाला! एका डावानें बारा वर्षें वनवास, व दुसऱ्या डावानें एक वर्ष अज्ञातवास, आणि या वर्षाच्या काळांत ओळखले गेल्यास पुन्हा बारा वर्षें वनवास, अशा पैजेंत पांडव हरले गेले, व त्यांच्या नशिबीं वनवास आला कौरवांचें राज्य बारा तेरा वर्षें तरी एकछत्री होऊन त्यांना परमानंद झाला. द्यूताच प्रत्यक्ष दुष्परिणाम भोगण्यासाठीं, पैजेनें वचनबद्ध झालेले पांडव वनांतरीं जाण्यास निघाले. सुभद्रा व तिचा पुत्र अभिमन्यु हीं दोघें द्वारकेस कृष्णाकडे गेलीं. द्रौपदीचे पुत्र पांचाळपुरास आजोळीं गेले, इतर पांडवांगनाही आपआपल्या माहेरास गेल्या; पण पांडवांची चिरकला द्रौपदी पतिसमागमें वनास जाण्यास सिद्ध झाली. कुंतीमाता विदुराच्या घरीं राहिली.

राज्यलक्ष्मी सोडून, वल्कलें नेसून, वनाला निघालेल्या पांडवांची दुरात्म्या कौरवांनीं खूप हेटाळणी केली. दुःशासन तर केस मोकळे सोडून टाळ पुशीत पुशीत आगाऱ्या द्रौपदीला म्हणाला, "वनवास मोठा कठीण असतो. तूं तर सुकुमार जाईच नाजुक फूल आहेस म्हणून या भिकारड्या पांडवांना सोडून तूं आवडी दुर्योधना ॥ आवडती हो होऊन मजेंत रहा कशी !

"जेंना करून भीमानें दुःशासनाला बजावलें' रणकुंडांत तुझ्यासारख्या माज लेल्या बोकडाचा पहिल्या प्रथम बळी घेईन कृतकर्माची आठवण देऊन, हा भीम तुझी छाती फोडून तुझ्या कढत रक्ताचें मनसोक्त पान करील! रणे-श्वरीची तीच तुझ्या रक्ताची उटी मी सर्वांगीं लावीन.तुझ्या रक्तानें भरलेल्या हातानेंच द्रौपदीच्या या मोकळ्या केसाची वीरगुंठी बांधीन द्रौपदीचे वस्त्र फेड-ण्यास पुढें झालेला तुझा हात उपडून काढीन, हें नुरे समजून ठेव. आज तुम्ही हसून. शब्दशस्त्रांनी आम्हां पांडवांना ताडीत आहां; पण पुढे प्रत्यक्ष लोह शस्त्रांनी जेव्हां आम्हीं उसनें घेऊं, तेव्हा तुमच्या सौभाग्यहीन स्त्रिया, हृदय पिटून, धाय मोकलून. रडत बसतील, हें भयानक चित्र तरी अक्षय डोळ्यांपुढें असूं द्या!" कौरव जरी हरले तरी त्यांच्या स्त्रियांना, पांडव वनवासास जा-तांना भावी अनर्थ सूचकतेनें वाईटच वाटलें. विदुरानें प्रेमभरीत अंतःकरणानें पांडवांना निरोप दिला. कुंतीनें तर अनावार शोक केला. तिणें द्रौपदीला पोटाशीं धरून, तिला आपल्या अश्रूंनी न्हाऊं घातलें. नगरजन मनस्वी हळ-हळले; व पांडवांबरोबर वनवास पत्करण्यासही, पुष्कळ लोक तयार होऊन निघाले. त्यांची समजुत घालून त्यांना परतविण्यास धर्माला मोठे प्रयास पडले. तथापि इंद्रप्रस्थ व हस्तनापूर येथचे योग्य ब्राह्मण धर्मसंगतीत वनवासास जाण्याला सिद्ध झालेच. धर्माच्या घरीं, परमेश्वर आपणा सर्वांचें योगक्षेम, अरण्यांतही यथास्थित चालवील. असें त्या तेजस्वी धर्मरत ब्राह्मणांनीं पांड-वांना अश्वासन दिलें.

पुढें अरण्यांत जाताना, किर्मीर नांवाचा भयानक राक्षस, विक्राळपणें आवासून पांडवावर धांवली. पांडवांनीं भ्यालेल्या द्रौपदीस सावरून धरलें; व मग भीमानें पराक्रम करून, हा बकासूर बंधु किर्मीर ठार केला. गंगातीरीं परमव्रतस्थ वृत्तींत, धर्मानें एकभावानें सूर्याची आराधना केली. पांचाळीही सूर्यभजन व सूर्यस्तवन करून तो सहस्रकिरण भास्कर आळवीत होती. त्याच्या तीव्र तपाला सविता प्रसन्न झाला. सूर्यानें पांडवांना सुग्रास अन्न प्रसवणारी थाळी देऊन सांगितलें कीं, ही थाळी, बारावर्षें पर्यंत षड्रस भरित उत्तम अन्न कोठ्यावधी जेवण रांना पुरे इतकें ... दे ... आईल.सा... जेवण होऊन ... पांचाळी जेवल्यावर ... पुसून ठेवले या

# प्रकरण ११ वें

## दुर्वास भोजन.

धर्म केविलवाण्या मुद्रेनें द्रौपदीला ह्मणतो, " द्रौपदी, आतां तूं करणार तरी काय ? आतां आपण कुणाच्या आड दडावं ? घरांत तर कणभरही अन्न नाहीं ! " द्रौपदी सद्भावाच्या धीरानें लगेच उत्तरली, " संकट कालीं हाकेला उभा ह्मणारा एक आपला कैवारी यादवराणाच समर्थ आहे ! वनवासी होऊन वनांत आल्यावर, पांडवांना भेटण्यासाठीं येऊन गेलेले इष्टमित्र, सोयरे धायरे, गणगोत अशी मंडळी व्यवहारिक सांत्वनानें पांडवांना धीर देण्यास चुकली नव्हती. त्यावेळीं यादवासह आलेला पांचालीचा जिवाचा जीवप्राण भाऊ श्रीरंगही, उपकार गहिवरानें अत्यंत विनम्र झालेल्या आपल्या बहिणीला आश्वासन देऊन, " तुझ्या अडी अडचणीच्या कसल्याही संकटकाळीं मी तुझ्या हांकेला उभा आहे; तूं अगदीं भिऊं नकोस. माझ्या- वर विसंबून सत्यसंबद्ध नीतिपूर्ण संसार शांतचित्तानें करीत राहा. " असें अभय वचन देऊनच गेला होता. अशा वचनांकित कनवाळू ईश्वरावर अढळश्रद्धा ठेवणारी द्रौपदी, कृष्णस्मरण करीत करीत, हातपाय धुवून शुचि- र्भूतपणें तुळसी वृंदावनासमोर, द्वारकेकडे हातजोडून, वृंदावन विहारी कृष्ण- मूर्तीचें ध्यान करूं लागली. यदुपति गोपाळकृष्णाचें चित्त मनोहर ढळढळीत सगुणरूप हृदयांतरीं रेखून ती त्याला आळवूं लागली. कृष्णकृपेनें द्रौपदीवर आजपर्यंत झालेले चमत्कार पूर्ण अनंत उपकार कृतज्ञतेनें स्मरून, त्या श्यामसुंदर इंदिरावराला या सत्वहानीच्या वेळीं कृपाळूपणीं धाव घेण्याची सहृद विनवणी करण्यांत, तुळशीपुढें कृष्णभगिनी कृष्णा, कृष्णरूप होऊन, कृष्णस्मरणांत, कृष्णभजनानें, कृष्ण निशांतल्या त्या कृष्णकाळीं, बाह्यसृष्टीकडे कृष्णवदन करून, अंतर्मुख वृत्तींत कृष्णच होऊन राहिली !

असल्या निश्चळ एकतानतेची सहृदय हाक, भक्ताचें सांकडें दूर कर- ण्यास सदैव आनंदानें तत्पर असलेल्या भगवंताच्या कनवाळू कर्णयुगुलांवर गे ल्याशिवाय कशी राहील ... [illegible] माणीच्या अंतर ... [illegible] रस

भरित विलासी सहभोजनाच्या गोड विनोदासाठीं उंची पक्वानाचें ऐश्वर्य-मंडित ताट विश्वजननीनें प्रणय हास्यांत डौलानें श्रीकृष्णापुढें आणून ठेवलें असेल नसेल तोंच, वनवासी कृष्णेची ही चैतन्यपूर्ण करुणामय शुद्ध वाणी श्रीकृष्णाच्या कानीं पडली. दयाघनाच्या भक्तकार्याला कोठला अवकाश! रुक्मणीच्या हातचें, पुढें आलेलें पंचपक्वानाचें ताट तसेंच सोडून, कृष्णेसाठीं कृष्ण तसाच धांव !. वृंदावनापुढें तो हृदयप्रेरित सावळा दयाघन प्रत्यक्ष पाहतांच गहिवरानें मुखव्याकुल झालेली द्रौपदी प्रेमभावानें कृष्णचरणीं मिठी घालून तीं पवित्र पदकमलें आपल्या नयनोदकानें न्हाणूं लागली. कृष्णानें तिचें सांत्वन करून तिला उठविलें व आपलें सुहास्य-वदन रुसव्याच्या म्लानपणानें लाडकें करून तो म्हणाला, "ताई, तुझी हाक ऐकून, रुक्मिणीनें वाढलेलें ताट मागें सारून, तुझ्यासाठीं मी तातडीनें धाग टाकीत धांवत आलों. मला फार भूक लागली आहे. कांहीं तरी खायला दे." द्रौपदी सलगीच्या आवाजानें पण काकुळतीस येऊन म्हणते, "हें रे काय कृष्णा ? दुर्वासमुनी शिष्यभारासह भोजनासाठीं अशा अपरात्रीं आले आणि घरांत तर मुळींच अन्न नाहीं. म्हणून तर तुला हांक मारली. नी तुलारे मी अशा वेळीं खायला काय बरं देऊ ?" कृष्ण म्हणाला, "द्रौपदी, तुझी ती थाली आहेना अन्न प्रसवणारी ? बघ तिच्यांत कांहीं असलं तर. मला किनई अगदीं थोडं इवलंसं, दिलंस तरी पुरे." द्रौपदी म्हणाली, "असं रे काय तें ? ठाऊक असून वेड्याचं सोंग पांघरतोस झालं ! कृष्णा, थाली धुवून पालथी घातली आहे. तिच्यांत रात्रीच्या वेळीं काय मिळणार ?" कृष्ण तसाच लोचटपणानें म्हणतो. "अग ताई, ती थाली तर आण इकडे, मला नीट पाहूं दे." द्रौपदीला कृष्ण शब्द अलोट होता. तिनें थाली उताणी करून कृष्णाला दाखविली. चुकून थालीला चिकटून राहिलेलं एक भाजीचें बारीकसें पान कृष्णाच्या दृष्टीस पडलें. तें द्रौपदीला दाखवून कृष्ण म्हणतो, "हें पाहिलंस. अग एवढं भाजीचें पान कृष्णार्पण करून मला दिलंस तरी पुरे" असें म्हणुन घेतल्याशिवाय न देणाऱ्या विश्वंभर कृष्णानें त्या इवल्याश्या मिटकुल्या भाजीच्या पानासाठीं द्रौपदी पुढें हात

पसरला ! द्रौपदीनें तें थालीतलें अल्प शाखा पत्र कृष्णाच्या हातावर भक्तिभावानें घातलें. त्यानेंही, तितक्याच प्रेमानें, तें जिभेनेंच चाटून, खाऊन टाकलें ! तृप्तीची ढेंकर दिली ! ! अल्पसंतोषी विश्वात्मा असा धाल्यावर त्रिभुवन तृप्तीला कितीसा उशीर ?

द्रौपदी थाली ठेवून सहज पाहते तों, वाफा टाकणाऱ्या अमृतमय स्वादिष्ट अन्नाच्या राशीच्याराशी आश्रमांत भरून राहिल्या आहेत ! अशा रीतीनें दिव्य अन्नाचा पुरवठा आश्रमांत करून, हरीनें दुसरेंच एक नवल केलें. गंगातीरीं जेथें ऋषि मंडळी स्नान करीत होती, तेथें गंगोदकांत बुड्या मारून जों मंडळी वर तटाकाकडे पाहतात तों विचित्र रचनेच्या भोजनशालांतून, रत्नदीपांचा लखलखाट डोळे दिपवीत होता. भोजनाच्या पंक्तीचे श्रीमंती थाट, जणुं अतिथींचीच वाट पाहात होते. चंदनाचे पाट, पुढें मोत्याच्या रांगोळ्या. रत्नजडित अडण्यावरून सोन्याचीं ताटें, सुगंधोदकानें भरलेल्या सोन्याच्याच झाऱ्या, पंचपक्वान्नांचा टिपदार बेत, प्रत्येक पात्रापुढें पाचूच्या झाडांतून उदबत्त्यांचे घमघमाट, असा अद्वितीय बेत पाहून, ऋषिगण संतुष्ट झाला. या मायेतील पांडवांनीं गौरव पूर्वक सर्वांना सत्कारानें पाटावरून बसविलें. मायेची देवी द्रौपदी अत्यंत चपलाईनें वाढीत होती, जशी कांहीं प्रत्येक पात्रापुढें निरनिराळी द्रौपदीच उभी आहे ! तिच्या प्रकाशानें जेवणारावर उजेड पडत होता, तिच्या हातच्या सुग्रस अन्नापुढें जेवणारांनीं प्रत्यक्ष अमृतही नको म्हणून सांगण्यास कमी केलें नसतें ! विद्युत्प्रभावसनधर मायावी कृष्ण परमात्मा, न्यूनपूर्ण पाहण्यास पंक्तींतून हिंडत होता. याच कृष्ण रचित नाटकांतला भीम " महाराज, सावकाश होऊं द्या, लागेल तें मागून घ्या, उशीर झाला आहे. " असा करद्वय जोडून प्रार्थना करीत होता. ऋषि मंडळी जेवून तृप्त झाली. सदाकाळ धर्माच्या घरीं राहून, सद्भक्तांचें असले रुचिकर पवित्र अन्न, ग्रहण करण्यास, उभयपक्षीं कल्पायुष्य असावें, असें समाधानाचे उद्गार मंडळीनें काढले. इकडे आश्रमांत पांडव द्रौपदी ऋषि मंडळी स्नान करून येण्याची वाटच पाहात होती.

गंगेवरील स्वप्नसृष्टींत जेवणोत्तर त्रयोदश गुणी तांबूल भक्षण केल्या-वर, सुगंधी उटी चर्चून, जड पोट. ऋषिमंडळी जरा लोळून मंत्राक्षता देण्यासाठीं, मुनिश्वर जो सिद्ध होताहेत, तों हें नदीकाठचें गोड स्वप्न, ओस रलें, व खरोखरच सहदेव आश्रमांतून ऋषींना जेवणासाठीं बोलावण्यास आला. अंतरज्ञानानें दुर्वासानें ही भक्तकौतुक कृष्णलीला ओळखली. तो स्वतःशी ह्मणाला दुर्योधनाच्या नादानें हरिभक्तांची छळणा सोडून, मी मात्र तपश्चर्येला आंचवलो. दुर्जनाची बुद्धि ऐकावी, सज्जनांचा छळ करावा, साधूचा अंत पाहावा, या अनर्थ मूळ आचरणानें मी आपलें फुकट हसें मात्र करून घेतलें. " सहदेवाला आशीर्वचन देऊन तो ऋषि ह्मणाला, " धर्माला माझा आशिर्वाद सांगून, तुमचें विजय कल्याण होईल, असें सांग. तुमचे शत्रू नाश पावतील. तसेच वडीलांचे सहित महासति पांचालीलाही माझा आशिर्वाद सांगण्यास विसरूं नको. त्या देवीला भगवान श्रीकृष्ण असाच अक्षय सर्वतोपरी अनुकूल राहील. " ऋषिभार तेथूनच स्वस्थानीं निघून गेला. सहदेव आश्रमांत परत आला, व मग लीला सूत्रधारी जगन्नायक प्रकटपणें पांडवांना भेटला. कौरव निर्मित ही संकट व्यथा, कृष्णकृपेमुळें मोजेनें दूर झाली. सर्वांना आनंद झाला. पांडवांनीं ऋणी होऊन कृष्णाचे अनन्य धन्यवाद गाईले. उपकारभरानें विशेषच लवलेल्या द्रौपदीसतीचें समाधान करून, " तुझ्यासाठीं मी वाटेल तेव्हां असाच धांवत येईन " असें सांगून यदुपति द्वारकेस निघून गेला.

# प्रकरण १२ वें.

## तीर्थयात्रा

सहधर्मचारिणीसह पांडवांचा काल सदाचरणांत जात होता. अर्जुन मात्र चार पांच वर्षें तीर्थाटनें करीत करीत, एकटाच फिरत होता. या प्रवासांत श्री शंकरापासून पाशुपतास्त्र प्राप्ति, व इंद्रापासून शस्त्रास्त्र विद्या, धनंजयानें नैपुण्यानें संपादन केली होती. फार वर्षें देशांतरीं दुरावलेल्या अर्जुनाबद्दल धर्मादिबंधू व सती द्रौपदी फार चिंतातुर झाला होती तोंच इंद्र लोकाकडून अर्जुनाचा समाचार घेऊन लोमशऋषी आले. त्यांनीं अर्जुनाची क्षेमता कळवितांच सर्वांचा जीव खालीं पडला. आपण कसकसें देशपर्यटन केलें, व कसकशी क्षात्रविद्या संपादन केली याबद्दलची इत्थंभूत हकीकत अर्जुनानें लोमशऋषी बरोबर कळविली होती; ती ऐकून पांडवांना व विशेषतः द्रौपदीसारख्या पति हृदयरत्न अशा प्रेमी स्त्रिला अभिमानपूर्वक संतोष वाटला. या ऋषी बरोबरच पार्थाचा असा निरोप होता कीं, आपण दोन वेळ समुद्र वलयांकित तीर्थक्षेत्र हिंडलों, वल्यार्के परम समाधान वाटलें तरी पांडवांनींही तप आणि तीर्थाटन केल्यास त्यांना दिवस विशेष त्रासाशिवाय, पुण्य मार्गांत सुखानें केव्हांच निघून जातील. अशीच सत्कर्मांचीच हौस, त्यांत विजयाचा संदेश! मग उशीर कशाचा? तीर्थयात्रा केलेल्या लोमशऋषींच्या नेतृत्वाखालींच. एके शुभदिनीं, पांडवांनी तीर्थाटनास सुरवात केली. प्रवासांतले कष्टतर देहदंड सोसण्यास मानसिक व शारीरिक तयारीचा रहशील ब्राह्मण मंडळीही थोडेबहुत पांडवांबरोबर तीर्थयात्रेस निघालीच. बाकीचे लोक इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, पांचालपूर द्वारका अशा स्थानीं जाऊन राहिले. असले खडतर प्रवास पतिसमागमांत, स्वतःच्या पुण्याप्राठीं अगर हौसेसाठीं नव्हे, तर पतीच्या सोयी साठीं आनंदानें पत्करण्यास सति द्रौपदी कर्तव्यरतपणें सिद्ध होती. कर्तव्यांतच सहजी स्वतःची सोय, हौस व पुण्यसंपादन हीं अनायासें साधून जातात, हें कर्तव्यपरायणतेनेंच समजण्यासारखें आहे. वनें उपवनें, पापसंहारक प्रख्यात तीर्थस्थानें, साक्षात्कारी देवस्थानें, इतिहास पुराण विख्यात स्थळें निरनिराळीं

रम्य माहेरघरें पाहात पाहात स्थान महात्म्यानुरूप धर्मविधी आचरत आचरत पति सानिध्यांत द्रौपदीचा काळ सदाचारानें समाधानांतच जात होता लोमशाच्या मुखानें सावित्रीसारख्या पावनपुराण कथा मनःशुद्धि करीत करीत, चित्ताचें रंजनही करीत होत्या. दानधर्माला लागेल तितकें अमित द्रव्य पांडवांना द्वारकाधीश श्रीकृष्ण पुरवीत होता

जातां जातां गंधमादन पर्वताखालीं ही यात्रेकरू मंडळी आल्या वेळीं, भयंकर वारा सुटला. त्याच्या जोरानें जडशिळाही उखडून पडूं लागल्या तेव्हां द्रौपदीसारख्या सुकुमार स्त्रीचे हाल काय विचारावे? ती मेलकांडे खाऊन पडली. तिला मूर्च्छा आली. वृत्ति भ्रमित झाली. पुढें रस्त ही दिसेना. मग भीमानें घटोत्कचाचें स्मरण करतांच, तो पुढें येऊन उभा राहिला. त्यानें चारी पांडव व पांचवी द्रौपदी, अलगत खांद्यावर घेऊन, दुर्गमकडे, बिकट चढणी, कठीण वाटा, सहजासहजीं उड्डाणानें तरून, द्वीपांतरीचा अतवर्य प्रवास, भराऱ्यानें भराभर आक्रमूं लागला. अलकनंदा, बदरिकाश्रम, व नरनारायण अशा दुस्तर ठिकाणीं जाऊन साऱ्यांनीं देव दर्शनें घेतलीं. तेथें सहस्रदल कमलाचा सुवास घमघमला होता. जसे सज्जनाचे सद्गुण, निर्दोषपणें न सांगतांच प्रगट होऊन, चित्ताला आल्हाद होऊन त्याप्रमाणें. त्या मधुर कमलसुवासानें द्रौपदीला मोहून सोडलें. तिनें भीमाचा हात धरून स्मित हास्यानें पतिचित्ताला प्रसन्न करीत करीत लाडिकपणानें म्हटलें, "मी किनई असल्या दरवळणाऱ्या सहस्रदलकमळांनीं हृदय वल्लभाची मनाजोगी मनोभावें पूजा करीन म्हणत्यें. मग मला तीं कालें, गडे हुडकून आणून द्यायचं होईल ना? आपल्यावांचून असलं साहसाचं काम यशस्वी करून, कोण बरं माझे हट्ट पुरवील? मला बाई, आपलीं तीं सहस्रदलकमळें हवींतच! मोठीं छान दिसत असतील. नाहीं?" द्रौपदीसारख्या गुणनिधान स्त्रीचा असल्या सात्विक लाडाचा लडिवाळपणा पुरविण्यास भीमसेनाला विशेषच उत्साह वाटला.

घोर अरण्यें, भयंकर श्वापदें, विचित्र विक्राळ पक्षी, कौतुकानें अवलोकन करीत करीत, मोठमोठीं गिरिकंदरें ओलांडित जातांना, एका महान पर्वतापाशीं भीमानें, महा बलाढ्य रामायणवीर हनुमंत पाहिला. ओळख

पटेपर्यंत, भीमसेन जरा स्वबळाच्या ताठ्यांत होता. लंकादहन काळचें मारुतीचें भयानकरूप पाहण्याची भीमाला इच्छा झाली. कपीश्वरानें किंचित मात्र तें उग्ररूप दाखवितांच, भीमाची गाळण झाली. कौरवादि दैत्य वधाचे कामीं आपण अर्जुनाला सहाय्य आहोंच असें सांगून चलभीम गुप्त झाला. भीम पुढें विकट पर्वतांतून चालला असतां, त्या अपरिचित अपूर्व स्थळीं जागोजाग नानाविध वर्ण रुचिर आणि ध्वनिमधुर पक्षीजाती पाहात पाहात, एका रमणीय सरोवराकाठीं येऊन पोचला. तेथें सोन्याची जमीन आणि रत्नाचे दगड अशा ऐश्वर्य मंडित ठिकाणीं स्फटिकासारख्या स्वच्छ व अमृतासारख्या मधुर जलाच्या विस्तीर्ण आणि सुबक पुष्करणी प्रफुल्लित सहस्रदल कमलांनीं जणूं हसतच होत्या! त्यांचा गोड परिमल दशदिशांत भरून राहिला होता. भीमानें पुष्कळ कमळें तोडून घेतली. इतक्यांत तेथचे कुबेराचे भयानक रक्षक भीमावर धांवले. भीमानें त्यांचा फडशा पाडला. कुबेराच्या कानीं ही हकीकत जातांच त्यानें सत्य जाणलें व कृष्ण भक्त भीमानें नेलेलीं कमलें अनाठायीं न जातां, तीं खचित उत्तम सत्कार्यींच लागतील, व शिवाय या महाबलाढ्य वीराशीं विरोध करणेंही बरें नव्हे असें खऱ्या धोरणानें ठरवून, त्यानें भीमाला अडथळा न करण्याविषयीं, आपल्या दूतांना इशारा दिला. द्रौपदीचें इच्छित साधल्याच्या आनदांत भीमसेन वायुवेगानेंच परत धर्मापाशीं आला. तेथें उरले तिघे पांडव व द्रौपदी हीं भीमाची काळजी करीत, वाटच पाहात होतीं. मग त्या अप्राप्य कमलांनीं आधीं लोमश धौम्यादि द्विजोत्तमांची पूजा करून, द्रौपदीनें मग मनासारख्या चतुरस्र कमल माळा गुंफल्या. त्या धर्म, भीम, नकुल, सहदेव, यांच्या कंठांत घालून, अत्यादरानें त्यांचें पूजन करून अर्जुन वीराची आठवण काढीत काढीत द्रौपदीनें सहस्रदल कमला विषयींचा आपल्या " मनाची हौस " पुरवून घेतली.

पुढें गंधमादन पर्वत उतरून, पांडव तेथें पर्वताच्या पायथ्याशीं राहिले असतां जटासुर नावाचा राक्षस, ब्राह्मण वेषानें धर्मपंक्तीस जेवण करून, पापदृष्टीनें द्रौपदीला उपटण्याच्या विचारानें, संधि साधण्यासाठीं टपून बसला होता. वाटमारे जसे ढोंग करतात, तशा दांभिक कडकडीत

ब्राह्मणी आचारानें, तो तापसी मंडळींत वावरत होता. एकदां घटोत्कचा-सह भीमसेन मृगयेस निघून गेला होता. लोमश धौम्यादि ब्रह्मवृंद, ब्रह्मकर्मासाठीं गंगातटाकीं गेला होता. अशावेळीं त्या जटासुरानें आश्रमातले तिघे पांडव व द्रौपदी व वेल्हाळी, यांना चटकन उचलून खांद्यावर घेतले, व आकाशमार्गे एखाद्या पांखरासारखा भराऱ्या मारीत चालला. त्यानें धर्म नकुल सहदेव यांचीं शस्त्रें देऊन आह्मासां युद्ध कर.' असें ह्मणतांच तो दुष्ट दैत्य ह्मणाला, “ तुह्माला जे निःशस्त्र केलें तें काय तुह्माला परत शस्त्रें देऊन तुम्हाशीं उगीच लढत बसण्याचा ताप करून घेण्यासाठीं ? धर्मा तूं भोळा नी खुळा ‘ शस्त्रें द्या ’ ह्मणून कां कुणीं देतं ? ती भिक कां आहे ? अरे, भीक मागायला देखील अंगांत एक प्रकारची भीक-श्री संचारावी लागते, तेव्हां कोठें मुठभर दाणे मिळतात ! तुमचीं शस्त्रें हिसकावून घेतांना जशी मी तुमच्या खुषीची पर्वा न करतां, स्वबळावर तुह्मांला, दांत पाडलेल्या व नखें उपटलेल्या व्याघ्र सिंहाच्या पंक्तीस बसविण्याचा पुरुषार्थ गाजविला, त्याप्रमाणें, असली ताकद, तर बळाच्या जोरावर कायतें करा ह्मणे आमचीं शस्त्रें द्या ! कोठेंतरी दुर्गमगिरि कपाटांत तुम्हां तिघांनां, निर्धास्तपणें, ठेवून टाकतों, भीमाचीही तशीच वाट लावतों, आणि मग ही चटकचांदणी द्रौपदी माझी वायको करून, सुखानंदांत तिला कशी फुलांत ठेऊन देतों ! ” असें त्या कामांधाचे निर्लज्ज प्रलाप ऐकून न्यायी धर्मालाही, सत्याच्या जयासाठीं भीमशक्तीचीच मार्गप्रतिक्षा करणें भाग झालें ! अर्थात धर्मराज आतुरतेनें दशदिशा पाहून, चातकासारखी भीमाची वाट पाहूं लागला. कर्मशक्तीच्या पाठिंब्याशिवाय धर्मशक्ति व्यवहारांत दुबळीच !

इतक्यांत त्याच वाटेनें भीमसेन आला. त्याचे व त्या बळिवंत असुराचें महायुद्ध झालें. बक किर्मीराहूनही तो राक्षस शक्तिमंत होता. अखेर भीमशक्ति भीमत्वानें विजयी होऊन, जयश्रीनें भीमालाच माळ घातली, व अन्यायी अभीमता पराजित झाल्यामुळें, जटासुरदैत्याचें शिर आकाशांत उंच वर उडून, भूमीवर खालीं आदळून शेंदाडा सारखें फुटलें. वर खालींची ही मायावा भूल म्हणजेच जगांतल्या व्यवहारी मुत्सद्दीपणाचें मूळ. अन्यायानें वर झालेला दैत्य, न्यायानें खलीं येतांच, ऋषिमंडळी आनंदित झाली देवांनें

फुलें उधळलीं; व भीमानें बोलावल्यासारखे ऐन वेळां येऊन द्रौपदीचें संकट निवारल्याबद्दल तिनें गहिंवरून प्राणनाथ भीमाचे अश्रुपूर्ण नेत्रांनीं अखंड उपकार मानले. द्रौपदीच्या पाण्यांनीं भरलेल्या डोळ्यांतील तळपणारें निस्सीम प्रेम पाहून धन्यतेनें भीमाचे श्रम तेव्हांच हरण झाले. पुढें लौकरच पार्थ सर्व विद्या संपादून इंद्र लोकाहून दिव्य रथांत बसून, गंधमादन पर्वतावर उतरला. त्याच्या वियोग दुःखानें आहाळलेले पांडव संतोषित झाले. द्रौपदीचा सुखमृगांकही अर्जुनाला नमस्कार करतांना प्रेमभरानें टवटवला होता. इंद्र लोकींच्या पुष्कळ दुर्लभ वस्तू द्रौपदीसाठींही अर्जुनानें बरोबर आणल्या होत्या. शस्त्रास्त्र विद्येंत तर धनंजय, सूर्यासारखा वीर्यतेजानें देदिप्यमान झाला होता. दुर्लभ स्थळें पाहात पाहात, शिबि हरिश्चंद्र अशासारख्या सत्वधीरांच्या अनेक कथा ऋषिमुखें ऐकत ऐकत,सन्मार्ग आचरणानें चित्तशांतींत परब्रह्माला साठवीत साठवीत, लौकरच पांडवांची पुण्यपावन तीर्थयात्रा संपली. मग ते द्रौपदीसह द्वैतवनांत परत आले.

वनवासाचा काल भरत आला होता, म्हणून पांडवांचा घात करण्याच्या इरायानें घोष यात्रेचें निमित्त करून कौरव, सैन्यासह द्वैतवनीं आले. पण पांडवावर घाला घालण्याचा त्यांचा इरादा ओळखून, इंद्रानें गंधर्व, वीरु पांडव हितार्थ पाठविले होते. घोषयात्रेंत दूध, दहीं पिऊन वरती यथेच्छ मदिरापान करून कौरवभार मत्त झाला होता. मदोन्मत्तपणें गंधर्वांशीं दंगामस्ती करतांच, चित्रसेन गंधर्वानें मोहनास्त्र, सोडून कौरव वेडे केले ? व त्यांना तो बांधून घेऊन चालला. पांडवांना हें समजलें. शांतिरत्न धर्मानें म्हटलें, ' त्यांच्या आमच्यांत भाऊबंदकी, पण तिसरा जर त्यांची दुर्दशा करील, तर तेथें धाव घेऊन भावाना मदत करणें आपलें काम आहे. ' भीमार्जुन धांवले. गंधर्वांनीं कौरव घोर पांडवांच्याच जिवावर उठून आले. असल्याचें सांगितलें.पांडवांनीं आपल्याला सोडविलेलें पाहून कौरवांना मेल्याहून मेल्यासारखें होऊन गेलें.तशा पाशबद्ध स्थितींत त्यांना पाहून द्रौपदी हंसून म्हणाली, " गंधर्वांनीं आज माझ्या कौरव भावोजींचा हा केवढा आदरसत्कार केला तरी ! पण माझे भावोजी आहेतच तसे. याच्याहून अधिक सन्मान केला असता तरी तो देखील कमीच झाला असता !" दुर्योधन दुःशासनानें

ओशाळगतीनें खालीं माना घातल्या. द्यूतकर्मांत सर्वस्व घालवून भणंग भिकारी झालेले, व प्रत्यक्ष भुकेबंगालागें वनवासी बनलेले पांडव. "दया, क्षमा, शांति, या चिरस्थायी सात्त्विक भांडवलावर अरण्यांतही संपत्तिमान् "देवाची वसती" करवून परम गांभीर्यानें कांतिमय सुखपद भोगण्यास चुकले नाहींत. पांडवांच्या या सुखाचा चिरंतन आत्मा ह्मणजे सती द्रौपदी, पति समागमांत प्राप्त स्थिति गोड करून, भ्रतारांच्या सुखाशीं च तादात्म्य पावून परमसमाधानानें, कृष्णचरणीं मन ठेवून, पूर्ण सुखी होती. दुःखमूळ अनर्थाची उगीच खपली काढून, धर्माला दुखवून, दुःखानें दुःखच वाढवीत बसणाऱ्या अविचाराला द्रौपदीनें आपल्या थोर मनांत थारा दिला नाहीं.

# प्रकरण १३ वें.

## जयद्रथाची फजीती.

द्वैत.राग्यांत वनश्रीनें गजबजलेला आपला शुचिर्भूत आश्रम, मोठ्या ठाकाठिकीनें अगदीं स्वच्छ-दृष्ट लागण्यासारखा स्वच्छ ठेऊन, पांडव मृगये-साठीं बाहेर वनांत गेल्यावेळीं, आश्रमांत समोरच द्रौपदी, कृष्ण चिंतन करीत करीत, आपल्या विचित्र संसारयात्रेचें स्मरण-चित्र आपल्या मनश्चक्षू पुढें आणून, श्रीकृष्णाच्या अगाध करणीबद्दल अचंबित झाली होती. आधींच सुंदर-लावण्यमय सुंदर-जगाच्या सौंदर्यसाराची मूस ओतल्या.सारखी सुंदर, त्यांत सकौतुक ब्रह्मचिंतनानें हर्ष रोमांचित झालेल्या ांतर म्याची स्पष्ट छटा पारदर्शित्वानें चेहेऱ्यावर खुलविण्यासारखी ि य सुंदर, हस्तपादादी चलनाचे व पदर सावरण्याचे अंगविक्षेपादी सहज व्यवहारही नि-र्गतःच निष्पाप सुंदर, पाणीदार गरगरीत तेजस्वी डोळ्यांचीं निर्हेतुक सहज फेकही आकर्षक सुंदर, दरदरीत सरळ नाकावर आत्मतत्वाची स्वयंसिद्ध ठाणमाण स्फूर्तीही लक्ष वेधण्या सारखी सुंदर, स्त्रीच्या अंगच्चापल्याचा आधारभूत कटिभाग सहजीच वनराजाला लाजविण्यासारखा लचकदार सुंदर, आकाश निलि-मेच्या गोड छटेनें शांतिरसांत खुलणारी अंगकांती सहजीं श्यामसुंदर, रत्नमय झळकणाऱ्या दंतपंक्ती वचनामृत-पावन सत्यसुंदर; दूरवर दरवळणारा तिचा अंगसुवास सद्गुण-सुंदर, पद्मपदाची नीतिपथ प्रचुर चालही निसर्ग प्रेरित विचार-सुंदर, जगत्कल्याणाच्या प्रेमी औत्सुक्यानें सदैव उचंबळून येणारी तिची सुमनोहर भरदार छाती विशालतेनें सधीर सुंदर, अशी सर्वतोपरी स्वभाव सुंदर, शिवशक्ती द्रौपदी, पाहाणारांच्या मनोधर्माप्रमाणें, अलंकार-हीन वनवासी साधेपणांतही, हृदयंगमच दिसत होती. चित्रकार, मूर्तिकार कदाचित् तिच्या सप्रमाण रेखलेल्या अवयवांचें निरीक्षण करण्यांत दंग होतील, भाविक त्या सगुण ईशमूर्तीला, प्रणिपात करण्यांत धन्यता मानतील, सद्गुणाकांक्षी, तिच्या प्रेमळ चेहेऱ्यावर तळपणारी गुण सौंदर्याची नीति निष्ठुर प्रभा ओळखूनच समाधान पावतील, पतिव्रता, तिच्या अलोट पति-निष्ठेचे गुणानुवाद गाण्यांतच, सार्थकता मानतील, पापभीरू जनसमाज तिचें

सौंदर्यमंडित दर्शन होतांच, विधात्याचें घटना चातुर्य वाखाणून, फार तर पांडवांना परम भाग्यवान म्हणेल, पापदृष्टि जर असल्या भुलविणाऱ्या सौंदर्याच्या आंत, विषयलोलुप अनाचार दडलाच असला पाहिजे, अशी आपल्या-वरून परीक्षा करून, असली सौंदर्यलता स्वतःला अप्राप्य असल्याबद्दल, लांब सुस्कारे सोडील, तर ह्या वेळीं ससैन्य शाल्वदेशीं लग्नासाठीं निघालेल्या जयद्रथ राजासारखे कर्मचांडाळ, असलें सौंदर्याचें नाजुक फूल, दुसऱ्याच्या संसारांत चक्क माती कालवुन अपहार बुद्धीनें लुबाडण्याचा अपकीर्तिपर यत्न करण्यासही कमी करणार नाहींत !

अशा सौंदर्य शालिनी द्रौपदीला लुब्ध होऊन, कामातुर झालेला जयद्रथ आपल्याशींच म्हणाला, "असलं रूपनिधान सोडून, अन्य नवरीला माळ घालायला कोणता मूर्ख सिद्ध होईल ? पांडवांना आपण तेव्हांच मारून टाकूं; आणि त्यांच्या ही सौख्यशक्ति हरण करून, आपण तिच्याशींच स्वच्छंदानें रममाण होऊन राहूं." तरळलेल्या ज्ञानदृष्टीला हे कामज्वरांतले बरळ बोल सयुक्तिकच वाटतात, व मग कामीजन निर्लज्जपणें, इष्ट हेतुसिद्ध्यर्थ वाटल तो बेशरमपणा करण्यास तयार होतो. जयद्रथ राजानें आपला कोटिक नावाचा दूत पांचालीकडे पाठविला. तो धीटपणें द्रौपदीपाशीं जाऊन म्हणाला, "तुझ्या या दृष्टि मधुर लावण्य तेजानें, आमचा राजा कसा दिपून गेला ! अशी तूं सौदामिनी आहेस तरी कोण ?" द्रौपदी दाराशीं उभी राहून, सहज सुंदरतेनेंच उत्तरली, "अरे वाटेच्या वाटसरा दूता, मी पंडुराजाची सून, पांडवाची सहधर्मचारिणी, पांचालाची लेक, नी श्रीकृष्णाची भगिनी. जो कोण तुझा राजा आला असेल, त्याला म्हणावं पांडव वनांत गेले आहेत, ते आले म्हंजे, आपला योग्य तो अतिथी सत्कार अगत्यपूर्वक करतील" असला सात्विक निरोप ऐकून, राजा जयद्रथ थोडाच शांत होणार होता ! तो मदन व्यथेनें वेडा झालेला जयद्रथ, रथाखालीं उतरून बेलाशक त्या साध्वीजवळ येऊन ठेपला. बिचाऱ्या सतीनें काय करावें ? तिची सौंदर्य संपन्नता हा काय तिचा दोष ? झगझगलेल्या रसरशीत विस्तवांत गोजिरवाणें फुलपाखरूं, मौजेनें झेंपावून स्वतःला जाळून घेतें, यात अग्निनारायणाचा काय अपराध ? अग्नितेज जसें जीव जाळण्यासाठीं खास

नव्हे, तसें स्त्रीचें लावण्यतेजही कामवासनेच्या अत्याचारासाठीं, खचित नव्हे.

माडी खाऊन झिंगलेल्या एखाद्या हलकट दारूबाजाप्रमाणें तो कामांध तिची मनधरणी करूं लागला. तिशीं लगट करून तो तिला गयावया करीत काकुळतीनें म्हणाला, "अग गुलाबकळी, मदन मला छळी, माळ घाल माझ्या गळीं, उलथीन मी पांडवाची तळी, घेईन त्यांचा बळी, नको करूं पळापळी!" द्रौपदी रागानें कपाळाला आठ्या चढवून म्हणते, "पण मेल्या तुजसारख्या घुंगुरड्याला मजसारखी प्रलय चपला कशी पचेल कांहीं तरी लाज धर राजा म्हणवतोस नी परस्त्रीचा अभिलाष धरतोस! आतां पांडव येतील. ते येण्याच्या आंत आपलें काळें करून, जीव वाचव कसा!" तो बोंगड कसचा ऐकतो? त्याणें तिचा पदर धरलाच: व लाचारपणें म्हणतो, "मदनाची आग, नको करूं राग, सांगेन तशी वाग, नी मग वाटेल तें माग?" द्रौपदीनें त्याला झिटकारून दूर लोटलें. तत्क्षणीं तो हत-बल उताणा पडला! पुन्हां संचारलेल्या अवसानानें तो उठला; व लगेच ती पांडवांची जीवनकळी, उचलून रथांत घातली. मग सेनेसह तो पांडवांच्या आश्रमापासून पळत सुटला. भयभीत झालेली द्रौपदी आक्रोश करून, पांडवांना हाका मारूं लागली, श्रीकृष्णाचा धावा करूं लागली. तेव्हां तिचा तो शोक विलाप ऐकून, धरणी माताही भयकंपित झाली. फडफडत उंच आकाशांत उडणारे सुंदर पक्ष्यांचे कळपही द्रौपदीवर ओढवलेला प्रसंग पांडवांना कळविण्यासाठींच, आपल्या विकलरवानें पांडवांना सारख्या हाका मारल्याप्रमाणेंच, कोलाहल करून सोडीत होते. इतक्यांत जयद्रथाचें कर्म ओढवलें, व द्रौपदीला ईश्वर पावला. पांडव मृगयेहून त्याचवेळीं परत येतांना, त्यांनीं तो पळपुटा रथ पाहिला, व त्यावर हल्ला चढविला. जयद्रथाची गाळण झाली. यथाशक्ती तो शिकस्तीनें पांडवांशीं लढला, पण भीमार्जुना सारख्या रणपंडिता पुढें बापुडवाणा जयद्रथ काय टिकणार? द्रौपदीच्या अभिलाषानें सुरतयुद्ध करूं सजलेल्या रणवराला विरथ युद्धांत फटफजीतीनें, द्रौपदी टाकून, पळतां भुई थोडी झाली. द्रौपदीनें खवळलेल्या

आवाजांत, "त्या मांगाला प्रायश्चित्त दिल्याशिवाय सोडूं नका" अशी गर्जना केली. लाथाबुक्यांनीं मऊ करून. त्याला बांधून, पांडवांनीं द्रौपदीपुढें उभा केला. क्षुर मुखी बाणानेंच त्याच्या डोक्याचे पांच पाट काढले होते. व एक मिशीही उतरली होती. तें धिंड काढण्यायोग्य अपेशी चिन्ह पाहून, अर्जुन ह्मणाला, "आपल्या दुर्योधन भगिनी दुःशीलेचे हे मानान्ह पतिराज, ह्मणजे आपले पूज्य शालक यांना जीवदान दिल्यानें गांधारी मातेला बरें वाटेल." त्याला मग पांडवांचा दास ह्मणण्यास, व धर्म द्रौपदीला नमन करण्यास भाग पाडून, सोडून दिलें. जयद्रथाला अपेशीं काळें तोंड घेऊन, जगांत वावरण्याची लाज वाटली. पांडवांचें अहित चिंतून, अनुष्ठान करण्यासाठीं, तो गंगाद्वारीं जाऊन राहिला.

पुढें लौकरच वनवासाचीं बारा वर्षें संपून, पांडवांच्या अज्ञातवासाचे दिवस येऊन ठेपले. तेव्हां मोठ्या कष्टानें धर्मरायानें आपल्या साऱ्या सत्संग परिवाराला, निरोप देऊन, आपल्याला गुप्तपणें कोठेंतरी अज्ञातवासांत वर्ष घालविलें पाहिजे असें सांगितलें. ऋषिगणादी बरोबरचा ब्रह्मवृंद दुःखी झाला. पांडवांना "बाहेर फुटून न पडतां, अज्ञातवास तडीस जाऊन, तुम्ही राज्यपद पावाल," असें आशीर्वचन देऊन, व द्रौपदीची काळजी घेण्यास बजावून, परिवार फुटला मग पांडव, हे अज्ञातवासाचे वर्ष गुप्तपणें कोठें व कसें काढावें, याबद्दल विचार करूं लागले. अरण्यवासांत प्रवासकष्ट असले तरी, स्वतंत्रता होती. अज्ञातवासांत आत्मत्व विसरून, परगृहीं पारतंत्र्याचे कठीण चटके, मुकाट्यानें सोसणें फार कठीण असतें, आणि म्हणून असल्या गुप्तवासाच्या बिकट काळांतून, द्रौपदी सारखी प्रकाशज्योती झाकून व सद्गुण परिमळाची कस्तुरी हीनत्वाच्या आकुंचित डबींत, सुरक्षित दडवून यशस्विपणें पारपाडण्याची सत्यप्रतिज्ञा जबाबदारी पांडवांना वास्तवीक मोठी जाचक होती. परंतु मृगवेशानें अरणीपळवून, सरोवरतीरीं गुप्त होऊन आपले प्रश्न व सांगणाऱ्या धर्मविरहित चौघा पांडव बांधवांचें प्राण आकर्षून, पुढें धर्ममुखानें आपल्या मार्मिक प्रश्नांची बरोबर नीतिन्याय मंडित उत्तरें ऐकून, प्रसन्न झालेल्या यमधर्मानें, स्वत्रास जागणाऱ्या पांडवांना, विराटनगरींत गुप्तपणें राहण्याची आज्ञा करून, "तेथें अज्ञातवासांत तुम्हाला कोणीही ओळखणार

नाहीं," असा वर दिला होता. ब्राह्मणांचा आशीर्वाद होताच. साधुसंतही पांडवांचेंच कल्याण चिंतीत होते. प्रत्यक्ष भगवंताला कसोटीस उतरणाऱ्या पांडवांचेंच हित परम प्रिय होतें. एवंच सारीं सृष्टितत्त्वें अनुकूलतेनें पांडवांना साह्यकारी झाल्यामुळें, या सात्विक बळावरच अज्ञातवासाचें अवजड ओझें पांडवांना उचलतां आलें. तरी पण स्वतःची ओळख विसरणारा हीन स्वार्थी अज्ञातवास अत्यंत दुःसह झाल्याचे कडु अनुभव, पांडवांना तीव्रतेनें जाणवल्याशिवाय राहणार नाहींत.

# प्रकरण १४ वें.

## विराटाच्या घरीं.

दूर दक्षिणदेशीं विराटनगरींत, एके सकाळीं लांबच्या प्रवासानें श्रमित झालेली अशी एक कंगाल वस्त्रांनीं मलीन दिसणारी स्त्री राजवाड्याजवळून रेंगाळत होती. तिचे केस मोकळे असून, ते धुळीनें मळलेल्या तिच्या मुखकमलावर भ्रमरासारखे वरचेवर पुढें येत असल्यामुळें, ती ते उजव्या हातानें मागें सारीत होती. तेथच्या तिच्या नवखेपणामुळें नव्हे, पण हीन दीन आभरणांनींही गोड दिसणाऱ्या तिच्या सुस्वरूपतेमुळें, जनतेचे डोळे तिजकडे लागून राहिले होते. इतक्यांत राजमहालाच्या गवाक्षांतून खुद्द राणीचीही तिजकडे नजर गेली, व त्या दारिद्र्य शोभित लावण्याचें कौतुक वाटून तीला बोलावण्यासाठीं, राणी सुदेष्णेनें दासी पाठवून दिली. राणी पुढें ती नवखी स्त्री जातांच तिची भारदस्त ठेवण पाहून तर, राणी चकितच झाली. राणी सुदेष्णा ह्मणाली, "बाई, तुम्ही कोण, कुठल्या? इकडे अगदीं नवख्या दिसतां?" ती नवखी स्त्री आपल्या अतिमधुर आवाजानें ह्मणते," काय सांगू बाई? दैवाची कहाणी मोठी विचित्र आहे. माझें नांव सैरंध्री. पांडवपत्नी द्रौपदीची मी अगदीं जवळची मैत्रीण आहे.—नव्हे—होतें, त्यापूर्वी जगाचा जनिता जो ब्रह्मदेव त्याचा पिता जो क्षीरसागर निवासी श्रीकृष्ण परमात्मा, त्याच्या लाडक्या सत्यभामेपाशीं मी असे. सत्यभामा मजवर फार स्नेह करी. तिला मी जे वेळोवेळीं गोड शृंगार देई, ते पाहून श्रीकृष्ण तिजवर फार प्रेम करी. फुलांच्या वेण्या, फुलांच्या जाळ्या, फुलांचे शेले, फुलांचे दागिने, चंदनादी सुवासिक द्रव्यांच्या हरतऱ्हेच्या उट्यांचे चित्रविचित्र लेणें नेत्रांचीं अनेकप्रकारचीं मनमोहक अंजनें, असल्या शृंगार कुशल कला मला अवगत आहेत. पुढें द्रौपदीनें सत्यभामेपाशीं मला मागून घेतलें. आजवरी तिथंच पांचालीला प्रतिष्ठित शृंगारसाज लेवविण्यांत, मी तिची जिवलग सखी होऊन राहिलें होतें. पण बाई, कर्म ओढवलें. विवशी आड आली, नी द्यूतांत पांडव हरले, व वनवासी झाले. आतां तर बाई ह्मणें, त्यांचे अज्ञातवासाचें वरीस आलें आहे. कुठं ते बिचारे एकदम गुप्त झाले, हरी

जाणें ह्मणून मी अशी उघडीं पडलें. आपल्या पायापाशीं आसरा मिळाला तर देवच उघडलं ह्मणेन."

सुदेष्णा राणी, सैरंध्रीकडे खालीं वर पाहात पाहात, जरा हसून, साशंकपणें म्हणते, "सैरंध्री, तुला ठेवून घ्यायला कांहीं हरकत नाहीं, पण बाई, तुझ्या या अद्भुत स्वरूपावरून, रंभा उर्वशी देखील ओवाळून टाकाव्या लागतील, अशी तूं पृथ्वीपतीची पट्टराणी शोभण्यासारखी लावण्यखाणी ! म्हणून आपला जीव भितो. तुझ्या त्या मंदमधुर हास्यानें,—सहजा सहजींच का होईना—चळकणाऱ्या तुझ्या सुंदर दाताच्या हिरकण्या पाहून, मदन देखील भुलायचा. मग आमचे पुरुष म्हणजे पुरुषच ! घातली तिकडं भुरळ कीं मला घ्यावं लागेल गरळ ! दुसरी तोडच नाहीं. तव्हां एवढ्या बाबतींत तूं आणभाक देत असलीस, तर घेईन ठेवून." सैरंध्री खात्रीच्या आवाजानें म्हणते, "राणी सरकार, आपण या बाबतींत अगदीं निर्धास्त असा. मी पंचगंधर्वांची पत्नी आहें. ते सदा अंतरिक्षांत राहतात. माझा जर कुणी अभिलाष धरला, तर ते त्याला लगेच ठार करतील. एवढेंच काय, पण मजकडे जे कोणी पापी दृष्टीनें पाहातील, ते देखील तत्काल भस्म होतील. दिव्यावर झडप घालून पतंग जसा वाचायचा नाहीं. तसा माझ्या वाटेस जाऊन पापात्मा जगायचा नाहीं. तसेच मी कुणाचे पाय धुणार नाहीं. अंग रगडणार नाहीं नी उष्टं खाणार नाहीं. माझे आकाशगामी पांच गंधर्व सोडून, सारे थोर पुरुष मला पित्यासमान, तरुण भावासमान, आणि बाकीचे मुलासमान." सैरंध्रीच्या वाणींतील अधिकार वादग्रस्त नव्हताच. तिच्या म्हणण्याची यथार्थता तत्काळ पटली; व राणी सुदेष्णानें सैरंध्रीला आपल्या जवळ मोठ्या संतोषानें ठेवून घेतलें. पण भक्तसहकारी ईश्वरी मायेनें पांडवांची प्राणज्योति पांचालीस, सैरंध्री होऊन, सुदेष्णेपाशीं राहिली, हें कोणाच्याच स्वप्नींही आलें नाहीं.

सकल पृथ्वीचा करभार घेणारा राजेश्वर धर्मराज, विप्रवेषानें कंकभट होऊन, धर्मसभेचा अक्षज्ञानी ह्मणून, विराटाच्या पदरीं आश्रित होऊन राहिला. हाकेसरसे त्रिभुवन घाबरें करून सोडणारा महाभुजबल प्रतापशाली भीमसेन, खांद्यावर पळा मिरवून, धर्माचा चतुर स्वयंपाकी

ह्मणून, विराटाच्या पाकशाळेंत बल्लव नावानें स्वयंपाक्या होऊन राहिला. शस्त्रास्त्र पटु रणधुरंधर अर्जुन इंद्रलोकच्या उर्वशी अप्सरेची कामेच्छा पुरविण्यास नाकबूल झाल्यामुळें तिणें दिलेल्या विहित वेळीं उपयोगी, अशा शापानें स्त्रीवेष घेऊन, षंढपण अंगीकारून, बृहन्नटा या नावानें, धर्माची अंत:पुरांतली नटनर्तन शिक्षकीण ह्मणून, विराटाच्या नाटकशाळेत गायन वादन नर्तन हावभाव असल्या जनानी कलाकुसरी पोरींना शिकविण्यासाठीं, धनुर्धरपार्थ विराटाच्या पदरीं राहिला, सहदेव, तंतिपाल या नांवानें, धर्माचा खिल्लारी ह्मणून विराटाच्या घरीं गुरें वळूं लागला, व नकुल धर्माचा अश्वपरीक्षक ह्मणून, ग्रंथिक नावानें विराटाच्या अश्वशाळेंत घोडीं खाजवून, घोडवाला होऊन राहण्यास लाजला नाहीं. अशा रीतीनें विराटाच्या घरीं सारे पांडव अज्ञातवासाच्या दडपणाखालीं माना वाकवून, वेगवेगळीं हलकीं कामें पत्करून, विभूतिगत अग्नीसारखे झांकून राहिले होते. व्यवहारत: जरी ते असे बाहेरून भिन्न होते, तरी सारेजण आंतून एक विचारानें असत, व द्रौपदीविषयीं पराकाष्ठेची काळजी वाहात. द्रौपदी सुदेष्णेची वेणीफणी, थाटमाट, नवे नवे शृंगार, असल्या उद्योगांत सदा तत्पर असे.

अशा प्रकारें अज्ञातवासाचे कसे बसे दहा महिने गेल्यावर, एक दिवस सुदेष्णेचा प्रतापगर्वी भाऊ कीचक, बहिणीकडे आला असतां, तेथें सैरंध्री त्याच्या दृष्टीस पडली. पांचालीचें मोहक रूप पाहून, तो दुष्ट कीचक काम मोहित होऊन गेला. त्यानें सुदेष्णा बहिणीला, असली प्रत्यक्ष देवींहून सुंदर स्त्री दास्यत्वाला योग्य नव्हे असें सांगितलें, व विराटाच्या राज्याचा आधारस्तंभ होऊन राहिलेल्या सेनापती कीचकाला ह्मणजेच स्वत:ला असली लावण्यवती बायको छान शोभेल, असें तो सुदेष्णेपाशीं बोलला सैरंध्री लगेच उठून आपल्या खोलींत गेली. कामांध कीचक तिच्या मंदिरांत घुसला. त्यानें तिची फार विनवणी केली, व असलें दास्यत्वाचें हलकट काम सोडून, आपली पट्टराणी होण्यास सुचविलें तो अहंमन्य नराधम तिला ह्मणाला, "तूं माझी हो. साऱ्या सृष्टीतल्या कामिनी, मी तुझ्या दासी करून सोडीन स्वपराक्रमानें पृथ्वीचे सारे राजे

जिंकून, तुझ्या चरणीं लोळवीन सृष्टींतली सारी संपदा, तुझ्या पायीं आणून वाहीन. पण तूं मला झिडकारूं नकोस तुझ्या सौंदर्याच्या जाळ्यांत माझें मन माशासारखें अडकून तडफडत आहे. तें आशेच्या जीवनानें जगीव. सकल-पृथ्वी पादाक्रांत करणारा मी अजिंक्य वीर आहें, पण तुझ्यापुढें हा हतबल कीचक, या सुंदर मुखकमलावर भृंग होऊन गुंजारव करीत करीत, अप्राप्य अधर मधुचें पान करण्यास अगदीं उत्कंठित झाला आहे. तरी गोड नेत्र-संकेतानें त्याला एकदां अनुमोदन दे, म्हणजेच हा कीचक धन्य होईल.

सैरंध्री निषेधपूर्वक पण समजुतीच्या सुरानें म्हणाली, " कीचक वीरा तूं माझ्या नादीं लागूं नकोस. मी कांहीं खचीत तुला योग्य नव्हे. शिवाय तुला वाटते तशी, मी कांहीं कोणी क्षुद्र दासी नव्हे. मी पंच गंधर्वांची धर्म-पत्नी आहें. माझ्यावाटेस तूं जाशील, तर ते पुरुषार्थी गंधर्व तुझा प्राणघात करतील. आजवर परस्त्रीच्या अभिलाषानें कोण जय पावला आहे? असली पापबुद्धी शीलाची हानी करते, व त्यामुळें प्रतापशाली वीरही दुर्बलाहून दुर्बल होऊन, त्यांचा खेदजनक अंत होण्यास वेळ लागत नाहीं. म्हणून म्हणतें, असला खोटा विचार मनांत देखील आणूं नकोस, आलास तसा येथून माघारा जा; आणि आपल्या सद्गुणी स्त्रियांचें सौभाग्य आपल्या सद्वर्तनानें कायम ठेव. " पण त्या कामज्वरानें महाखल्लाला, हें उपदेश दुग्ध विषवतच वाटलें. तो मस्तपणें उद्गारला. " आजकाल भूतलावर मजसारखा सामर्थ्यवंत कोण आहे? अस्मादिकांच्या धाकानें सारे प्रतापी राजे महाराजे माझ्या इच्छेविरुद्ध ब्र काढीत नाहींत. मी करीन, तें आजकाल सिद्ध होईल. माझ्या आज्ञे वांचून काडीही हलत नाहीं. माझ्या बळावरच विराट सिंहासनावर दिसतो आहे! आम्ही एकशें पांच बळिवंत कीचक प्रत्यक्ष काळालाही भारी आहोंत. तेथें तुझ्या त्या पंच गंधर्वांचा एवढा काय कथा? कुठें आहेत ते दाखीव, आणि मग गम्मत पहा. हूं हूं म्हणतां त्यांना यमपुरी दाखवितों! मग तर तूं सैरंध्री, माझें ऐश्वर्य भोगण्यास, मोकळेपणानें निर्धास्त होशील ना?

सैरंध्री त्रासून म्हणते, " पण विचारभ्रष्टा, सिंहाचा भाग कोल्ह्याला कसा पचेल? हंसी कावळ्याची बायको शोभेल का? मला उगीच रानराशी म्हणून झुंकून जाऊं नकोस. मी म्हणजे प्रज्वलित अग्नीचे निखारे

आहेत असं समज. उगीच फुलपांखरासारखी उडी टाकून, फुकट मरूं नकोस. हार म्हणून विखार गळ्यांत बांधून घेण्याचा आत्मघात कां करतोस ?" कामातुर कीचकाला आपले प्रीतिपात्र क्रुद्ध शब्दांनी इतक्यांतच दुखवावेंसें न वाटल्यामुळें म्हणा, अगर सैरंध्रीला अनुकूल करून घेण्यास, कीचकभगिनी सुदेष्णा, स्वामिणीच्या नात्यानें अधिक समर्थ होईल अशा पोक्त विचारानें म्हणा, कीचकाची स्वारी सुदेष्णेकडे वळली. बहिणीला भावाच्या शुद्ध प्रेमानेंच केवळ नव्हे, तर राजाच्या राणीला, सत्ताप्राबल्यानेंही, कीचकानें सैरंध्री वश करून देण्याची सक्तीची आळी घेतली ! परंतु सैरंध्री केव्हांही कबूल होणें शक्य नाहीं हें राणीला ठाऊक होतें, आणि कीचकाला नकार देण्याची तर सोय नव्हती ! तेव्हां 'कीचक दादा, सैरंध्रीला मी अन्न घेऊन तुझ्या मंदिराला पाठवून देईन, तेथें तूं आपली मनकामना अळेबळें हवीतशी पूर्ण करून घे. ती सांगून ऐकणारी स्त्री नव्हे." अशी तडजोड काढून, सुदेष्णेनें वेळ मारून नेली. कीचक आपल्या घरीं गेला, व सैरंध्रीची वाट पाहात राहिला. सुदेष्णेनें सैरंध्रीला कीचकासाठीं, अन्नाचें ताट घेऊन जाण्यास सांगितलें, व येतांना तेथून उंची मद्य घेऊन येण्यासही सुचविलें.

सैरंध्री काकुळतीस येऊन, सुदेष्णेला म्हणाली, "त्या दुरात्म्या कीचकाचें मी मुखावलोकनही करणार नाहीं. त्याच्या मनांत माझ्याविषयीं पापवासना भडकलेली आपल्याला ठाऊक असून, असल्या आगीच्या डोंबाळांत मला कशी हो लोटता ? शिवाय तो अधमाधम अविचारानें माझ्या अंगाला झोंबायलाही कमी करायचा नाहीं, नी तसं झालं म्हंजे त्याचा काळ ओढवला म्हणून समजा ! म्हणून म्हणते आपल्या भावाच्या हितासाठीं तरी मला तिकडे धाडूं नका. मी त्याच्या नजरेसमोर न जाईन तेवढी बरी, असं आपल्यालासुद्धां नाहीं कां वाटत ? दुसऱ्याबरोबर अन्न पाठविल्यास नाहीं का चालणार ?" सुदेष्णा मायावी सुरानें म्हणते, "माझा कीचकदादा, असा कां अगदीं अवगला आहे ? मी तुला त्याच्याकडे माझ्या कामासाठीं पाठविली असतां तो खचीत असले भलते सलते प्रकार करण्याइतका कांहीं पशु नव्हे ! तूं आपलीं सांगितलें काम करून ये." धन्यावर

विसंबणाऱ्या दीन गाईला, धन्यानेंच वाघाच्या जाळींत, विश्वासानें कामासाठीं ह्मणून पाठवून, वाघाला गायीची मेजवानी केल्यांतलाच हा प्रकार झाला, असें सैरंध्रीला कां न वाटावें ? पण बिचाऱ्या गायीच्या धन्यानें तरी काय करावें ? वाघोबाला खूष ठेवणें, हें त्याचें आत्मसंरक्षण प्रेरित आद्य कर्तव्य होतें. व्यवहारनीतींत दुबळ्याचा वालापणा जरी कितीही प्रतिष्ठित असला तरी या लब्ध प्रतिष्ठेचा नंबर केव्हांही स्वार्थाच्या खालींच लागणार, हा निसर्ग धर्म आहे. अर्थात् असल्या कृतींत जर अन्यायाची छटा कोठें दिसत असेल, तर ती दुबळ्याच्या दृष्टीनेंच होय ! एरवीं यात काडीइतकाही अन्याय नाहीं असेंच कोणीही समर्थ, ठासून सांगेल. सैरंध्री तर दीन गाईहूनही दीन बनलेली होती. गाईला आंत बाहेर गायपणा असतो. पण सैरंध्रीला आंतला आपलेपणा, अज्ञातवासाच्या जाचानें, पार झांकण्यासाठीं गाईच्या दुबळतेचें दाट आवरण अभेद्य ठेवण्याइतकें, दुर्बळाहून दुर्बळ झाल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें ! दुबळ्याचा दुबळेपणा हा कांहीं समर्थांचा दोष नव्हे, कीं ज्याच्या प्रायश्चित्तार्थ त्यांनीं आत्महितास मुकावें ! दास्य पत्करलेल्या सैरंध्रीला, दुराचाराची पाठ राखणाऱ्या सुदेष्णेच्या ह्मणण्या-प्रमाणें, अन्नाचें ताट घेऊन, कीचकाच्या मंदिराकडे जाणें भाग पडलें.

# प्रकरण १५ वें

## कीचकाकडे.

काय हा दुर्धर प्रसंग? वेळीं कोणीं कोणाचें नव्हे! ज्याचा तो, हाचें खऱ्या भगवंताचा आधार! तोच दुबळ्याचा वाली परमेश्वर! सैरंध्रीनें आपलें आपण रक्षण करून घेतलें पाहिजे, हेंच खरें. सत्वशील, कर्तव्यरत, करारी महा पतिव्रता सैरंध्री, घळ घळ अश्रुमोचन करीत करीत, अन्नाचें ताट घेऊन, जड पावलांनींच बाहेर पडली. तिनें आपल्या पाठिराख्या श्री कृष्णाला अंतरात्म्यांत कळवळ्यानें हाक मारली, व आपल्याशींच म्हटलें, नारायणा, जर माझें शुद्ध मन तुझ्या भजनीं अनन्यरत असेल जरि मी खरी पतिपरायण साध्वी असेन,नी जर तूं अनाथन्यायी नाथ असशील, तर या दुष्ट दांडग्या छळ करणाऱ्या कीचकाला पूर्ण क्षीण करून सोड, नी माझं तूं सर्वस्वी संरक्षण कर." असें म्हणुन दशदिशा शून्यतेनें न्याहाळीत न्याहाळीत वर आकाशांत देदीप्यमान सूर्यनारायण तळपत होता, त्याच्याकडे तिनें पाहिलें, व मग सद्गदीतपणें ती शोकविकल सैरंध्री म्हणते, " हे सूर्य नारायणा, जगां तला तूं सारा अंधेर नाहींसा करून, आपल्या विमल प्रकाशानें धरित्री माता सुप्रसन्न करतोस, साऱ्या सृष्टीचें तूं जीवन आहेस, तूं सर्वसाक्षी आहेस, तुझ्यापाशीं कांहीं एक लपवितां येत नाहीं, हें जर सारं खरं, तर मग माझ्या पातिव्रत्यावर घाला घालणारा सावळा गोंधळ सत्तेच्या प्रभावानं, हवा तसा धुमाकूळ घालीत सुटलेला, तुला कसा दिसत नाहीं? किंवा तो दिसून तूंही कीचकाच्या सत्ताबळाला भिऊन, सुदेष्णे प्रमाणें, मला कीचकाच्या घराचीच वाट दाखविण्यासाठीं, आपल्या प्रकाशाचे टेंभे पाजळतो आहेस? पण हे तेजोराशी दिनकरा, तुझें अमित तेज म्हणजे आमच्या सत्कर्माचरणाचीच मूर्तरूप दीप्तीना? तर मग त्या मूलभूत सदाचाणाला तुझा पाठिंबा नको कां? ही सति द्रौपदी पति निष्ठेच्या तेजानं झळकत आहे तेथवरच तुझा प्रकाश! भ्रष्टतेच्या तिमिरांत तुला कुठं हुडकावं? म्हणून हे दिनमणे, तूं कीचकाचा लुचा वाटाड्या होऊन, मला तिकडे नेऊं नकोस! या पेक्षां मला येथल्या येथे जाळून खाक करून आपल्या दिव्य तेजाशीं मिळवून घे!

हे त्रैलोक्य तमांतका, खऱ्या सतेजतेची तुला चाड असली, तर या पातिव्रत्याचें तेज तूंच रक्षण कर.' अशी सूर्याची विज्ञप्ति करून, आपल्या संकटाचा भार, जगच्चक्षु मित्रावर पूर्ण विश्वासानें सोपवून, द्रौपदी निश्चयानें पावलें उचलून, कीचकाचें घर जवळ करूं लागली. विश्वासाच्या व्यवहारांत पतीची किंमत प्राणाहून जास्त असते. पत सांभाळण्यासाठीं ह्मणजेच द्रौपदीच्या इज्जतीची ठेव जतन करण्यासाठीं, सूर्य नारायणाला, कीचकापासुन द्रौपदीचें संरक्षण करण्याची योजना करणें भाग झालें. सूर्यानें एक राक्षस गुप्तपणें द्रौपदी बरोबर तिच्या सवंगडीसारखा, संरक्षक ह्मणून ठेवून दिला.

कीचकाच्या महालांत सैरंध्रीनें पाय ठेवतांच, तो कामवेडा कीचक हसत हसतच तिच्या पुढें आला. तेथचें आपलें सारें वैभव मुद्रिकामंडित बोटांनीं व चमकदार डोळ्यांनीं सैरंध्रीला दाखवुन, तो ह्मणतो, "लाडके सैरंध्री, हें सारं वैभव तुझं. माझ्यासुद्धां या सगळ्याची तूं स्वामीण हो." सैरंध्री त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून, जाण्याच्या गडबडीनें हलकेंच म्हणते, "सुदेष्णा राणीनं आपल्यापासून उत्तम सुरा घेऊन, मला लौकर परत बोलावलं आहे." कीचक तुच्छतेनें उत्तरला, "मदिरा देऊं दुसऱ्या कुणाबरोबर तरी पाठवून. तूंच ती नेली पाहिजेस असं थोडंच आहे. दमून भागून आलेली, तूं जरा विसावा घे. क्षणभर माझ्याजवळ बैस." असें ह्मणून त्या निर्लज्जानें सैरंध्रीचा उजवा हात चटकन धरला. सैरंध्रीच्या अंगाची लाही झाली. हात हिसडून ती क्रोधभरानें ह्मणते, "मेल्या मी कांहीं बाजारबसवी नव्हे! चांडाळा, असा काय अगदींच वाळचळलास! परस्त्रीच्या अंगावर एकदम हात टाकायला, निलाजऱ्या, तुला शंका कशी वाटली नाहीं?" सोनें तर मोहक खरेंच, पण सोन्याचा कडकडलेला अग्नितप्त रस विशेषच सतेज मोहक दिसतो! तशी संतापलेली सैरंध्री, कामलंपट कीचकाला अधिकच रमणीय दिसूं लागली. त्या सुखांतच तो आपल्या पुरुषार्थानें कौतुकून, मजेनें तिजकडे पाहून हसूं लागला. इतक्यांत सूर्यप्रेरित द्रौपदीच्या रक्षक राक्षसानें गुप्तपणें अशी एक खमंग लाथ, कीचकाच्या पेकाडांत अवचित ठेवून दिली कीं, स्वारी तळमळत बिछायतीवर उलथी पालथी होऊं लागली अशी संधी साधून, सैरंध्री तेथून निसटली. ती थेट राजसभेत, राजा विराटापुढें जाऊन उभी राहिली.


प्रधानादि सभासद, व कंकरूप धर्म, सभेंत बसलेच होते. पाठोपाठ उन्मत्त कीचक धावत आला. राजाची किंवा राजसभेची पर्वा न ठेवतां, त्यानें तेथेंच द्रौपदीचे मोकळे केस धरून तिला एक लाथ मारली. त्या बरोबर गुप्त राक्षसानें कीचकालाच गुप्तपणेंच लाथाखालीं तुडवून असा कांहीं मऊ केला कीं, डोळे पांढरे करून, तो दुराचारी कीचक मूर्च्छा येऊन पडला. सैरंध्रीची ही विडंबना पाहण्यास, बल्लव भीमही सभेंतच होता. तो मनस्वी खवळला. त्याला भान उरलें नाहीं. पत्नीच्या अपमानासाठीं कीचकाचा बळी घेण्यास, तो धावणार, इतक्यांत शांति समुद्र धर्मानें, भिवईच्या खुणेनें भीमाला थोपवून धरलें. किंबहुत उरलेल्या अज्ञात वासाच्या तीव्र अंकुशानें रणमस्त भीम मातंग, तत्क्षणीं मेंढासारखा दीन करून सोडला ! धर्मराज कंक मग अन्योक्तीनें भीमाला ह्मणाले ! " बल्लवा, स्वयंपाकासाठीं तुला जळणाला काय कमी ? त्याच्या साठीं राजसभेंत कशाला धडपडतोस ? अडाण्या, निर्जन रानांत जा हवे तसे प्रचंड वृक्ष तोडून खुशाल सरपण करून जाळ पण सांभाळ हो. चांगले वृक्ष राखावे आणि काटेरी मात्र समूळ तोडावे, हें तत्व विसरतां कामा नये. " बल्लव उमजला, व अनावर संताप गट्कन् गिळून वरून कृत्रिम शांती धरून स्वस्थ बसला. पांचालीनें एकच आक्रोश करून सोडला. तिच्या सुंदर मुखकमलावर अश्रूंचे बिंदू मोत्यासारखे चमकून खालीं घळघळत, भूमातेला स्नान घालूं लागले. ती स्फुंदस्फुंदून ह्मणते, " हे माझ्या आकाशस्थ पंच गंधर्वांनो. तुह्माला ही माझी विपरीत स्थिती पाहवते तरी कशी ? माझ्या दुर्दशेनें तुमचे प्राण कासावीस होऊन, चवताळलेल्या सिंहासारखे, तुम्ही अजून कसे धांवत नाहीं ? तुमच्या तीव्र क्रोधाग्नीच्या भडक्यात, या मेल्या कीचकाची अजून कशी राखरांगोळी होत नाहीं ? किंवा परिस्थितीला बळीपडून, विराटराजाप्रमाणें तुमचा सारा पुरुषार्थ नष्टझाला, असं मी समजूं ! विराटा, प्रजेच्या मायबाप राजा, धडधडीत तुझ्या अधिकारी डोळ्यादेखत मजसारख्या दीन अनाथ अबला गायींचा छळ अन्यायानें अप्रतिबंध चालत राहवा, नी तुह्मी साऱ्यांनीं न्यायाचे डोळे झाकावे, व सत्याच्या वाचेला भिडेचें कुलुप घालून, स्वस्थ बसावं, हें आपल्या साऱ्या सभाभूषणांना शोभतं तरी कां ! कीचकासारख्या दुष्कर्मरत प्रतिष्ठिताची आपल्याला दहशत पडावी, नी मजसारख्या सत्कर्मरत पामराची

चाड तर नव्हेच पण नुसती कींवही वाटूं नये, याहून नीतिमत्तेचा अधिक अधःपात तो काय उरला ?" जनतेला सैरंध्रीची खरी बाजू पटली, व भवितव्यता, अन्यायानें वृथा अनर्थ करणाऱ्या कीचकाचें तळपट, जनमुखानें स्पष्ट बोलून चुकली !

विराट सभेंत सैरंध्रीला कोणींच उत्तर देईना, असें पाहून, धर्मराज कंक सहृदयतेनें म्हणाला, " " बाई सैरंध्री, तुझे पांच गंधर्व तुझ्या संरक्षणार्थ कां धावत नाहींत, या बद्दल वृथा आक्रोश करून काय उपयोग ? प्रत्येक गोष्ट विहित कालीच घडून येणारी आहे. अर्थात ते गंधर्व, काळाबरोबर वेळेचीही वाटपाहत स्वस्थ बसले असतील. कर्माची गति जशी गहन, तशी कालाची गतिही, मानवी ज्ञानाला कुटिलतेनें पूर्ण दुर्गम आहे. परंतु सर्वशक्तीमान ईश्वर, न्याय अन्याय, सर्व कांहीं लक्षपूर्वक अवलोकन करून, ज्याचें त्याचें माप, ज्याच्या त्याच्या पदरांत, योग्य घालण्यास, कोणाचीही भीड धरीत नाहीं, अशी तुझ्या समजूतदार पतींचीही खात्री असेल, म्हणूनच ते तुझ्या हाकेबरोबर धावले नाहींत. येथें अशी रडत उभी राहून, विराट सभेला दुश्चिन्ह करूं नकोस. बाई, तूं आपले गाऱ्हाणें गिळून, राणीवशांत आपल्या नित्यकार्यामागें जा कशी." गरीबाची दाद ईश्वर घेईल, हा धर्माचा न्याय ! तर मग जगभर पसरलेल्या न्यायाच्या पेठी कसल्या देवघेवीनें भरभराटीस आलेल्या दिसतात ? हा बिकट प्रश्न त्याक्षणीं सत्वछळानें पीडित झालेल्या आधारहीन बिचाऱ्या सैरंध्रीला सुचण्यासारखा नव्हता.

ती त्या पावलींच राजसभेंतून परतली. विखुरलेला केशकलापरडून लाल झालेले डोळे, हृदय दाटून अमितपणें बाहेर पडणारे दुःखपूर्ण निश्वास, सुकलेल्या कमलाप्रमाणें गात्रांचा विगलितपणा, अशा दीन स्थितींत, सैरंध्री सुदेष्णेपाशीं जाऊन रडूं लागली. तिची करुणकथा ऐकून, लहान पोरांच्या करमणुकीसाठीं, जसें एखाद्याचें घर उन्हांत बांधण्याची कडक शिक्षा बोलून दाखवावी, त्याप्रमाणें, " सैरंध्रीं, भिऊं नकोस, मी त्या कीचकाला आठवण राहीलें कडक शासन करीन अं !" अशा समजुतींच्या शब्दांनीं सुदेष्णेनें सैरंध्रीचें समाधान करण्याचा प्रयत्न केला. सैरंध्री

हा वेष जरी राणीला आपल्या मुलाच्या हातच्या खेळण्यासारखा क्षुद्र वाटत असला, तरी व्यक्तिशः सैरंध्रीची किंमत, राणीला मुळींच कळत नव्हती असें नाहीं. पण कीचकापुढें ती दुर्बळ बापडी काय करणार ? झालेल्या उपमर्दाची जाणीव व सुदेष्णेच्या समजुतीच्या मवाळ शब्दांतील उणीव, पुरतेपणी ओळखूनच, सैरंध्री रागानें ह्मणाली, "तुह्मी काय कीचकाचं पारिपत्य करणार ? त्याला कृतकर्माचीं फळें भोगायला भाग पाडणारे पंचगंधर्व, कृतांतासारखे त्याच्या नरडीचा घोट घेतील, तेव्हांच स्वस्थ होतील." असें ह्मणून जळफळतच, ती आपल्या खोलीत गेली. सैरंध्रीनें कीचकाच्या चांडाळ स्पर्शापासून, पुनीत होण्यासाठीं सचैल स्नान केलें, व प्रायश्चित्तार्थ कृष्णनामाचा एकाग्रतेनं जप करण्यांत, ती कृष्णरूप होऊन गेली. हरिस्मरणानें कसलीं पापें भस्म होणार नाहींत ? इच्छा मात्रें करून ब्रह्मांडाची घडामोड करणारी आदिभवानी द्रौपदी माता, म्हणजेच अज्ञातवासाच्या व्यवहारी केंचींत दृश्यतः त्रस्त झालेली सैरंध्री, कीचक वधाचें मनांत चिंतन करीत करीत, गुपचुप आपल्या खोलीबाहेर पडून, हितगुज करण्यासाठीं, बल्लव भीमसेनाकडे गुप्तपणें गेली.



# प्रकरण १६ वें.

## खलबत.

पाककर्मप्रचुर भीम चिंताव्याकुळ स्थितींत लोळत पडला होता. त्याला पाहून द्रौपदी केविलवाण्या वृत्तीनें म्हणते, भीमसेन महाराज, असे निजलात काय ? जागे व्हा. आपण कोण, याची तरी आपल्याला आठवण आहे कां ? खरोखर ती जागृती जर असती, तर दुर्जनांनीं मांडलेला माझा अनन्वित छळ पाहून, आपल्याला मजकडे डोळेझांक करण्याची, किंवा चावला गम खाण्याची बुद्धीच झाली नसती ! ताडकन् त्या नराधमावर नर-शार्दूला सारखे आपण धावला असता ! नी त्याच्या छातीवर पाय देऊन, भीमकर्मी भीमाच्या तडकाफडकी, रोखठोक चोख न्यायाच्या आरोळीनें, त्रैलोक्य दणाणून सोडलं असतं ! पण असल्या आपलेपणाला पार विसरून, अज्ञातवासाच्या मुक्या गुलामगिरीचाच आपल्यावर अखंड जागृतीनें पूर्ण पगडा बसला आहे. म्हणुनच आत्मत्वाला अविचार समजून, भ्याडपणाच्या नीतिधैर्याची प्रसंसा करीत करीत, अपमान सहन करून, मुकाट्यानें माघार खाण्याच्या स्वतःच्या अलोट सहनशीलतेचें, धन्यवादानें, कौतुक मानण्यांतच आपण दंग आहां, याला म्हणावं तरी काय ? अज्ञातवास,—नव्हे-मनोवृत्तीचा गळफांस ! याहून फार बरा स्वतंत्र वनवास नी, या अघोर यातनांना कारण धर्माचा द्यूत विलास ! व्यास, नारद, विदुर अशा सारख्या ईश्वर पुरुषांची शिकवण विसरून युधिष्ठिरानें द्यूतकर्मात, साऱ्यांना बुडवून टाकलं ! त्याची स्वतःची तरी काय ही शोचनीय स्थिती ! तन्मय करून सोडणाऱ्या मयस-भेंत ज्याची चरणधूली, पृथ्वीच्या सर्व राजांनीं बहुमानानं आपल्या भाळीं लावावी, ज्याच्यापुढे रत्नजडीत पादुका घेऊन, उभें राहण्यांतें, राजेश्वरा-नांहीं मोठी प्रतिष्ठा वाटावी, ज्याच्या घरीं अमित अन्नदानानं भूतमात्र प्रत्यहीं तृप्त होऊन, धर्माचं अभीष्ट चिंतीत राहावं तोच हा धर्मराज, "कंका कंका," म्हणवून घेत, विराट रावाच्या करमणुकीखातर, द्यूत खेळून दुसऱ्याच्या घरीं, कसाबसा जीव जगवून राहावा, यापेक्षां हीन भाग्य तें काय ? तसंच भीमसेन महाराज, कृतांताला भाक लावणारे,

हिडिंब बकासारखे शक्तिमंत असुर लोळवणारे, भुजबळानें सहज पर्वत जमी-नीवर निजाविणारे आपण विराटाच्या पाकशाळेत पुरणहाट्न पोळ्या लाटीत लाटीत, " लड निरंजन " म्हणून बायका पोरांच्या थट्टेचा विषय होऊन, निगरगट्टपणें वरोपचारी हसण्यांतच, काळ कंठीत राहावं, याहून लाजिर-वाण्या दैवाची शिकस्त ती काय ठरली? धनंजया सारखा महान धनुर्धर कीं ज्याच्या अचुक शरसंधनापुढें, स्वर्गींचे देवही लटपटतात, तो रणभैरव महावीर विराटाच्या नृत्यशाळेंत षंढ होऊन पोरींना नाचाचे हावभाव शिक विण्यांतच कृतार्थ होऊन राहावा यापेक्षां फुटक्या नशीबाचे अधिक निष्ठुर चाळे ते काय असणार? नकुल सहदेव तर गाई घोडे राखूनच आपली पोटाची खळगी भरून सुखी आहेत! असलं मेलेलं जगणं जगून, साधायचं तरी काय, हेंच मला कळत नाहीं ! श्रीरंगाची बहीण, नी पांचालाची कन्या. म्हणजेच मी पंच पंचाननाची चंडशक्ति, भर विराटसभेंत कीचकाची लाथ खाऊनही, निलटपणें जिवंत कशी राहिलें याबद्दल मला राहून राहून आश्चर्य वाटतं! तत्क्षणींच हा देह पडता तर फार बरं झालं असतं!"

सैरंध्रीला पुढें बोलवेना तिचा कंठ भरून आला. डोळ्यांतून घळ-घळ अश्रुधारा वाहूं लागल्या. भीमाचीं नेत्रपातींही ओलीं झालीं. तो दुःखाच्या कंपित स्वरांत म्हणतो, " द्रौपदी, आमच्या जीवितसर्वस्वाचें आदिकारण होऊन राहिलेल्या तुजसारख्या निष्पाप स्त्रीरत्नाचेंही, ज्या आमच्या हातून संरक्षण होत नाहीं, त्या आमच्या शौर्यधैर्यादि प्रतापगुणांचा नामनिर्देश करून, कां वृथा कष्टी होतेस? धिःकार असो आह्मांला आणि आमच्या थट्टा विषय झालेल्या पुरुषार्थाला ! वैऱ्याच्या हातीं वर्म सांपडून आपल्या हातीं माणसानं आपली माणुसकी घालवून, स्वतःच्या डोक्यावर स्वातंत्र्यदाही गुलामगिरीचा निखारा ठेवुन, थंडगार चंदनाच्या उटीच्या शीतलतेचें दुःसह सोंग घेण्यास भाग पाडणारा हा अज्ञातवास, हे द्वारका-धीशा, यापुढें कोणाच्याही वांट्याला घालूं नकोस ! द्रौपदी, कौरवांनीं आमच्या राज्यादि सर्वस्वाच हरण केलें याबद्दल मला बिलकूल फिकीर वाटत नाहीं. पण कीचकानं जी तुला लाथ मारली, त्यामुळें माझें हृदय

कसें दुभंगून गेलें आहे ! तेथच्या तेथें त्या दुष्टाला यमसदनीं बोलविला असता, पण धर्माज्ञा आड आली ! आग लागो त्या अज्ञातवासाला ! पांचालि, आतां या गुप्त नरकवासाचे अवघे पंधरा दिवस उरले आहेत. तरी तूं भिऊ नकोस. त्या नरपशु कीचकाला हा भीम कसा अचानक दुनियेतून नाहींसा करतो तें तर पहा. " असें ह्मणून भीमानें ती आपली जीवन-वेल्हाळी, हृदयाशीं धरली. तिच्या अविरल अश्रुपातानें भीमाचें वज्र हृदय द्रवूनच कीं काय, त्याची छाती भिजली. तिच्या उष्ण श्वासानें भीमाचा प्रेमरक्षक आत्मत्ववन्हि फुलून, त्यांत कीचकाचा बळी घेण्याचा बेत ठाम करूनच, भीमानें कीचकवधाची युक्ति, आपल्या तोंडापाशीं सहजीं आलेल्या द्रौपदीच्या कानांत हळूंच गोड शब्दांनीं सांगितली. तत्क्षणीं सैरंध्रीचा मुखचंद्र किंचित् उजळला. पण योजलेल्या युक्तींत, कपटानें कां होईना, त्या दुराचाररत कीचकाला, " मी तुला वश आहे " असें ह्मणण्याचें त्या साध्वीच्या जिवावरच आल्यासारखें दिसलें. पण दुष्टभंजनाच्या डावाला, अज्ञातवासाच्या चोरींत दुसरी तोडच नव्हती. उभयतांचा बेत कायम ठरला, व द्रौपदी तेथून बाहेर पडली.

---

कामातुर जसा अविचारी, तसाच तो पुरा निलाजराही असतो. विराटसभेत, सैरंध्रीशीं, तिला लाथ मारण्यापर्यंत, अतिप्रसंग करणारा कीचक, पुन्हां सैरंध्री दृष्टीस पडतांच, तिच्याशीं लघळपणा करूं लागला. आशाळभूतपणें लाचार वृत्तींत, तो तिला ह्मणतो, " अग ए नाजुक साजुक सैरंध्री, तूं आपली मला सपशेल क्षमा कर कशी ! बेभानपणानं तुला लाथ मारण्यापर्यंत, मी मजल नेली, ही माझ्या हातून चूक झाली, नव्हे-प्रमाद अगर पाहिजे तर महान् अपराध घडला ह्मण, पण त्याबद्दल माझा राग न करतां, हे काममोहिनी सुंदरी, मला तूं आपला ह्मण, वश हो, रुकार दे; ह्मंजे मग ह्या कळसूत्री बाहुल्या विराटाचाच काय, पण कौरव-पांडवांचाही निःपात करून, हस्तनापुरचें राज्य घेऊन, तेथें मी तुला राणी करीन, इतका हा कीचक, अजिंक्यपणें बलाढ्य आहे. त्याच्यावर एकदां मेहेरनजर तरी करून पहा. " सैरंध्रीला हवा होता तोच रंग, दुर्दैवी

कीचकाच्या कमनशीबानें, आयताच जमून आला. सैरंध्री कृत्रिमतेनें त्या नीचाकडे पाहून हंसली. पण त्यामुळें उल्लू कीचकाला, अशा निर्भर आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. गहन स्त्रीचरित्र कामांधाला दिसलें नाहीं. फसव्या आपत्तिपंकांत जसजसा तो कीचक रुतूं लागला तसतसा तो निर्भयं चित्तानें अधिक खोल जाण्याचीच कपटकृति सैरंध्री आचरूं लागली. तिनें उगीचच पदर सांवरला. जरा लाजल्याचा आविर्भाव आणला. मधेंच भ्याल्यासारखें करून, "कोणी पाहात अगर ऐकत तर नाहींना ?" असा संशयी कानोसा घेण्याकरितां ह्मणून तिनें आपली जहरी नजर गरगर सभोंवतीं फेंकली. आपल्या दोघांशिवाय तेथें कुण्णी चट्पांखरूंही नाहीं, अशी सैरंध्रीच्या जिवाची खात्रीं पटल्याचें योग्य भिष बरोबर संपादून, मग ती मुत्सद्दी सैरंध्री हळूंच पण गोड शब्दांनीं त्या कामोत्सुकाला ह्मणते, "कीचकराव, नख नको तिथं कुऱ्हाड कां बरं लावावी ? खुषीचे सवदे, अशा जुलमानं का कुठं जमतात ? राजीखुषीच्या गुपचुप गमती, राजीखुषीच्या गुपचुपीनेंच, कुठं जुळल्या नी घडल्या, हें या कानाचं त्या कानाला देखील ठाऊक होतां कामा नये ! हें का वीरांचें दिग्विजय आहेत, ह्मणून त्यांचे फडकणारे जयध्वज उभे करायचें आहेत ! दिव्याखालच्या अंधेरांतल्या मौजा अंधेरांतच गोड ! दुनिया बोलून चालून दुरंगी. आंत एक व बाहेर एक. तुह्मीच पाहाना ! बाहेरून आपण मला लाथ मारली खरी, पण आंतून आपण आपला प्राण माझ्यासाठीं काढून ठेवायला तयार ! तसंच या घडीला, मला देखील आंत एक बाहेर एक, असं वागल्याशिवाय कसं चालेल ? नवऱ्याची नांदती बायको म्हंजे जगातली जागती-ज्योत बरं का ! असल्या राजरोस विस्तवाशीं उघड खेळून, कैकांनीं आपलीं घरं जाळून घेतलीं आहेत. ह्मणून ह्मणतें, प्रेमरहस्याच्या खोल गूढपणानंच सारं कांहीं मनाजोगं जुळेल. पण सुधेष्णा राणीकडे यातलं एक अक्षर देखील फुटतां कामा नये. नाहींतर भलतंच होऊन, गंधर्वांपर्यंत वार्ता जायची ! आपण त्या मोकळ्या चित्रशाळेंत नेमके दहा घटका रात्रीं मुकाट्यानें अगदीं एकटे या. बोभाट करणारा उजेड बिजेड सुद्धां, मुळीं नको. प्रेम स्वयंप्रकाशितच असतं नव्हे का ? मग

तिथं किनई...काय बाई म्हणूं...आपले मनोरथ खचित पूर्ण होतील, नी आपल्याला निर्भिडपणें अखंड सुखोपभोग घ्यायला सांपडेल" काम संमूढ कीचक असल्या भासमान-नव्हे-फसल्या अमृतसिंचनानें तरतरून, त्याचा उत्साह द्विगुणित झाला.

इकडे नगरांत सारखे अपशकून जाणवत होते. स्त्रियांना विपरीत दुष्ट-स्वप्नें पडत होतीं. विराटाची वृत्ति उत्साहहीनपणें उदास होऊन गेली होती. कीचकाला जन्मस्थानीं तर विराटाला बारावा शनी, असल्या घोडतर जोड-गोळीनें राजाचें मन, ज्योतिषानें, चिंतामग्न करून सोडलें होतें. त्यानें कीच-काला सैरंध्रीचा नाद सोडण्याबद्दल हरतऱ्हेनें विनविलें होतें. विराट म्हणाला " ही सैरंध्री-म्हणजे एक कृत्या आहे. विवशी आहे, प्रत्यक्ष अवदसा आहे. हिच्यापायीं फुकट अनर्थ ओढवेल. हिच्या वाटेला जातांच हिचे पंच गंधर्व साऱ्या विराट नगरीवर, दुःखाची वाहती नदी आणून लोटतील, आणि मग आपल्याला "पुरे पुरे" करून सोडतील. सीतेच्या अभिलाषानें रावणाचा अंत झाला!" कीचक लज्जाहीन आतुरतेनें उद्गारला, " रावणानें सीतेच्या पायांत दहा मस्तकें नमावळीं अगर अर्पण केलीं; तर सीतेहून शतपट सुंदर अशा सैरंध्रीसाठीं. मी एक मस्तक खर्ची घालण्यास तयार झालों, तर त्यांत नवल तें काय?"

# प्रकरण १७ वें.

## कीचक वध.

विराटाशीं अधिक बोलत बसण्यास, कीचक रिकामटेकडा नव्हता! त्याला प्रेमसंकेताच्या इच्छित कार्याच्या तयारी साठीं, आपल्या महालाकडे जाण्याची घाई झाली होती! तेथें त्यानें आपल्या मंदिरांत, राजविलासी पोषाखाचा थाट करण्यांत, बहुमोल मर्दानी अलंकार धारण करण्यांत, वरचेवर मिशाला पीळ भरून, आपण कसे दिसतों, हें आरशांत एकसारखें पाहण्यांत, व आपल्याच दृष्टीनें वाटणारें न्यून, जेथच्यातेथें ठाकठिकीनें, पूर्ण करण्यासाठीं पेहेरावांत फेरबदल करण्यांत, किती तरी वेळ खर्ची घातला! सुगंधी केसाच्या टिपदार वांवणींवर शिरोभागीं पीळदार कंगणीची, एका कानावर झुकती, मंदिलाची चमकी पगडी, रत्नजडित बहुमोल शिरपेंच, उजव्या कानावर लोळत पाणीदार मोत्यांचा तेजःपुंज तुरा, सुवासानें घमघमणारा भरजरी घोळदार प्रशस्त झगा, कानांत हिऱ्याचीं वीरभूषणें दोन भिवयामध्यें इष्कबाज बारीकशी काळी टिकली, डोळ्यांत सुरमा, गळ्यांत झगझगणारा मोत्यांचा कंठा हाताच्या बोटांतून चमचम झळकणाऱ्या आंगठ्या, तंग तकतकीत आतलशी तुमान, थेट हस्तनापुरी खुमखुशीत कलावतु जोडे, हातांत सोन्याचें कुसरकाम केलेल्या म्यानांतली विजेच्या जिभेसारखी तलवार, आणि कांखेंत गुलाब पाण्यानें गोड वासित केलेला बुटेदार शाला, असा हा डौलदार पेहेराव, लालीलाल विडा तोंडांत चघळीत चघळीत, आरशांत पाहून पाहून एकदाचा कायम झाला. मग अशा नखशिखांत नटलेल्या मदनमूर्तीचें स्वतःच आरशापुढें चिंतन करण्यांत बराच काळ गेला. स्वारी आपल्याशींच हसली. दिलपसंत खुषींत अकडबाज मिशा डाव्याहातानें कुरवाळीत कुरवाळीत, कीचकाला आत्मरूप न्याहाळतां, न्याहाळतां, एक विचार सुचला, तो किती समर्पक! त्याचें त्यालाच खदखदून हसायला आलें! तो स्वतःलाच म्हणाला, "वेड्या कीचका, तूं गळेकापीच्या लढाईवर कां चालला आहेस? खुळ्या, हातांत ती विरस करणारी तरवार कशाला? लडिवाळ हरिणी तीव्र शस्त्राला भ्यायची नाहीं कां? गळ्यांत गळा घालणाऱ्या

सुरत युद्धाला फुलांचाच मारा बहारीनें रंग आणतो ! " झालें राजेश्रीनीं तलवार फेकून दिली आणि गळ्यांत एक भलामोठा मयासुर-कुशल नयनरुचिर सुमनहार अडकवून दिला. हातांत फुलांचा झेला खुलूं लागला. मस्तीनें वधस्थानाकडे जाण्यासाठीं ओढ घेणाऱ्या वळीप्रमाणें, कीचक सजला खरा पण हा पुष्प-मंडित मृदुशृंगार, समोरच्या आरशांत उत्सुक नेत्रांनीं धडधडीत जागेपणीं कीचक पाहूं लागतांच, त्याला अद्भूत पणें विपरीत प्रतिबिंब दिसलें ! स्वतःची नखशिखांत मूर्ति आरशांत न दिसतां, मुंडक्या शिवाय आपलें आकंठ सजलेले धड, स्वतःच्याच डोळ्यांनीं आरशांत पाहातांच, तो चपापला ! त्यानें डोळे झांकले सैरंध्री चिंतनानें भडकलेले डोकें ठिकाण सोडून तिच्या कडेच गेल्यामुळें ते आरशांत दिसलें नसेल, असें समजून त्यानें डोळ्यावरून हात फिरवीत फिरवीत पुन्हा डोळे उघडून आरशांत पाहिलें. तों रमणीय रतिपति कीचक काममोहित हास्यानें नेहमीं प्रमाणें आरशांत तळपतांनाच त्याला दिसला ! भीति उडाली. भास मावळला. भ्रम दूर झाला. स्वारी चित्रशाळेकडे जाण्यास सिद्ध झाली. पण वेळ कोठें कीचकासारखी उतावीळ झाली होती ? ती जातां जाईना. त्याच्या मतें आपलें मार्गक्रमण करण्यांत सूर्य नारायणही अत्यंत मंदगतीनेंच रेंगाळत होता. जातांना दिवा जसा मोठा होतो, तसा भ्रष्टमति कीचक आपल्याशींच मोठा खुद्‌न राहिला होता. सूर्यालाही शासन लावून त्याला लौकर अस्ताचलीं पोंचविण्याचे धोरणी बेत तो आपल्या शौ शाली डोक्यांत योजीत होता. पण इतक्यांत त्याचें मन सैरंध्रीकडे पळालें. आपल्या प्रमाणेंच सैरंध्रीही उत्कंठित होऊन कोणाला न कळत आपल्यासाठीं-सजलेल्या या फक्कडासाठीं—चित्रशाळेंत येऊन तिष्ठत बसेल, पण ती आपल्या प्रमाणें रसभरित शृंगारी अलंकारांनीं मंडित मात्र झाली नसेल, कारण ती सांगून सवरून गरीब आणि दरिद्री ! पण वास्तवीक तिलाच दिव्य शृंगार अप्रतिम शोभेल ! आपण तिला हिरे माणकांनीं मढवून काढूं. असल्या काम्य चिंतनांतच कीचकानें अपेक्षित काळ एकदांच गांठला.

साधारणपणें अनाचारावरच मायेचें पांघरून घालणारा काळोख निर्जन चित्रशाळेंत सर्वत्र किट्टपणें दाटला होता. दुर्जन संगतीची ही लागलेली

काळोखी अंशत: तरी धुवून काढण्यासाठींच, आज सज्जनांना साहाय्य करून दुर्जनांचा भरंशानें विश्वासघात करण्याच्या कामीं हा अंधेर उद्युक्त झाला होता. त्यानें खोल खोल काजळाच्या काळ दरींत कीचकाला वेळा-शक खेचण्यास कमी केलें नाहीं. विकल्पहीन वृत्तींत मंद मंद पावलें टाकीत टाकीत धडधडणाऱ्या आशापूर्ण हृदयानें सैरंध्रीची गांठ पडण्या-साठीं कीचक अगदीं व्याकूळ झाला होता. गाढ तिमिरांत घुसतांच, तिमिरवृत्तीच्या कीचकाला तिमिरतेचें भय वाटलें नाहीं. हें खरें, पण तिमिर तमाच्या काळोखीपणांतील तेजोहीनता त्याला असह्य वाटून, काळ्या काळो-खाचा त्याला मनस्वी संताप आला. गोरा अगर प्रकाशित काळोख अशा वेळीं कीचकाला हवा होता! कारण कृष्णकृतींच्या काळ्या कभिन्न पडद्यांतून काळ्या अट्टहासानें रचलेला त्याचा शरीरभूषण लाडका शृंगार त्याच्या माशुक सैरंध्रीला कसा दिसावा, याचीच त्याला काळी पंचाईत येऊन पडली! यावर गोरा विचार सुचेना. प्रेम जरी तेजोमय असलें तरी तें पूर्ण आंधळें आहे, हें कामवेड्या कीचकाला पूर्णपणें ठाऊक होतें. यामुळें बाह्य प्रकाशाच्या कृत्रिम डोळसेपणाशिवाय, थाटाची बाह्य शोभा, सैरंध्रीच्या बाह्य दृष्टीस दाखवून, तिला बाह्यत: दिपवून सोडण्याचा बेत, जागच्या जागींच विरसपणें विरून, विचारबाह्य झाला! कामव्याप्त कीचक तसाच चाचपडत, आपलें सुखनिधान हातीं लागण्यासाठीं धड-पडत होता. तोंच माणसाच्या सुस्कारण्याचा किंचित् सुगावा कानीं येतांच, तो हरखून जाऊन ह्मणतो, " प्राणसखे सैरंध्री तूं खचीत धन्य कीं ज्या तूं मजसारखा पूर्ण प्रतापी वीर जिंकून, आपलासा करून सोडलास! प्रिये या अंधारांत आपण लपंडाव खेळू या! ये तूं मला हुडक नी मी तुला शोधतों. मग पाहूं कोण कुणाला आधीं सांपडतें. तुझ्यासाठीं सुंदर वस्त्रालंकार तयार करून ठेवले आहेत. सुंदर दासदासींची निवड, केली आहे. सुंदर मंदिरें राखून ठेवलीं आहेत तुझं माझं मन मिळून एकदां कां आपला एकंकार होऊन गेला ह्मंजे मग कशाचं भय! देऊं त्या गंधर्वांचा नि:पात उडवून, नी करूं रामाचं—नव्हे मनाचं राज्य! माझा हा आत्ताचा दिलखुष पोषाख पाहतीस तर, लाडके, तूं भुलून गेली असतीस! पण हें काय? माझ्या ऐश्वर्यसौंदर्याचं जिथें सकल स्त्रिया स्तोत्र

करून गातात, तिथें तूं एक अक्षरही मजशीं बोलत नाहीस, असें मन कठीण कां बरं केलंस ? सुंदरी, खडीसाखरेसारखे दोन गोड शब्द हळूंच बोल ग. मी ते लांब कान करून ऐकेन. नाहींतर बघ अं ! मी तुझ्या-साठीं आपला प्राण देईन, नी मग तूं पस्तावशील ! ”

मांजराचीं पिलें खाणारा बोका जसा पिलांना फसविण्यासाठीं हुबेहुब मांजरीसारखा आवाज काढतो, त्याप्रमाणें कीचकाच्या तन्मयतेला न ओळखणाऱ्या कृत्रिम आवाजांत, गोड रुकारात्मक उत्तर कीचकानें असें ऐकलें:—“ मी तर इथंच अगदीं आपल्या जवळ आहें. यायचं नी म्हटलं......” उतावळ्या कीचकानें जवळ जात जात, घाईनें म्हटलें “काय म्हटलं ? या भाग्यवान् कीचकाच्या गाढालिंगनानें तुला अखंड पावन करून सोडायची ! एवढेंचना ? ” हर्षविकल रोमांचित गात्रांनीं तो अधम हळूंच अंगस्पर्श करूं जातांच, गप्कन् त्याचें मनगट धरलें गेलें. कळतें न कळतें तों त्याच्या प्रचंड देहाला भयंकर हिसका बसून, तो धाडकन् भूमीवर उताणा आपटला; व सैरंध्रीरूप भीम त्याच्या उरावर बसला ! सैरंध्रीच्या प्रेमविषयक गोड गोड स्वप्नांत, वाहवलेला कीचक, अकल्पित प्रसंगानें एकदम शुद्धीवर आल्यासारखा झाला. कीचक म्हणतो, ही सैरंध्री नव्हे ! मर्मरंध्री वैऱ्याची स्वारी दिसते ! गंधर्व असो, वा महागंधर्व असो ! त्याची या कीचकाला काय पर्वा ? करूं दोन हात मल्लयुद्धाचे, आणि मगच बोलवूं याला यमपुरीला. तेवढी कुस्तीची डावी आवृत्ति तरी होईल,मरण याला चुकतंय् थोडंच ! याच्या मरणोत्तर उजळ माथ्यानें सैरंध्री आपलीच ! ” भीम तुच्छतेनें उद्गारला, “ तूं माकड, माझ्याशीं मल्ल-युद्धाला कितीसा टिकणार ? ” घटका दोन घटका त्या कीचकाला भीमानें खेळविलें, व मग त्याच्या छाताडावर पाय देऊन, मुष्टिघातानेंच कीच-काला व्याकुळ केल्यावर, क्षणांत त्याला रेडकाच्या आवाजासारखा घोर लागून तडफडतच त्या परस्त्री अभिलाषी दुष्ट कीचकानें प्राण सोडला ! शांत चित्तानें बल्लव भीम स्वस्थानीं गेला व मग पाळतीवर असलेल्या सैरंध्रीनें रक्षकांना उठवून, घाबरेपणानें, गंधर्वाहातीं चित्रशाळेंत कीचकाचा घात झाल्याचा बोभाट केला. लगेच गडबड उडाली. चुडी, टेंभे, मशाली

पेटल्या. कीचकाचे एकशें पांच भाऊ, कीचकासाठीं रडत आरडतच आले. कीचकस्त्रियांनीं कल्होळ उडवून दिला. राजाराणी गजबजून चित्रशाळेंत आलीं एकच हाहाःकार होऊन गेला. कीचकाचे दुरात्मेबंधू ह्मणाले, "आमचा दिग्गजासारखा पुरुषार्थी भाऊ या सट्वी सैरंध्रीसाठींच मरण पावला. धरा हिला, आणि घाला याच्याबरोबरच चितेंत ! होऊं द्या हिची जळून राखरांगोळी !" खांबाआड भयव्यग्र होऊन बसलेली सैरंध्री त्या एकशेंपांच दुष्टांनीं केंसाला धरून हुकमतीनें ओढली, व कीचकाच्या प्रेताबरोबर तिला जाळण्यासाठीं स्मशानांत घेऊन गेले. कीचकमंडळी विरुद्ध "ब्र"ही काढण्याची विराटाला छाती झाली नाहीं.

सैरंध्री मोठमोठ्यानें आक्रोश करीत होती. घाबरेपणानें चोंहीकडे पाहात पाहात, ती कळवळ्यानें अंतरात्म्यांत द्वारकापुरनिवासी भक्तवत्सलाला सारख्या हांका मारीत होती. मग तिनें आपल्या पंचगंधर्वांला आरोळी मारून "हे दुष्ट कीचक अन्यायानं मला जिवंत जाळतात" असें ओरडून सांगितलें, व या संकटकलीं मुक्ततेसाठीं त्यांना धांव घेण्यास ती विनवूं लागली. तिची करुणावाणी बल्लवाच्या कानीं पडली मात्र, तोंच तो गुप्तरूपें वेष पालटून, राजवाड्याच्या भिंती उडून, परमवेगानें उड्डाण करीत करीत, स्मशानाच्या पलीकडे जाऊन, भयानकपणें दत्त ह्मणून उभा राहिला ! मोठमोठे वृक्ष उपडून त्यानें हातीं घेतले, व चितेला अग्नि लावून, तींत सैरंध्री टाकण्याच्या सुमारास, तो भयंकर मारा करूं लागला. प्रलय हाक देऊनच त्यानें कीचकांना घाबरें करून सोडलें ! भीम कीचकांना झाडाखालीं झोडपीत सुटला तत्क्षणीं निःपात होऊन सारे कीचक मरून पडले. गेला तसा भीम गुप्तरूपें, दुर्ग, हुडे, कडे, उडून, आपल्या जाग्यावर आपला नेहमींचा बल्लववेष घेऊन, स्वस्थ बसला. मागाहून सैरंध्री आकांत करीत, ओढवलेला प्रसंग सांगण्यास, परत राजवाड्यांत आली. दूतांनींही सारे कीचक मारणाऱ्या गंधर्वांचा अलौकिक प्रताप सांगितला. सारे विराट नगर या अनर्थपातानें घाबरून गेलें राजानें साऱ्या कीचकांना एकाच चितेंत अग्नि देऊन, त्यांचें उत्तरकार्य यथाविधि साधलें. अतुल प्रतापी कीचक मारून टाकण्यास कारणीभूत होणाऱ्या सैरंध्रीबद्दल, नगरवासी

लोकांनाही वचक बसल्यासारखेंच झालें. विराटानेंही सुदेष्णेला, आ-कांतमूळ कलहकारिणी सैरंध्रीला निरोप देण्यास आज्ञा केली. असली अदृष्ट महामया, आपल्या अलौकिक सामर्थ्य सत्तेनें, काय करील आणि काय नाहीं, याबद्दल कीचकांचा मृत्यांश झाल्यापासून नगर-जनाबरोबर राजालाही, दहशत पडली होती. घडून आलेल्या कीचक हननानंतर इकडे सैरंध्री सचैल स्नान करून, कृष्ण स्मरणानें चित्ताला स्थिरता आणण्यासाठीं बराच वेळ कृष्णनाम मालेचा तिनें एकाग्र वृत्तींत जप केला. तेथून ती नर्तन शाळेंत बृहन्नटेचें दर्शन घेण्यास गेली. तेथें शिकणाऱ्या साऱ्या राजकुमारींनीं सैरंध्रीला धन्य धन्य म्हटलें. बृहन्नटा हसून म्हणाली, " सैरंध्री, कीचकांच्या तावडीतून सुटलीस एकदाची ! बरं झालं. " सैरंध्रीही विनोदानें म्हणाली, "नूपुर नाद ब्रह्माच्या विजयानंद अनुभवीत नृत्यशाळेंत तूंही सुखी आहेस ना? कीचकांच्या मर्दानी गडबडीनें तुझ्या जनानी शांततेंत व्यत्यय तर नाहीं ना आला ?" इतक्यांत सुदेष्णा राणी तेथें आली. ती सैरं-ध्रीला विनवून म्हणाली " बाई, पुरुषांना देखील, तुझं आपलं भयच पडून गेल्यासारखं झालं आहे ! तर तूं आपली आमच्या येथून जा कशी: म्हणजे साऱ्यांचाच जीव खालीं पडेल. तुझ्या पायीं काय होईल नी काय नाहीं, याचा कांहीं नेमच सांगतां येत नाहीं." सैरंध्री लगेच उत्तरली, " बाईसाहेब, अशा भिऊं नका. मला आणखी तेरा दिवस माफ करा. मग मी आपल्याला मला ठेवून घ्यायची तसदी नाहीं देणार. शिवाय माझे पंच गंधर्व तुमचं म्हणजे विराट राजाचं क्षेम कल्याणच चिंतीत असतात. आम्हीं येथून जातांना तुमच्यावर अल्प स्वल्प तरी उपकारच करून जाऊं. म्हणून अपकाराची काडी इतकीही भीति बाळगूं नका. आमच्या पासून तुम्हांला मुळींच उपसर्ग पोंचणार नाहीं. या बाबतींत आपण खुशाल निर्धास्त असा." सैरंध्रीच्या या आश्वासनपर शब्दावरून विराट मंडळी निर्धास्त होवोत वा न होवोत, आपलाच आग्रह तडीस नेण्यासाठीं कीचकांचा फन्ना पाडणाऱ्या समर्थाशीं वैर बांधून घेण्याची कोणालाच छाती नव्हती !

# प्रकरण १८ वें

## गोग्रहणादि.

प्रताप बळाचा डंका वाजलेल्या व विराट राज्याचा आधारस्तंभ असलेल्या साऱ्या कीचकांचा असा अकस्मिक नाश झाल्यामुळें, हतबळ झालेल्या विराट नगरावर स्वारी करून, तें राष्ट्र काबीच करण्याची कल्पन त्रिगर्त राजानें कौरव सभेंत, दुर्योधनाला सुचविली. दुर्योधनानें कीचकांना मारणारे पांडवच असावेत, असा तर्क करून, गोग्रहण निमित्तानें विराट नगरवीर चाल करून पांडवांना ओळखून, परत वनवासाला पाठविण्याची उत्साही योजना, अमलांत आणण्यासाठीं, स्वारीची तयारीही केली. सेनेचे दोन भाग केले, सुशर्मा वीराचे अधिपत्याखालीं तीस हजार सैन्य देऊन विराट नगरीच्या दक्षिणेकडे गोग्रहणाची तयारी केली. मागाहून बाकी सर्व वीर उत्तर गो ग्रहणाकडे वळले. दक्षिण गो ग्रहणाच्या संग्रामांत कंक धर्म, बल्लव-भीम, नकुल ग्रंथिक, व सहदेव तंतिपाळ, हेही रथारूढ होऊन शत्रूंशीं लढण्यास आले होते. सुशर्म्यानें विराटाचा पुरा पराजय करून, त्याला जिवंत पकडून नेले. तेव्हां धर्म भीमाला म्हणाला, "भीमा, आपण विराटाघरीं राहिलों आहोंत. त्याचा आपल्याला आश्रय आहे. त्याला सोडविलाच पाहिजे. पण माणसासारखा वागूनच युक्तीयुक्तीनें शत्रूला पराजित कर. राक्षसाच्या बापासारखा तुझा भीमसेनी खाक्या सुरू केलास तर तुला ओळतील. झाडें उपटायचीं तीं लहान लहानच उपट. चौघां पांडवानीं पराक्रम गाजवून, विराटाला सोडविलें, व शत्रूला पळविलें. विराटाला धन्यता वाटली. कंकाच्या इच्छेनें, विराटानेच प्रताप गाजवून, शत्रूचा पराजय केला. असा पुकारा करण्यांत आला. अशा रीतिनें विराट ससैन्य दक्षिणेकडे गुंतला असतां, कौरवादि इतर वीरसेनेसह उत्तरेकडे गोधन हरण करूं लागले.

गोपालगण राजवाड्याकडे धावले. त्यांणीं तेथेंही उत्तर गोग्रहणाची वार्ता सांगितली. त्यावेळीं फक्त विराटपुत्र उत्तरच काय तो राजवाड्यात बायकामध्यें मजेंत गोष्टी सांगत बसला होता. त्या बाळराजाला शौर्य गाजवून, आपल्या साठ सहस्र गाई सोडविण्याची गोपालांनीं सूचना केली. ओरडा

महाराजांचा अशा कृतीनें प्रताप गाजून नांव होईल, असे ते गोप म्हणाले. उत्तरही आवेशानें बोलला, भीष्म द्रोणादि वीर मी तेव्हांच जिंकीन, पण काय करूं ! मला सारथी नाहीं, म्हणून तर मी अडून पडलों आहें. नाहीं तर प्रत्यक्ष पार्थासारखा रणटपू म्हणून, आज गाजलों असतों." पोराच्या या वृथा फुशारकीच्या वल्गना ऐकून सैरंध्री हासली, व म्हणाली, " उत्तरा, ही बृहन्नटा म्हणे पूर्वी पार्थाचेंच सारथ्य करीत होती. तिला आपलीं सारथी करून जा, पुरुषार्थ गाजवायला रणांगणावर ! तुझ्या बहिणीला पाठीव तिला हांक मारायला उत्तरा मनवळवून घेऊन येईल तिला म्हणे पार्थानें जेव्हां खांडववन जाळलं तेव्हां बृहन्नटाच सारथी होती !" भावाचा निरोप घेऊन सुहास्यवदना परमसुंदर उत्तरा. नटत मुरडतच बृहन्नटेकडे कार्यार्थ गेली. पण बृहन्नटेनें हसून, "मी नृत्य गायनातली केवळ वाद्यकांतली शाहणी ! रणभूमीवर आमच्यासारख्या अग बाईनीं काय बरं करायचं ? अशी नकाराची संपादणी सुरू केली. परंतु शेवटीं उत्तराच्या हौसेच्या मोहिमेसाठीं, आपला अडाणीपणा दाखवून, सार्‍या कडून हसून घेत घेत, सारथ्य करण्याचें कबूल केलें. उत्तर रथीं व बृहन्नटा—अर्जुन सारथी अशी जोडी कौरवाचा पराभव करण्यासाठीं बाहेर पडली. बृहन्नटेकडे पाहून सैरंध्री सहेतुक समाधानानें हसली. त्या वीर पत्नीला आपल्या शौर्यशाली पतीला अज्ञातवासाच्या कोंडमाऱ्यातही अशी रणसंधी मिळालेली पाहून फार बरें वाटलें. उत्तर पोर कौरव सैन्याचा समुद्र पाहून भीतीनें पळूं लागले. बृहन्नटेनें आपण अर्जुन असल्याचें सांगून पांडव व द्रौपदी विराटगृहा कशीं राहिलीं आहेत, हें सांगितलें, व मग अर्जुनानें मोठा पराक्रम करून, कौरवांची फजीती उडविली; मोहनास्त्र घालून सार्‍या कौरवांचे वस्त्रालंकार हरण केले, व रथाचे रथ भरून आणले. उत्तराला मात्र सांगून ठेवलें कीं, तीन दिवस आम्ही पांच पांडव व साहवी द्रौपदी तुमच्या येथें असल्या बद्दलची बातमी कोठें बोलूं नकोस, व आजचा पराक्रमही तूंच केलास असा गवगवा करून सोड. हेरांनीं पुढें जाऊन राज सभेतवर्दी दिली कीं, एकट्या उत्तर वीरानें सारे कौरव जिंकून गाई सोडविल्या.

पुत्राचा-प्रताप त्यांतही बाळवयी पुत्राचा पुरुषार्थ—ऐकून कोणता बाप सुखरोमांचित होणार नाहीं ? अर्थात विराटाला पुरुषार्थ पोराची धन्यता

वाटली. त्यानें हौसेनें आपल्या सैन्याला आज्ञा केली कीं, पुढें व्हा आणि पोराच्या पाठीवर असा. कारण त्याला बृहन्नटेसारखा नपुंसक सारथी मिळून त्या बाजूनेंही पोराला पाठबळ नाहीं. पोराचा वीरोचित जयजयकार करून त्याला प्रोत्साहन देण्यास असला षंढ सारथी! कंकाला विराटाचें हें बोलणें ऐकून, हसूं आलें तो म्हणाला, " राजा, जेथें बृहन्नडा सारथी, तेथें जयाला काय उणें?" इतक्यांत विजयी उत्तर, गाई घेऊन महाद्वाराजवळ आल्याची वर्दी आली. राजा आनंदाला. वार्ताहेरांना बक्षिसें दिलीं, एवढ्याशा पोराच्या हातून भीष्म द्रोणासारखे महावीर पराजित झाल्याबद्दल, राजानें थोर कौतुक केलें. पण कंक महाराजांची "री" बृहन्नटेच्या बाजूनेंच ओढली जात होती. ते म्हणाले, " बृहन्नटेच्या सारथ्यापुढें प्रत्यक्ष काळही पुढें उभा राहावयास चळचळा कांपायचा, तेथें जय मिळाला यांत नवल तें काय? आणि यांत कौतुक तें कसलें?" स्वकीयांच्या गौरवांत सारासार विचार जरा विसरलाच जातो. एवढेसें पोर, असा अश्रुतपूर्व पराक्रम कसा करील, हें राजानें सुशर्म्याकडून झालेल्या स्वताच्या फजितीवरून तरी किंचित्सें अजमावून पाहावयाचें होतें! म्हणजे अज्ञातवासाकडे जरा दुर्लक्ष करूनच, स्वकीयांची स्तुति गाण्यास निसर्गतः प्रवृत्त झालेल्या कंकाच्या शब्दांतील बृहन्नटेची तरफदारी कितपत यथार्थ होती. इकडे राजाचें लक्ष सहजीं वेधलें असतें. पण उलट, उत्तरानें अनेक रथ भरून कौरवांचे वस्त्रालंकार हिरावून आणल्याची ताजी बातमी ऐकून, पुत्रविजयोत्सवासाठीं, गावांत गुढ्या तोरणें उभारून नगर शृंगारण्यास राजानें आज्ञा केली. मग सुखभरित अंतःकरणानें कंकाला फासे खेळण्यास राजा आग्रह करूं लागला. कंकानें आढे वेढे घेतले. तो म्हणाला, " राजा, नको तें द्यूत. द्यूत खेळून कोण सुखानें नांदला आहे या द्यूतामुळेंच, 'त्राहि भगवान्' होऊन गेलें! नल राजासारखा महान् पुण्यश्लोक या द्यूतानेंच व्यसनसागरांत लोटून दिला." खेळण्यासाठीं राजानें हातीं फासे घेतले. इतक्यांत उत्तर बालकाचे प्रतापगुण वर्णित, कांहीं नागरिक राजाकडे आले. कंक भटजी गप्प बसले असते तर काय बिघडलें असतें! पण आत्मत्वाचें पाणी आपल्या वळणानेंच जाणार! त्यांनीं पुन्हा बृहन्नटेचीच "री" ओढून म्हटलें, "अहो, बृहन्नडा सारथी

असल्यावर, सकळ वीरकार्यें सिद्धीला गेलीं तर त्यांत नवल तें काय ? ”

राजाला सहजींच राग आला. राजपुत्राचे गुणानुवाद गावयाचे सोडून, या षंढ बृहन्नटेचीच थोरवी कंक गाऊं लागल्यास पुत्रकैवारी पित्याला कसें बरें वाटेल ? राजा म्हणाला, “ कंका, उगीच त्या नटनर्तन कुशळ हिजड्या बृहन्नटेचें नसतें रणशौर्य वर्णन करूं नकोस. सैरंध्रीनें सुचविल्यावरून, उत्तरेच्या बोलण्यास मान देऊन तिनें सारथ्य केलं म्हणून काय झालें ? विजयाचा वाटा पराक्रमशाली उत्तर बाळाचाच नव्हे काय ? ” कंकाला जणूं बृहन्नटेचेंच वेड लागलें होतें. तो म्हणाला, “ राजा, रणभूमीवर प्रत्यक्ष कृतांत जरी पुढें येऊन उभा राहिला, तरीही बृहन्नडा त्याला उभाच चिरील ! बृहन्नटा म्हणजे तूं काय समजलास ? ” राजाला कंकमुखानें आणखी षंढस्तुति ऐकण्याची सोयच नव्हती. तो संतापून लाल झाला व त्याच्या दृष्टीनें वाटेल तें आपल्या उलट बरळणाऱ्या कंकाला शासन लावण्यासाठीं आवेशानें हातांतला फांसा राजानें ताड्कन फेकला तो नेमका कंकाच्या कपाळावर वर्मीं लागून, भळभळ रक्ताची धार लागली. शांतिब्रह्म कंकानें तें रक्त भुईवर न पडूं देता, आपल्या ओंजळींतच धरण्यास सुरवात केली, तोंच अज्ञातवासांतही शक्य त्या दक्षतेनें पतिकार्यें परायण राहणारी सैरंध्री ऊर्फ द्रौपदी, अनर्थ ओळखूनच पृथ्वि जाळणारे क्षत्रिय. रक्त, वरच्यावर धरण्यासाठीं, भांडें घेऊनच धावली. रक्त धरूनच सैरंध्री रक्त थांबविण्याचे उपायही कंकाला करीत होती. तिनें रक्ताचा एक थेंबही भूमीवर पडूं दिला नाहीं. इतक्यांत उत्तर मिरवत आला. कंकाच्या सूचनेवरून, बृहन्नटेला परस्पर नर्तन शाळेंत लावून दिलें. पोटांतला हेतू हा कीं, धर्माचें रक्त भिघालेलें पाहून बृहन्नटा ऊर्फ अर्जुन भान न राहून अनर्थ करून सोडावयाचा ! म्हणून कंक त्याच्या दृष्टीसच न पडलेला बरा.

उत्तरानें आंत येऊन कंकाला नमन करतांना त्याची ती स्थिति पाहून घाबरेपणानेंच तो बापापाशीं या बाबतींत मायेची चौकशी करूं लागला. विराटानें कंकभटाचा उमेट मूर्खपणा समजावून सांगण्याची खटपट सुरू करतांच, उत्तरानें हळूंच पण चुकीच्या दुरुस्तीच्या तातडीनें विराटाला त्या पूज्य ब्राह्मणाची क्षमा मागण्या बद्दल

अत्याग्रहाची विनंती केली. विराटानें पुत्रेच्छेप्रमाणें, क्रोधभरांत झालेल्या अपराधाबद्दल, कंकाची क्षमा मागितली, व वस्त्राभरणानीं त्याचा गौरव केला सैरंध्रीच्या काळजीच्या उपायांनीं रक्तही बंद झालें. तेव्हां कंक ह्मणाला, " हें रक्त जर भूमातेवर पडलें असतें तर सारी नगरी जळून खाक होती; हें ओळखूनच चतुर सैरंध्री पात्र घेऊन धावत आली. पुढें तीनच दिवसांनीं उत्तम मुहुर्त, अगदीं प्रातःकाळीं पांडव शुचिर्भूत झाले. त्यानीं उत्तम वस्त्रालंकार धारण केले. कौरवानां लुटून, आभरणें आणि दागिनें आणलेले होतेच ते उपयोगी पडले. उत्तरानें द्रौपदीला दिव्यवस्त्रें व उंची दागीनें अर्पण केलें. मग विराट सभेंत सिंहासनीं धर्मराज बसले. मागें अर्जुन भीम छत्रचामरें घेऊन उभे होते. पुढें सुवर्ण दंड हाता घेऊन, नकुल, सहदेव जयविजया सारखे शोभत होते. द्रौपदी आपल्या पंचप्राण पतींची प्रेमभावें पंचारती करून, अंतःपुरांत जाऊन प्रकट झाली. तेव्हांच पांडव पंचायतन, अज्ञातवास संपून, राजसभेंत प्रकट झाले. विराट नेहमीं प्रमाणें दरबारी परिवारासह राजसभेंत नित्याप्रमाणें येतो, तों ध्यानी मनीं नसलेलं, हें काय विलक्षण घडून आलें. याच्याच तो घोटाळ्यांत पडला; लगेच उत्तरानें पुढें येऊन, पांडव आपल्या येथेंच एक वर्ष कसें गुप्त होतें हें बापाला पटवून सांगितलें. दारिद्र्य वेष्टित अभाग्याला, निधान जवळ असूनही सांपडत नाहीं. मोहोराचा हंडा त्याला विंचू इंगळ्यानीं अगर कोळशांनीं भरलेला दिसतो! भक्तिहीनाला देव जवळ असूनहीं अनेक जन्म, प्रत्यय येत नाहीं, त्याप्रमाणें अज्ञातपणाच्या वेष्टनांतही स्वतेजानें अग्निसारखे चमकणारे, व गुप्ततेच्या डबींत बंद केल्यावरही सत्वशीलतेनें, कस्तुरीप्रमाणें दरवळणारे द्रौपदीसह पांडव, विराटाच्या घरींच वर्षभर असून पांडवासारखी कृत्यें घडत असतांना केवळ श्रीहरीच्या मायामय आवरणानें, पांडवांचें अज्ञातपण अस्फुटपणें पार पाडण्याचा ईश्वरी संकेतच असल्यामुळें, त्यांच्या विषयीं खरा तर्क न होतां, साऱ्यांना भुरळ पडली. एरवीं विराट मंडळी कांहीं कमी विचक्षण नव्हती. तेजस्वी सैरंध्रीच्या पायीं घडलल्या कीचकवधाची अनर्थपात हकीकत इतकी स्पष्ट होती कीं, जबरदस्त संशयाला जागा होती पण भक्तरक्षणाच्या मोहन मंत्रानें पाहणारांच्या मनी प्रभूनें पांडव कल्पने पासून अलिप्तच ठेवल्या होत्या.

विराटानें पदर पसरून, पांडवांची क्षमा मागितली. इकडे सुदेष्णेनेंही द्रौपदीचे पाय धरून तिची अमित स्तुति करून, तिला प्रसन्न केलें. झाल्या गेल्या गोष्टी विसरून, जडलेल्या परिचयाचें नातें, नव्या सोयऱ्यांच्या संबंधानें दृढ करण्यासाठीं विराट कन्या उत्तरा, सुभद्रासुत अभिमन्युला देण्याचें ठरलें. विराटनगराजवळ उपप्लव्य नामें दुसरी नगरी होती. तेथें शिबिरें देऊन पांडव राहिले. धर्माला राजसूयाच्या वेळीं, अनुकूल झालेले सर्व राजे व यादवासह इंदिरावर परिवारासह द्रुपद अशी मंडळी अभिमन्युच्या लग्नासाठीं उंची आहेरें घेऊन, व पुढील युद्धासाठीं धर्माज्ञेप्रमाणें करभार घेऊन विराट नगरीस आली. लग्नसमारंभ थाटाचा झाला लावण्यसुंदर उत्तरा, अर्जुनाच्या म्हणजेच बृहन्नडेच्या तालमेंत नृत्यगायन शिकली असल्यामुळें, तिला सासर अपरिचित वाटतच नव्हतें द्रौपदीची मर्जी संभाळण्यांत सुदेष्णेनें खऱ्या जिव्हाळ्याची आतुरता दाखविली "इतकी माझी तब्येत न संभाळतां सुभद्राबाईचेच मानपान नीट करा" असें शालीनतेनें द्रौपदीनें सांगितलें द्रौपदीचे पुत्रही द्रुपदराजाबरोबर आले होते वनवास व अज्ञातवास यांच्या अनेकविध संकटांतून कृष्णकृपेनें पार पडल्यावर मायलेकरांची भेटही परम प्रेमळच झाली. एकंदरींत तूर्त तरी दुःखामागून सुख येऊन सर्वांबरोबर द्रौपदीही, समाधान सुखांत कृष्ण दर्शनानें आनंदमय होऊन राहिली.

# प्रकरण १९ वें.

## पुढें काय ?

भुईला आभाळ टेकल्याजागीं जाऊन पोचणें जसें अशक्य, तसें प्रपंचांतील मनोमय सुखाच्या आशेचें क्षितिज गाठणें, केव्हांही असंभवनीय होय. कारण दोन्हीही सत्यवस्तु नव्हत. आभासामागें फुकट धावण्यानें दमणुकींत सपसेल निराशा झाली, तर त्यांत नवल तें काय ? प्रत्येक प्रापंचिकाची अशीच फसगत होते. सुखाच्या मागें भ्रमानें धावतां धावतां, सुखमूळ कर्तव्याचें भानच राहात नाहीं; आणि जीवित साफल्याचें खरें ध्येय पार विसरलें जातें. जीवन कलहाच्या गहन झटापटींत, प्रत्येक प्राणिमात्र " पुढें काय " या फसव्या विकट प्रश्नाच्या स्वयंप्रेरित उत्तरांत, सुख भावनेचें नसतें विष-बीज पेरीत पेरीतच, पाऊल उचलूं लागतो. अर्थात् सुखामागें तो धाऊं लागतो, पण सुख कांहीं त्याच्यामागें धावत नाहीं अशा विपरीत स्थितींत सुखाची जोड कोठून मिळणार ? या दृष्टीनें द्यूतारंभापासून अज्ञातवास संपेपर्यंतच्या खडतर काळांत, द्रौपदी माउलीवर ओढवलेल्या अनेक संकट परंपरेनंतर तिला हायसे सुखाचे दिवस अनुभवण्याची केवढीतरी उत्सुकता असली पाहिजे. पण जेथें कर्तव्य हेंच सुख ध्येय हेंच समाधान व परिस्थिती प्राप्त प्रसंग हीच शांति, तेथें सुखविरहीन कल्पनाच उरत नाहीं. येथें विषाचें अमृत बनतें आपला जन्म आपला टीचभर देह मिजाशी सुखांत पोसण्यासाठींच, खचित नव्हे; त्याचा हेतू विश्वचक्राच्या निसर्ग घडामोडींत, लोकसंग्रहतेनें जगत्कार्यास यथाशक्ति हातभार लावण्याचाच आहे, असा समज होऊन चुकल्यावर, अन्य इष्टसिद्धि ती काय उरली ? असल्या महत्कार्यांत सहजीं अंतर्भूत होणारें निव्वळ व्यक्तिहीत मुद्दाम साधणें हें थोर चरित्र्यांतलें प्रधान अंगच नव्हे. ह्मणून रुद्रशक्तिरूपिणी द्रौपदी ज्या साठीं मूळ अवतरली, तें उद्दिष्ट कार्य ह्मणजेच दुर्जनांचें शासन व सज्जनांचें परिपालन होण्यासाठीं पांचाली अगदीं अधीर झाली होती.

अभिमन्यूच्या लग्नानंतर कौरवापासून यथाभाग राज्याचा वाटा मिळविण्याच्या वाटाघाटी उपप्लव्य नगरींत पांडवांच्या शिबिरांतून चालू

असतां, तिच्या केवारी कृष्णानें तर स्पष्टपणें असें बोलून दाखविलें कीं, माते साठीं जशी परशुरामानें पृथ्वि निःक्षत्रिय करून सोडली, त्याप्रमाणें अन-न्वित पणें धडधडीत अन्यायानें माझ्या द्रौपदीला गांजणाऱ्या कौरवांचा मी निःपात करून सोडीन यावर बळिरामानें आपला ओढा कौरवाकडे असल्याचें व्यक्त करण्यासारखें भाषण करून म्हटलें, " धर्मानें द्यूत खेळून, राज्य गमावलें, त्याला दुसऱ्यांनीं काय करावें ? यांत शकुनीकडे तरी काय बोल ? आतां एकेरीवर न येतां, दुर्योधनाला वळवुन, पांडवांना कसेंतरी अर्धेराज्य मिळण्याची खटपट करावी म्हणजे झालें." यावर सात्यकी रागावून ह्मणाला, " आमच्या दादांचा दुष्टानांच पाठिंबा असावयाचा ! धर्मराज आपला भोळा पाहिला कीं या लबाडांनीं लभ्यांशाचा गोळा राज-रोसपणें उपटला ! आणि आतां ह्मणे या दुर्जनांची प्रार्थना करून, त्यांना राज्यविभागासाठीं भीक मागायची ! छे, तें कांहीं नाहीं. मुकाट्यानें राज्य दिलें तर बरें, नाहीं तर रणांगणावर साऱ्या कौरवांना लोळवून, पुरुषार्थानें राज्य घ्यावें हाच क्षात्रधर्म दुष्टांचा नाश करण्यासाठींच क्षत्रियत्वाचा जन्म असला पाहिजे. कुडींत आत्माराम आहे तेथपर्यंत, पुरुषार्थाची हाव धरली पाहिजे याचनाकरून मूठभर दाणे मिळण्याची पंचाईत पडते, तेथें भीकमागून राज्य कोण देणार ? असा कांहीं आवांका धर्मा, अंगांत असला तर नांव करावें आणि राज्य घ्यावें असलें सामर्थ्य वैभव अंगा नसेल तर आपल्या, आपल्या भावाचा आणि आपल्या बायकोचा झालेला भयंकर अपमान गिळून मुकाट्यानें कृष्णवदन करून वनांतरीं जावें हें उत्तम "

द्रौपदीचें तर म्हणणें पडलें कीं, ' खलवृत्तीच्या कौरवांपुढें मृदुवचनें कधींही बोलूं नयेत, किंवा तडजोडीच्या शिळपट भानगडींत पडूं नये आत्मसत्व-पूर्ण स्वपराक्रमाच्या धाकाशिवायच्या ज्ञानप्रचुर कोमल गोष्टी, त्या व्याघ्र-वृत्ती पापात्म्यांना काय होत ? हिंसेशीं सत्वबोध काय कामाचा ? हें सत्य भीरु मृदुलत्व म्हणजे त्या नराधमांना बोलणाराचें दुर्बलत्वच वाटावयाचें ! तेव्हां वेळ फुकट न दवडतां, कौरवांनीं पृथ्वीचे राजे युद्धासाठीं आपल्या बाजूनें बोलावण्याच्या आधीं, सारे राजे, महाराजे, यांना आपल्या तर्फे आमंत्रण जाऊं द्या. याशिवाय दुसरा तिसरा विचार प्रथम करूं नका. "

यावर पांचाळ राजानें शस्त्र उचलण्यापूर्वी, आपला चतुर पुरोहित, दुर्योधनाकडे गोडीचें बोलणें करण्यास पाठविण्याची योजना पुढें आणली. कृष्णाला ती पसंत पडली. परंतु जणुं क्षत्रिय रक्तासाठीं अत्यंत आक्रांत झालेली धरित्री तृप्त करण्यासाठींच, युद्ध कार्याला पांडवाहूनही अधिक खुमखुमीनें अकरा अक्षौहिणी सैन्याच्या जय्यत तयारीनें सिद्धहोऊन राहिलेले कौरव आपल्या भटाभिक्षुकांच्या शांतिःपुष्टींच्या शब्दाला थोडीच भीक घालणार होते ! दुर्योधनानें त्या पुरोहिताला ताडकन् धुडकावून लावलें, व " पांडवांनीं भिकेची झोळीच पसरली तर भाजीभाकरी पुरता देऊं एखादा लहानसा गांव, " असें उर्मट उत्तर दिलें.

पुत्रहित तत्पर धृतराष्ट्रानें पांडवांची खरी इच्छा काय आहे. हें समजून घेण्यासाठीं संजयाला धर्माकडे पाठवून दिलें तेव्हां कृष्णानें त्याला सांगितलें कीं, क्षत्रिय धर्म आचरण करून, स्वतःच्या प्रतापानेंच रणधुरंधर पांडव आपलें राज्य, विजय दुंदुभी वाजवीत वाजवीत, हक्कानें काबीज करतील. कौरव सर्वस्वी अन्यायी असून, शिवाय आतां त्यांनीच आमच्या आधीं दळभाराचा सागर जमउन, युद्धाची तयारी चालविली आहे. ज्याअर्थी ही अवदसा त्यांना आठवली आहे.त्या अर्थी त्यांना जीव नकोसा झाला आहे, असेंच दिसतें. पांचालीची छळणा करून, तीव्रशब्दानी केलेला घाय अद्याप भरून आले नाहींत, आणि खरोखरच या जखमा भरून येण्यास, त्या दुष्टांच्या रक्तानें धरणी न्हाली पाहिजे.अद्याप त्यांच्यांत कांहीं माणुसकी असेल,तर शाहण्याच्या वयोवृद्ध अनुभवाचा शब्द त्यांना ऐकावासा वाटत असेल, तर दुर्योधनाला म्हणावें,सारें राज्य पांडवांना देऊन टाक. म्हणजे मग बंधुप्रीतीनें धर्मराज तुम्हांला गजपुराचें राज्य उचलून देईल; तें घेऊन सुखी ऐस. एरवीं कृतकर्माचें प्रायश्चित्त भोगण्यसाठीं, न्यायी काळाच्या तीव्र दाढेंतून तुमची सुटका होणें शक्यच नाहीं, हें खूप समजून असा."

धर्मानें संजयाचा योग्य परामर्ष घेतल्यावर, हस्तनापुरांतील स्वकीय आप्त गणगोत इष्टमित्र ऋणानुबंधी, सात्विक ब्राह्मण, सदाचारी सर्व प्रजाजन यांच्या विषयींही कुशल प्रश्न विचारून, म्हटलें, " धृतराष्ट्र महाराजांना माझे

अनेक प्रणिपात सांगून, श्रीकृष्ण कृपेनें आम्हीं सुखी असल्याचें सांग. वृद्धाला पुत्र मोहानें आपल्या मुलांचे अन्याय दिसत नाहींत, आणि तो त्यांचेंच हित चिंतितो, तर त्याला म्हणावं, तुझ्या दुर्योधनालाच सारें सार्वभौम राज्य सुखानें भोगूं दे. आह्मां पांच जणांला चरितार्थापुरतें पांच गांव द्या ह्मणजे झालें. " सत्पक्ष असून, हाकेला परमेश्वर उभा राहात असतां, सद्बुद्धीनें रक्तपात टाळण्यासाठीं व्यवहारांतः दोषास पात्र होऊनही स्वार्थत्यागी धर्मानें केवळ पांच गांव मागून, खऱ्या औदार्यानें वैभवमत्त कौरवांना लाजविलें खरें, पण वस्तुतः या अपात्री दानाचा मदांध दूर्योधनाकडून उपमर्द होऊन भिकाऱ्या सारखे पांच गांव मागणाऱ्या, अल्पसंतोषी, निर्बळ पांडवांचा त्या दुष्टानें नुसता उपहासच केला !

धृतराष्ट्र मनाचा दुबळा पण पुत्रहित दृष्टीचा कावळा होता. त्याला संजयानें सणसणीत सणसणीत शब्दांनीं उपदेश केला. विदुरानें खऱ्या नीतिरहास्याचा बोध सांगितला. सनत्सुजातानें खऱ्या जन्मसार्थक्याचें कोडें, आपल्या अधिकार वाणीनें उकलून दाखविलें. व्यासांनीं युद्धाचा अरिष्टपात टाळण्यासाठीं कृष्ण कृपाश्रयभूषित अजिंक्य पांडव मायेनें जवळ करण्यासाठीं प्रेमळ सूचना दिली. इतक्यांत तयारीनें सज्ज झाल्यावर मग धृतराष्ट्रानें दुर्योधनाला वळविण्याचा दुर्बळ यत्न करून पाहिला. गांधारी मातेनें दुर्योधनाला जवळ घेऊन, गोड शब्दांनीं त्याची समजी घालून युद्धप्रसंग न येऊं देण्या-विषयीं काकुळतीनें सांगून पाहिलें, पण व्यर्थ ! भीष्मद्रोणासारखे समरधीर, शकुनी कर्णासारखे सहाय्यकर्ते मुत्सद्दी व दुःशासनादिकांसारखे पाठिराखे, अशांचा बळावर अकरा अक्षौहिणी दळभार आज्ञांकित ठेवून, पांडवांना धुळीस मिळविणें, दुर्योधनाला सहज कर्म वाटूं लागलें होतें.

संजयानें पांडवाकडून आल्यावर भरसभेंत स्पष्ट सांगितलें कीं केल्या कर्मांचीं फळें भोगण्यास भाग पाडण्यासाठीं, कौरवांचे प्राण घेण्यास शूर पांडव, अगदीं उत्सुकतेनें सर्वथैव समर्थ होऊन, वेळेची वाट पाहात बसले आहेत झालेला अपमान, मताची विटंबना, व सत्याची अवहेलना, या गर्वाची भरपाई करण्यास कठिस शब्दशस्त्रांना तीव्र लोहशस्त्रानें बरोबर

उत्तर देऊन, द्वारकेच्या श्रीकृष्ण भवानी पुढें, युद्धकंडांत कौरवांचें बळी देण्यास. पांडव उतावीळ झाले आहेत. कृष्णाचा तर तुह्मांला असा निरोप आहे कीं, ' द्रौपदीच्या दुःखानें मी पूर्ण दुखधलों आहे. त्या महान् सतीचे तुह्मीं अत्यंत अपराधी आहां या अक्षम्य गुन्ह्याबद्दल तुह्माला शासन लाव-तांनां इंद्रादिसर्व देव जरी कौरवांना साहाय्य झालें तरी द्रौपदी सत्वहरणार्थ वेळीं सुदर्शन सोडून, ब्रह्मांड जाळण्यासही मी मागें घेणार नाहीं यावरून तुमचें आयुष्य आतां संपुष्टांत आलें आहे असें समजा. दानधर्म, सुखभोग, मनसोक्त आहार विहार आप्तेष्टांच्या प्रेमभेटी वगैरे सर्व वासना तृप्त करून मागें इच्छा न ठेवतां मरणास तयार व्हा. "

प्रत्यक्ष भगवंताची ही इच्छा ऐकून, भीष्मद्रोण भयभीतपणें दुर्योध-नाला ह्मणाले, " आतां कांहीं धडगत दिसत नाहीं. " उन्मत्त दुर्योधन उम-जला नाहीं. त्याला कर्णाचा विलक्षण पाठिंबा होता. धृतराष्ट्रादिकांनीं दुर्योध-नाला अनेकवार बजावलें कीं, आमचे शब्द तुला मरण समयीं आठवतील. पण मग तेव्हां त्यांचा कांहींच उपयोग होणार नाहीं. इकडे श्रीकृष्ण परमात्मा पांडवातर्फे कौरवाकडे शिष्टाचार करण्यासाठीं पाठविण्याचें ठरलें. धर्मानें कृष्णाला सांगितलें " कसेंही करून युद्धानें होणारा अपरिमित वंशक्षय टाळून, मैत्री करून घे. आह्माला पांच गाव त्यांनीं दिलें तरी पुरे. " अर्जुन ह्मणाला, " तें कांहीं नाहीं. बरोबर अर्धे राज्य देऊन, दुर्योधनानें येथें येऊन, धर्मचरण वंदावे तरच सख्य होईल." असेंच इतर पांडवांचेंही मत पडलें. त्यावर द्रौपदी ह्मणाली, " कृष्णा, माझे हे मोकळे केंस तुला दिसतात ना ? निर्दयतेनें ते आकर्षून फरफरा मला सभेंत दुःशासनानें ओढीत नेलें. लुगडें फेडून माझी इज्जत घेण्याचा त्या नीचानें यत्न केला. तें सारं विडंबन यानीं डोळ्यांनीं पाह्यलें, नी आता दीनासारखे त्यांच्याकडे तुझ्या मार्फत, पाच गाव मागून सुखी राहूं इच्छितात. हें वर तरी दिसत कां ? मी ह्मणते ही खरी मर्दानी माणुसकी कां ? अंगांत शौर्यधैर्यादि प्रताप गुण असून, असली ही दळभद्री याचना काय ह्मणून ? सामर्थ्ये बळानें शत्रूला फजिती करून, आपलं राजसिंहासन हक्कानें मिळवायला

यांना कां भय वाटतं ? असल्या नेभळेपणानं हसें करून घेण्यापेक्षां पुन्हां मुकाट्यानें, गिरिकंदरीं जाऊन, वास केलेला काय वाईट ? माझे निधडे पांच पुत्र नी सहावा रणवीर अभिमन्यू यांच्याच करवीं या सोऱ्या मेल्यांची मी खोड जिरवून, त्यांना यमपुरी दाखविते. पण सतीचा उपमर्द, मानभंग आणि विटंबना करण्याबद्दल घोर प्रायश्चित्त मी या अधमाना दिल्याशिवाय खचित राहणार नाहीं ! यांच्या या न्यायी न्यायी दिसणाऱ्या बापुडवाण्या वृत्तीनेंच कृष्णा, माझी अशी दैना नी फजिती झाली. एरवीं तेथच्या तेथें वैऱ्यांना कंठस्नान घालून, सतिपतीचा प्रभाव दाखविण्यास कशाचा अडथळा ? विचाराचा कीं अविचाराचा ? " असें ह्मणून द्रौपदी खळखळा रडूं लागली.

कृष्णाचाही कंठ भरून आला. त्यानें तिला आश्वासन देऊन, "साऱ्या गोष्टी तुझ्या इच्छेप्रमाणेंच घडतील. रणांगणीं सारे कौरव मृत्युमुखीं पडून त्यांच्या ललना धाय मोकलून रडतांना तूंच पाहाशील " असें सांगून " लौकिकरीत्या कौरवांना त्यांच्या हिताचेच दोन शब्द सांगून पाहतों." असें ह्मणून भगवान् जगत्प्रभू शिष्टाईसाठीं हस्तनापुरास गेला. सज्जनांना तेथें त्याच्या दर्शनाचा लाभ झाला. विदुराचें भाग्य उघडून, त्याच्या घरींच कृष्णानें जेवण केलें. विदुराच्या घरीच तो कुंती आत्याबाईला भेटला. तिनें कृष्णाच्या गळ्याला मिठी मारून, स्फुंदस्फुदून शोक केला. ती ह्मणाली, " माझे पांडव ह्मंजे खरेखुरं उपजत ऐश्वर्यवंत राजकुमार. पण ! कृष्णा, ते जन्माचेच कष्टी ! सदा यातनाच त्यांच्या मागें लागलेल्या, असंच त्यांचं खोटं प्राक्तन ! त्यांच्या मागें तूं तरी उभा असतोस ह्मणून बरं. या मेल्या दाइजांनी माझी सुकुमार सत्वाची संपत्ति पांचाली, नाहीं नाहीं त्या रीतीनें छळली, गांजली, भाजली ! तूंच बाबा, तिची अब्रू राखलीस. बिचारीला पतीबरोबर कष्टमय वनवास भोगावा लागला ! ती माझी सद्गुणी सून नी ते माझे तान्हुले पांडव, कृष्णा, मला कधीरे भेटतील ? त्यांना सांग कीं युद्धांत स्वपराक्रमानें, तुह्माला छळणाऱ्या दुष्टांचा निःपात करा. सारं राज्य प्रताप बळानं जिंकून घेऊन माझे डोळे निवता द्रौपदीची छळणा रात्रंदिवस माझ्या डोळ्यापुढें दिसते आहे ! '

कृष्णानें कुंतीचें समाधान करून, साऱ्या गोष्टी मनासारख्या लौकरच घडून येतील. असें सांगितलें. ज्या कामासाठीं ह्मणून कृष्ण हस्तनापुरास गेला. तें कार्य झालें नाहीं. कृष्णशिष्टाईनें कौरव वळले नाहींत. परमेश्वराचे ईश्वरमोल शब्द फुकट गेले ! युद्धाशिवाय सुईच्या अग्रावरील मातीही आपण पांडवांना देण्यास तयार नाहीं, असें दुर्योधनानें रोखठोक सांगून सोडलें. अर्थात् कौरव पांडवांत भयंकर रणसंग्राम होणेंच अपरिहार्य होऊन, भारतीय युद्ध जुंपलें. यामुळें द्रौपदीला हवा असलेला छळकांचा भयंकर सूड, पृथ्वविरील वीर्य निःपातानें, चांगलाच उगवता येऊन वंश वृक्ष जाळणारा रणकल्होळ माजुन राहिला !

# प्रकरण २० वें

## रणभूमीवर.

साध्वी द्रौपदीचें उज्वलचारित्र्य जरी या द्वेषपूर्ण रणसंग्रमाला उत्तेजक झालें असलें, तरी वसुधा निर्वैर करून सोडणाऱ्या कुरुक्षेत्रावरील भारतीय महायुद्धांत, सतिचरित्रा.चें प्रत्यक्ष प्रसंग अत्यल्प असणेंच साहजिक आहे. सुभद्रा, द्रौपदी, उत्तरा वगैरे साऱ्या स्त्रिया उपलव्य नगरांत आणि प्रत्यक्ष रणधुमाळी पानपतच्या रणभूमीवर पांचाली ही वीरकन्या, वीरपत्नि व वीरमाता होती. तिनें पांचाल राजा, धृष्ठद्युम्न, पांडव व अभिमन्यूसह आपले पंचपुत्र, यांना युद्धावर जातानां, क्षत्रिय स्त्री जातीला उचित अशा उत्साह प्रेरित सधीर शब्दांनींच, शत्रूचें निर्दलन करून विजय वरण्यासच निरोप दिला. व्यावहारिक मायामताला कर्तव्याआड आडवी आली नाहीं. रणांगणावरील जयश्री ही जरी पुष्कळ अंशीं, मर्दुमकीवर अवलंबून असली तरी वेळेची अनुकुलता, देवाचा हात, व कर्तृत्वाची मात यांचा मेळ पडावाच लागतो. यामुळें समरभूच्या रंगभूमीवर प्राणावरील खेळ खेळण्यास गुंतलेल्या शूर मर्दांचे गृहपाश आपआपल्या जागीं, यशोत्सुकतेनें विव्हळ झालेले असतात. दुष्टांना यथायोग्य शिक्षा करून.आपल्या समाधानस्वार्थासाठीं नीति निष्ठुर कर्तव्य कठोरतेनें जीव घेणारे युद्धकर्म जरी कितीही व्यवहार क्षम्यतेनें हवेंसें वाटलें तरी पेटणाऱ्या द्वेषाग्नि कुजत एकासाठीं अनेकांच्या सहजीं पडणाऱ्या आहुतींनीं ओढवणारी दुर्धर आपत्ति म्हणजे निव्वळ रानटी क्रूर आचार वाटून निसर्ग मृदु मनोवृत्तीला ममत्वानें अगर भूतदयेनें निद्ररण कर्माचा धगधगीतपणें वीट यावा. हें साहजिकच आहे. आपल्या सत्पक्षासाठीं भारतीय युद्धांत गुंतलेल्या अनेक आप्तेष्टांच्या जिवांची काळजी, द्रौपदीसारख्या मूर्तिमंत कनवाळू दया देवीला लागून रहावी यांत वास्तविक कांहीं नवल नाहीं; कारण प्रत्यक्ष रणांगणावर जेव्हां पांडवांचें सात अक्षौहिणी व कौरवांचें अकरा अक्षौहिणी सैन्य एकमेकांचा जीव घेण्यासाठीं सज्ज होऊन उभें राहिलें जेव्हां वीरांनीं फुंकलेल्या शंखाचें घनघोर नाद, "दुडुम् दुडुम्" वाजणाऱ्या

रणभेरीचे शौर्योत्साही गंभीर आवज, आणि इतर रणमस्त वाद्यांचा देहभाव हरपविणारा कृतांत गजर, यांच्या एकवटलेल्या ध्वनिब्रह्मांत, ब्रह्मांड डळमळलें, सप्तसागर उसळले, आणि नक्षत्रें कोसळलीं. जेव्हां दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं सारथ्यपटु श्रीकृष्णानें अर्जुनाचा दिव्य रथ समीरगतीनें घडघडत आणला, आणि कौरव सेनेंत जेव्हां पार्थ वीरानें भीष्मद्रोणादि सारेच आप्तबंधु, इष्टमित्र उभे राहिलेले पाहिलें, तेव्हां द्रोणासारखी गुरुमाउली आणि भीष्मासारखी पितृसाउली यांच्यावर हत्यार कसें उचलूं, जमलेल्या आप्तेष्टांना कसें मारूं, व कौरवासारख्या प्रत्यक्ष भावांचे प्राण कसे घेऊं, असाच अर्जुनालाही भ्रम पडून मोह उत्पन्न झाला. हातांतलें धनुष्य गळलें. अंग-रोमांचित झालें, तोंडाला कोरड पडली, व गोत्र मित्रहत्या जोडून त्यांच्या रक्तानें भिजविलेल्या भूचे मग पुरुषार्थानें भूपति होण्यांत अर्थ काय, असें धनुर्धर पार्थाला वाटूं लागलें. याच वेळीं भगवंतानें जगत्पावन गीतेचा धनंजन वीराला मार्मिक उपदेश करून, त्याचे ठिकाणीं वेदांत आणि व्यवहार यांचा नामी मेळ घालणारी कर्तव्य जागृति उत्पन्न केली.

अग्नीच्या दहनकर्माची महती गातांना, जशी राखरांगोळी वर्णन करावयाची त्याप्रमाणें युद्धाच्या जीव-हरण कर्माचा इत्यर्थ सांगतांना पराक्रमांकित प्राणहानिचीच मोजदाद करावयाची ! प्रतापी भीष्म महावीर पांडवांकडचे रोज दहा हजार रथी वीर मोक्षसदनीं बोळवित असे. भीष्माच्या शौर्यतेजापुढें पांडवांचें कांहीं चालेनां प्रत्यक्ष श्रीकृष्णालाही हातीं शस्त्र धरावयास भाग पाडणारी भीष्मप्रतिज्ञा म्हणजे सत्वशील पराक्रमाची परमावधीच होय. पण बिचाऱ्या दुर्योधनाला भीष्माच्या हातून एकही पांडव मेला नाहीं याबद्दल खेद वाटत होता; व भीष्मासारखा अतुळ प्रतापी सेनानी, मनावर घेतल्यास केव्हांच पांडवाचा निःपात करील अशीही दुर्योधनाची खात्री होती, परंतु भीष्माचा ओढा शत्रूच्या जयाकडे असल्यामुळें, तो मुद्दामच पांडव मारीत नाहीं असा कुबुद्धि दुर्योधनाचा संशय होता भीष्माच्या सेनाधिपतीला खालीं असे नऊ दिवस गेल्यावर, दुर्योधनानें भीष्माच्या हातून पांडव अद्याप जिवंत सुटल्याबद्दल आश्चर्य प्रदर्शित करून पांडवांना मारून टाकण्याविषयीं, भीष्माला प्रोत्साहन येण्यासारखें मर्मभेदी

भाषण करून, भीष्मतेज प्रज्वलीत केलें. दुरात्म्या दुर्योधनाला भीष्म जाणूनच होता; तरी 'उदईक मी निःपांडवी पृथ्वि करीन अशी प्रतिज्ञा भीष्म महाराज बोलले. पण दुर्योधनाला विश्वास नसल्यामुळें त्याचा या भीष्म वचनावर भरवसा बसेना. त्या श्रद्धाहानीनें शंका बांधली. त्यानें भीष्माला विचारलें, "आपण ह्मणतां तसें आपल्या हातून नच झाले तर ?" भीष्म तडकाफडकी उत्तरले, तर मग मूर्खा, मी आपला देह रणांगणी ठेवीन." होणारा सारखी बुद्धी. भीष्माच्या निश्चयी वचनाला, दुर्योधनाच्या संशय पिशाचानें संकेतार्थी अनिश्चित स्वरूप आलें. पण भीष्माची निःपांडवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा पांडवाना कळतांच कृष्णाला देखील धाक पडला. असें ह्मणतात कीं लगेच त्या रात्रीं पांडव केवारी कृष्णाच्या इच्छेनें, प्रत्यक्ष यमपुरीहून भयंकर अशा कुरुक्षेत्राच्या त्या भयाण रणभूमीच्या बाजूनें व पलीकडच्या कौरवसेनेच्या मुक्कावर भीष्मदर्शनासाठीं देवी द्रौपदी त्याच्या शिबिराकडे गेली. तिच्या साबेतीला मागोमाग पांडव होतेच. भीष्माला द्रौपदीनें भीतभीतच नमस्कार केला. पण तिच्या पातिव्रत्याच्या सुदैवानें भीष्ममुखांतून "सौभाग्यवतीभव" असा आशीर्वाद येतांच द्रौपदीला धीर आला. भीष्मदेवांनीं तिला अशा अपरात्रीं तेथें येण्याचें कारण विचारलें. तेव्हां तिनें भीष्माच्या निःपांडवी पृथ्वि करण्याच्या प्रतिज्ञेचा उल्लेख करून ह्मटलें, 'महाराज, आपण मला आपल्या आशीर्वचनानें सौभाग्यदान दिलेंच आहे. आपला निश्चयाचा शब्द जगत्पित्यालाही अन्यथा करवणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. ह्मणूनच मी भिऊन आपले वडिलांचे पाय धरून अभय मागण्यासाठीं मुद्दाम वेळ अवेळ न पाहतां, आपल्या दमल्याभागल्या स्थितींत, विश्रांती आड त्रास देण्यास आलें, याबद्दल या दीन निरपराधी गांजलेल्या सुनेवर राग नसावा. कौरव सभेंतील माझी वृथा गांजणूक, त्यांची आजवरची सारी अन्यायाची वागणूक, नी पांडवाची सत्यासाठीं कष्टमय दमणूक, इकडे आपली कृपादृष्टि आहे, ह्मणून तर आह्मी आजवर निभावून निघालों, भीष्माचार्य गहिंवरून ह्मणाले, "द्रौपदी, खरेंच तूं फार शिणलीस, पाठिराखा भगवान् श्रीकृष्ण परमात्मा, तुमच्या संरक्षणासाठीं उभा

असल्यावर तुम्हांला कशाचें भय ? नि:पांडवी पृथ्वि करण्यांचे शब्द, माझ्या तोंडून गेले खरे, परंतु ते हतभागी दुर्योधनाला खरे वाटले नाहींत. आणि तुम्हाला मात्र तेच शब्द सत्य होतील, असें भय पडलें. मजविषयीं कौरवांना आलेली शंकाच त्यांची त्यांना-बाधक होईल. मजपासून समरांगणीं कोणालाच यश मिळणार नाहीं तरी उदईक काय केलें असतां पांडव यशस्वी होतील. हें मी पांडवांना सांगेन. माउली तूं आलीस तशी निश्चितपणें जा आणि पांडवांना मजकडे धाडून दे. ह्मणजे सारें कांहीं तुझ्या इच्छेप्रमाणें जुळून येईल. शिखंडीला पुढें करून, त्याच्या आडून अर्जुनानें भीष्माला जर्जर करावें असें ठरलें. शिखंडीला स्त्रीत्वाचा बट्टा लागला असल्यामुळें, त्याच्यावर स्त्री म्हणून भीष्म महाराज शस्त्र उचलीत नसत. दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणचें भीष्म शरपंजरीं पडले. ते इच्छामरणी असल्यामुळें, उत्तरायण लागेपर्यंत ते तसेच समरभूमीवर पडल्याजागीं ईश-चिंतनांत मग्न होऊन राहिले. वास्तविक द्रौपदी उपलव्य नगरांत असतां तिचें कार्यार्थ भीष्म शिबिराकडे आयत्या वेळीं येणें कसें काय घडलें, यांतली हरिमायेची खूण, हरीच्या मायेंतल्या माणसानांच ठाऊक !

पुढें द्रोणाचार्यांना सेनापतित्वाचा रणपट्ट दिल्यावर, चक्रव्यूहांत एकट्या समरधीर अभिमन्यू वीरावर अनेकांनीं पडून, त्याला रणभूमीवर पाडलें अशा मरणोन्मूख विकल प्रसंगीं, जयद्रथानें अभिमन्यूला लाथ मारून त्याचा मोठा अपमान केला. अभिमन्यू पडल्यामुळें पांडवाकडे हाहा:कार उडाला. पवन शीघ्र वाहानांतून, उपलव्य नगरींतून, सुभद्रा, द्रौपदी, व अभिमन्यूची भार्या उत्तरा, अशा स्त्रिया हृदय पिटीतच आल्या. एकट्या बाळाला अशा महायुद्धांत अगदीं एकाकी सोडल्याबद्दल, द्रौपदीनें शोक करतांना साऱ्यांना दोष दिला अभिमन्यूला लाथ मारणाऱ्या जयद्रथाचा सूड घेऊन त्याचा देहांत करण्याचा पुरुषार्थ जोडण्यास, पतीला सुभद्रेनें रडतां रडतां विनविलें. रणांगणावर प्राण धरून राहिलेल्या अभिमन्यूनेंही जयद्रथाची नीच कृति अर्जुनाला सांगितली तेव्हां दुसरे दिवशीं अस्तमानाचें आंत जयद्रथाला मारीन, आणि तें नच साधल्यास मी अग्निकाष्ठें खाऊन देहत्याग करीन," अशी अर्जुनानें प्रतिज्ञा केली. तेव्हां कृष्णस्मरण करीत करीत, अभिमन्यूनें

प्राण सोडला. दुसरे दिवशी शकटव्यूहांत, जयद्रथाला अगदीं दुर्गम असल्या खोलांतल्या खोल अशा व्यूहाच्या हृदय कमलांत कौरवांनीं सुरक्षितपणें दडवून ठेवलें. भक्तासाठीं कष्ट सोसणाऱ्या कृष्णाला, अर्जुनासाठीं सुदर्शना आड सूर्यही दडवून अस्तमानाचा खोटा भास उत्पन्न करावा लागला. अशा वेळीं असत्य प्रतिज्ञ अर्जुन अग्नींत उडी कशी टाकतो हें पाहण्यासाठीं दडलेला जयद्रथ डोकावूं लागतांच, सूर्यावरील सुदर्शन काढून, 'हा सूर्य आणि हा जयद्रथ, असलें प्रत्यक्ष प्रमाण पटवून, कृष्णानें पार्थाकडून तत्क्षणींच--सूर्यास्तापूर्वी जयद्रथाचें शीर उडविलें !

द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न हा पट्टाभिषिक्त सेनानायक होता. द्रोणवध हें त्याचें जन्म कारणच होतें, अर्थात् तो द्रोणाचा प्राण घेणारा, योग्य संधीची वाटच पाहात होता. त्यांत, द्रोणानें लढतानां द्रुपदराजाला ठार केल्यावर तर बापाच्या सूडासाठींही धृष्टद्युम्न चवताळून गेला होता. परंतु वेद, शास्त्र, पुराणें, व शस्त्रास्त्र विद्या, यांत पारंगत असलेल्या ब्रह्मनिष्ठ तेजस्वी द्रोणवीरा पुढें कोणाचाच टिकाव लागणें शक्य नव्हतें. द्रोणासारखा अनावर महायोद्धा पांडवाच्या मोठमोठ्या विरांचा व सैन्याचा फन्ना उडवूं लागला. तो कोणालाच आटोपेना. शेवटीं कृष्णानें युक्ति काढली. पांडवाकडे 'द्रोणसुत' पडला म्हणून उगीचच जयवाद्यांचा घोष सुरू केला. कृष्णानें धर्माला मात्र सांगून ठेवलें कीं, अश्वत्थामा पडलेला ऐकून, तुला कृष्णानें सत्यपरायणाला सत्य काय तें विचारण्यासाठीं द्रोणाचार्य येतील, तरी त्यास "अश्वत्थामा पडला खरा, पण नरो वा कुंजरोवा." म्हणजे अश्वत्थामा वीर कीं हत्ती, या बद्दल संशयीत बोल, तरच कार्यभाग साधेल. नाईलाजानें कृष्णाज्ञेनें साऱ्या जन्मांत, एवढेच स्पष्ट खोटें नसले, तरी त्याहून वेळीं अधिक अनर्थकारक, असें दुटप्पी भाषण धर्मानें केलें. द्रोणाला अश्वत्थामा पडला असें कळतांच तो धर्माकडे खरें कायतें समजून घेण्यासाठीं आला. धर्मानें "नरो वा... " पर्यंत सांगतांच कृष्णयोजनेनें प्रचंड वाद्यें गजर होऊन, पुढचे "कुंजरोवा हे शब्द गुरुद्रोणाला ऐकूच गेले नाहींत. चिरंजीव असलेल्या अश्वत्थाम्याच्या मरणा संबंधी खरी हकीगत अनुमानानें ठाम समजून घेण्यामाठीं, द्रोण

नारदासह सप्त ऋषींनीं द्रोणाला दर्शन देऊन, केवळ दुष्ट-संगामुळें राजहिंसा करण्यास प्रवृत्त झालेल्या तपोनिधि द्रोणाला माग फिरून, खऱ्या सुस्वरूपीं विश्वास घेण्यास सुचविलें. द्रोणानेंही मृत्युलोकाचें मायामय लटके पाश आणि व्याप सोडून, ब्रह्मपदीं लीन होण्यासाठीं प्राण आकर्षण करून घेतले. इकडे धृष्टद्युम्नाला तेवढीच संधि मिळाली. त्यानें समाधिमग्न द्रोणाच्या जडदेहाचे शिर तरवारीनें कापून कृतार्थता मानली. द्रौपदीच्या बापाशीं वैर पडलेल्या द्रोणाची अशी अखेर झाली.

भारतीय युद्धाचे भीष्माचे दहा व द्रोणाचे पांच मिळून पृथ्वीतलावरील वीर्यशालीचे पंधरा दिवस संपले. मग दुर्योधनानें कर्णाला सेनापती केलें. भीमाची दुःशासनाशीं गांठ पडली. मग दोघांचें चुरशीचें तुमुल युद्ध झालें. दुःशासन भीमाच्या तावडींत सांपडला. तत्क्षणीं भीमानें दिग्गजाच्या कानठळ्या बसण्यासारखी प्रलय हाक दिली. त्याबरोबर दोन्हीं दळें भारल्या सारखीं सुंदपणें स्तिमित झालीं. दुःशासनाला मूर्च्छा आली. त्याच्या छातीवर गदा टेकून भीम अवसानानें उभा राहिला. त्यानें दुःशासनाला वारा घालून सावध केलें. त्याला पूर्वकर्माची आठवण देऊन भीमानें म्हटलें, "चांडाळा, कर्मनिष्ठा, बोल कोणत्या हातानें द्रौपदीचे केश धरलेस." दुःशासनानें धिटाईच्या कुर्ऱ्यांत डावा हात पुढें केला. तत्क्षणीं तो हात भीमानें समूळ उपटून काढला. त्या उपटल्या हाताखालींच दुःशासनाला हृदयावर भीमानें संतापावेषांत बेदम सडकून काढलें. नंतर त्यानें तरवारीनें त्याचा कंठनाळ सोडविला. तेथून कढत रक्ताचे पाट वाहूं लागले. अघोरकर्मी भीमानें त्या रक्ताची ओंजळ भरून घेतली. जयश्रीच्या भरांत प्रतिज्ञापूर्तीसाठीं, सर्वांदेखत त्यानें बोलल्याप्रमाणें द्रौपदीची विटंबना करणाऱ्या दुष्मानाचें रक्तपान केलें ! सर्वांगाला त्याच रक्ताची भयानक उटी माखून घेतली ! विजयाचा मद चढलेल्या व रणांगणीं थयथयं नाचणाऱ्या त्या परम भयंकर रणभैरव भीमाकडे तेव्हां नुसतें पहाण्याचीही कोणाला छाती होईना. कौरवाकडे पाहून तो उद्गारला "वनवासाला जातांना 'गायरे गाय !' म्हणून हेटाळलेला हाच द्रौपदीपती भीम, वडिलांच्या पुण्याईनें आणि भगवंताच्या आशिर्वादानें तुमच्या छातीवर, विजयानंदानें

नाचून तुमच्या नरडीचे आज घोट घेत आहे, याला डोळे भरून पहा, आणि अन्यायाचे छळ व अन्यायाचें बळ, यांचें कौतुक करून, ईश्वरी करणीचे धन्यवाद माना " मग तो अर्जुनाच्या रथाकडे पाहून गर्जून ह्मणाला, " हे पार्थसारथी भगवंता, द्रौपदीचे केश धरून तिचा अपमान करणाऱ्या नराधम दुःशासनाला प्रतिज्ञेप्रमाणें, देहदंडाची अंतिम शिक्षा लावण्यास याक्षणीं मी तुझ्या कृपेनें समर्थ झालों आहें. दुःशासनाच्या रक्तानें भरलेल्या या हातानें, अवमानित काळापासून आजवर मोकळ्या असलेल्या, द्रौपदीच्या केशकलापाची वेणी घालून, हा भीम, यदुराया, तुझ्याच प्रसादानें खचीत धन्य झाला ह्मणून समजण्यास कोणती हरकत ? तुझ्याच इच्छेनें दुर्योधनाची मांडी फोडण्याची माझी दुसरीही प्रतिज्ञा लौकरच सत्यत्व पावेल, असा मला भरंवसा आहे. " असें ह्मणून भीमानें कृष्णनामाचा जयघोष केला.

कौरव कैवारानें कर्णवीरानें दोनच दिवस आपले सेनाधिपत्य गाजवून पांडवांना पुष्कळ जर्जर केलें. पण शेवटीं ब्रम्हशाप त्याला ऐन वेळीं भोंवला. पृथ्वीनें त्याच्या रथाचें चाक गिळलें, व त्याला प्रसंगीं शिकलेली युद्धविद्या आठवेना. अशा आपत्काळीं त्याला धर्मनीति मात्र आठवली. तेव्हां श्रीकृष्णानें विचारलें, " कर्णा, आतां तुला धर्माधम विचार आठवतात. पण कपटद्यूत खेळून, माझी मायबहीण द्रौपदी भरसभेंत नेली, तेव्हां ही न्यायनीति कोठें गेली होती? विषप्रयोग, लाक्षासदन, दहन, घोषयात्रा मिष, अशा अनेक वेळीं तुझी वागणूक, अगदीं धर्मसमतच होती नव्हे ! एकट्या अभिमन्यूवर साऱ्या जणांनीं मिळून हत्यार चालविलेंत, तेव्हां अधर्माची कल्पना देखील तुला शिवली नाहीं ! मस्तीनें भुललेल्या वृत्तींत तुला धर्म आठवला नाहीं ! पण भर सभेंत वस्त्रें फेडून तुम्हीं द्रौपदी-नव्हे-देवकी गांजली आहे, हें मी विसरलों नाहीं. कर्णा, आपल्या हातानें लावलेल्या या विषवृक्षाचीं फळें तुझीं तुलाच चाखलीं पाहिजेत. तुझ्या दुष्टांचा निःपात, करून मी धर्मावर राजछत्र धरीन हें लक्षांत ठेव. सत्तानीतीशीं सत्तानीतीनेंच वागलें पाहिजे. बरा सांपडला आहेस. अर्जुना, पाहतोस काय ? याच वेळीं हा रणझुंझार तुला आवरला तर आवरेल." अर्जुनानें शिवदत्त बाणानें कर्णवध केला.

उदार कर्णाची प्राणज्योति तेजस्वी सूर्य नारायणाशीं मिळून गेली. कर्णामागून अर्धाच दिवस माद्रीबंधु शल्यानें सेनापतित्व केलें. पराक्रम करून धर्मराजानें त्याला मोक्षसदनीं बोलाविलें. शेवटीं अर्धा दिवस खुद्द दुर्योधनाचें भीमसेनाशीं गदायुद्ध होऊन, मर्मावर वर्म काढून, एकमेक बरोबरीनें झुंजलें. व मग द्रौपदीला उघडी करून दाखविलेली मांडी व भीमानें गदेच्या टोल्यानें फोडून टाकली ! दुर्योधन रणांगणीं पडला. भारतीय युद्धाचे ह्मणजे मृत्यूच्या भरतीचे आठरा दिवस पुरे झाले.

# प्रकरण २१ वें.

## छापा.

कौरवांचें अकरा अक्षौहिणी दळ पार आटून गेलें. फक्त कृतकर्मा, कृपाचार्य, व अश्वत्थामा एवढे तीनच इसम जिवंत उरले. दुर्योधनाची दुर्दशा पाहून, त्या तिघांना अत्यंत वाईट वाटलें. केशर कस्तुरीचें तिलक धारण करणारा राजेश्वर दुर्योधन, रणांगणीं धुळींत, प्राण व्याकूळ होऊन पडला होता. ज्याच्या सेवेला अनेक भूपती तिष्ठत असावयाचे, त्याच्या भोंवतालून घारी, गिधाडें, कोल्हीं, कुत्रीं आणि भयंकर पिशाचें त्याच्या शरीरांतील मासाच्या वाटणीसाठीं, जिभल्या चाटीत टौंकारून प्राणोत्क्रमणाची वाट न पाहण्या इतक्या उतावळीनें राजदेहाशीं भिलगून क्षणैक तिष्ठित व्हावीं, हें कसल्या दुष्कृतीचें कडू फळ? हा पापाचा झाडा घेणारा दुर्धर प्रसंग, खोट्या स्वार्थासाठीं, बंधुद्रोह, देशद्रोह, मित्रद्रोह आत्मद्रोह आप्तद्रोह म्हणजेच ईशद्रोह जोडून सत्तेच्या धुंधींत साध्वि छळानें सतीत्वाच्या दिव्य अग्नीशीं वंशवन जाळण्याचा नसता खेळ खेळून, महान् पतिव्रता द्रौपदीच्या तळतळलेल्या शुद्ध आत्म्याचा शाप वचनानेंच प्राप्त झालेला होता, इतके समजण्या पुरता मनाचा सरळपणा, दुर्योधनाच्या निसर्ग वक्रवृत्तींत शक्यच नव्हता. अजून अन्यायच झाला आहे असें तो म्हणत होता. अद्यापही पांडवांचा सूड घेण्याची त्याची दुष्ट इच्छा बलवत्तर होती त्याच्या अंतकालाच्या इच्छेची पूर्तता करण्यासाठीं, गुरु पुत्र अश्वत्थाम्यानें पांडव आणि पांचाल ( शिखंडी व धृष्टद्युम्न ) यांचा नाश करण्याची प्रतिज्ञा दुर्योधनापुढें भोगली. यामुळें मरणसमयीं एक प्रकारचें समाधानच वाटलें, व तो अश्वत्थाम्याची अघोर कृति पाहण्यासाठीं कंठीं प्राण धरून, तसाच आरंबळत पडून राहिला.

पांडवदळ अद्याप अनेक मोठमोठ्या वीरांसह कितीतरी शिल्लक उरलें होतें. त्यांच्या शिबिरांतून जयाच्या आनंदानें हसण्या खिदळण्याचा अजस्र मनाचा स्वैरधिंगाणा चालला होता. तेथें अश्वत्थाम्याचा प्रवेश होईना.

ते तिघे चिंताक्रांत होऊन, दूर एका प्रचंड वटवृक्षाखालीं, अपरात्र होई पर्यंत, विचार करीत पडले होते. इतक्यांत एका दिवाभीतानें गुपचुप चोराप्रमाणें येऊन झाडावर राहिलेल्या हजारों कावळ्यांच्या निजल्या जागींच भराभर मुंड्या मुरगळून टाकल्या; व पुरुषार्थानें तें दिवाभीत त्या झाडावरून फडफडत अन्यत्र उडून गेलें. ही घुबडाची कृति गुरुपुत्रानें लक्षपूर्वक पाहिली होती स्वारी उठली. घुबडच आपला गुरू, असें म्हणून त्याच्या प्रमाणें निजल्याजागींच पांडवसेना, पांडव व पांचाळ यांचा घात करण्याचा बेत कायम झाला. कृतवर्मा व कृपाचार्य यांना ही गोष्ट मानवली नाहीं. पण द्रोणपुत्राचा झालेला निश्चय ढळेना. त्याच पाउलीं तो तातडीनें पांडवदळाकडे वळला. त्याच्यामागें दुसरे दोघे रेंगाळतच होते.

जिकडे तिकडे सामसूम काळोख म्हणजे सृष्टीला सर्वांनीं गडद काजळ मारवल्याप्रमाणें निबिड दाटला होता. पण तेथें सैन्याच्या तळाच्या आवाराच्या दारांत, रक्षणार्थ बळी देऊन, महारुद्र दैवत पांडवांनीं स्थापिलें होतें. तें अश्वत्थाम्याला आंत जाऊं देईना. त्या द्वारपाल रुद्राच्या जटा अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. कालमुख विक्राळपणें पसरलें होतें. पिंगट वर्ण शरीरावर भस्माचे पट्टे ओढले होते शेंदराच्या गंगाप्रवाहासारखी लळलळीत लांब जिव्हा लोंबत होती. त्रिशूलादि तीव्र हत्यारें हातीं चमकत होतीं डोळ्यांतून जणुं अग्नि ओतत होता. पृथ्वीपति दुर्योधनासाठीं कीं ज्याचा मुकुट भीमानें, दुर्योधन मांडी शतचूर्ण होऊन पडल्यावरही, उन्मत्तपणें अवमानिला होता, आणि द्रोणाचार्यासारख्या पूज्य पित्यासाठीं कीं ज्याचा, पांचाल धृष्टद्युम्नानें अन्यायानें ध्यानस्थ वृत्तींत टाळा सोडविला होता, अश्वत्थामा वीर, कसलेंही अघटित साहस करून, निधडेपणानें वैऱ्यांचें उट्टें घेण्यास अविचारानें अगदीं आतुर झाला होता. त्यानें त्या रुद्रदेवतेवर मोठ्या छातीनें बाण, शस्त्रअस्त्रें शक्ती, गदा वगैरेचा बांभरल्या वृत्तींत प्रयोग केला, पण तें महाभयंकर दैवत, सारेंच गट्ट करून, पुन्हा आवासून, जिभल्या चाटीतच राहिलें. मग अश्वत्थाम्यानें त्या दैवताची यथाविधि पूजा करून, होमद्रव-

नाच्या लाचलुचपतीने काम भागेना, तेव्हां होमकुंडांत स्वतःचा बळी देण्यास सिद्ध होऊन, त्यानें तें उग्र दैवत अनुकूल करून घेतलें. रुद्रदेव प्रसन्न झाला. त्यानें एक कृतांताच्या जिव्हेसारखी तीव्र धारेची विजयी तरवार गुरुपुत्राला देऊन, "या शस्त्रापुढें कोणीही टिकणार नाहीं, तूं मनसोक्त संहार कर" असें सांगितलें. मग आंत जाण्यास अश्वत्थाम्यास वाट मिळाली. त्यानें दाराशींच कृतवर्मा व कृपाचार्य यांना उभे करून बाहेर पळेल त्याला तेथच्या तेथच्या तेथें, कोण काय न पाहतां, कापून टाकण्यास सांगून सुरु केलेल्या उलूक वृत्तींत, आपण निद्रित सैन्य कापीत सुटला.

आधीं पांचाल जागे करून, त्यानें ठार केलें. मग द्रौपदी पुत्र प्रती पंच पांडव, अशा वेळीं ही शौर्यानें दोन हात करण्यास तयार झाले असतां. त्या काल जिव्हेने कापून टाकले. धान्याची कणसें खुडाव्या प्रमाणें त्या ब्राह्मण खाटकानें चराचर माणुस नी माणूस छाटून टाकण्यास कमी केलें नाहीं. पाच पांडव, सहावा कृष्ण व सातवा सात्यकी हे सप्तऋषी कृष्ण योजनेनें त्या रात्रीं कांहीं एकांत विचारासाठीं ह्मणून, अन्यत्र गेल्यामुळें अश्वत्थाम्याच्या तडाक्यांत मुळींच सापडलें नाहींत बेफामपणें हत्ती मोकळे सुटले. त्यांच्या तुडविण्यानें एकच कर्दम होऊन गेला. कोणी, कोणास ओळखेना शत्रू ह्मणून एकमेकासही सैडकीं आपसांत मारीत सुटली. काल्पनातीत संहारानें रक्तगंगा भेसूरपणें वाहूं लागल्या. मग गुरुपुत्रानें शिबिरें पेटवून दिलीं. त्या भयाण उजेडानें उजाड देखावा. त्या रक्तमांसाच्या थिलथिलींत ताज्या चिखलांत अंगावर थरारून काटा काढून, मूर्च्छागत करण्या सारखा अत्यंत भयंकर दिसत होता. चुकले माकले पळून जाणार माणूस दारांतल्या जोडीनें चिरून टाकले. एवंच भारतीय युद्धावर किळसवाणा कळस चढविणारा हा आश्वत्थाम्याचा अमानुष छापा ह्मणज क्रौर्याचा कडेलोट होय. पण या सैतानाला लाजविणाऱ्या कृतीमुळें दुर्योधनानें मात्र द्रोण पुत्राच्या विलक्षण कर्तृत्वाबद्दल समाधान व्यक्त करूनच, पांडवाकडचे पांडव जिवंत सुटल्याच्या दुःखंवनाला ओळ काढून प्राण सोडला. भगवंताच्या इच्छेनें छाप्यांत न सापडलेले कृष्ण सात्यकीसह पंचपांडव हे सात व कौरवांकडचे द्रोण पुत्रादी ते तीन. असे

फक्त दहाजणच, सात आणि अकरा मिळून अठरा अक्षौहिणी सैन्यांतून जिवंत राहून भूमीतल कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर निर्वैर होऊन गेलें ! पांचालीचे बाप भाऊ, सोयरेधायरे सर्व जाऊन, प्रपंच यात्रेचे साफल्य करणारे पुत्रसुखही तिच्या नशीवीं या अश्वत्थाम्याच्या कत्तलीनें उरूं दिलें नाहीं. याबद्दल फुकट वाईट वाटून घेण्यापेक्षां कृष्ण कृपेनें छाप्यातून तिचं साभाग्य सुरक्षित संभाळल्याबद्दल, व तिच्या कैवाऱ्यानें दुष्टांचा नाश झाल्याबद्दल, उपकारभरित आनंद मानून कृष्णचरणीं सादर राहण्यांतच द्रौपदीनें आत्म समाधान करून घेतलें.

व्यवहार दृष्टीनें द्रौपदी व सुभद्रा पुत्र शोकानें दुःखविकल होणें अपरिहार्य होतें. अभिमन्यूच्या मरणानें उत्तरा देवीच्या नशीबाव वैधव्याचा घाला पडल्या बद्दलचे दुःखतर अनिर्वचनीयच होतें. परंतु अभिमन्यूवीर शौर्यशाली पौरुषेय मरणानें तरी रणांगणीं लढतां लढतां पतन पावला होता, एवढो तरी समाधानाला जागा होती. द्रौपदीचे पराक्रमी पंच पुत्र मात्र निजल्या जागींच गुपित घाल्याला बळी पडल्यामुळें, मेल्या मरणानेंच नाहींसे झाले, या बद्दलच वीर मातांना मनस्वी वाईट वाटलें. असलें अनुचित नष्ट कर्म आचरणाऱ्या गुरुपुत्राला आत्यंतिक शासन करण्यास, द्रौपदीनें आग्रहपूर्वक सांगितल्यावर नरनारायण त्याच उद्योगास लागले. वास्तवीक समरधीर द्रोण पुत्र हा एक शूर आणि उदार योद्धा होता. पण पूर्व कर्माच्या फलांकित दुष्ट संगानें भल त्याच भरी भरून, अनन्वित कृति कर्मानें घसरल्यामुळें खाणाऱ्या मनाच्या जाचणुकीनेंच शौर्य हानी होऊन, वृत्तीचा दुबळेपणा अश्वत्थाम्याच्या ठिकाणीं सहजीं जडला होता. येरवीं पांडवाना पाहून, भीतीनें त्याची गाळण उडण्याचे अगर व्यास महामुनींच्या पाठीशीं दडण्याचे त्याला कारणच नव्हतें. द्रोणाचार्यांनीं त्याला निर्वाणीच्या प्रसंगीं आत्म संरक्षणार्थ ब्रह्मास्त्र देऊन ठेविलें होतें. त्याचा उपयोग करून आत्मरक्षण करण्याची त्याला कुबुद्धी झाली. पांडवांचा निर्वंश संकल्पून यथा विधि दर्भाग्र मंत्रून सोडतांच सृष्टि थरारली. अर्जुनानेंही त्यावर आपले ब्रह्मास्त्र सोडल्यावर त्या दोन्ही अस्त्रें गगनांत एक होऊन, चंद्र सूर्य झाकोळले. प्रलय विज सारखीं अस्त्रें कडाडली, ब्रह्मांड तडाडलें, सप्तसमुद्र उफाणीनें कडकडले, जलचर तडफडले, सप्तपाताळ हडबडले, मेरुमांदार थडथडले आणि प्राण भीतीनें अखिल जाव गडबडले.

सृष्टीच्या सुरक्षिततेसाठीं व्यासांनीं अस्त्रें आवरण्यास आज्ञा केली. अर्जुनानें आपलें ब्रह्मास्त्र आवरून घेतलें, पण द्रोणाचें अस्त्र त्यांचे त्यालाच आवरेना. तें अनर्थ करीत सुटलें. द्रोण पुत्र ह्मणाला, " माझा सदाचार सुटला. मी पापमती दुरात्मा झाल्यामुळें अस्त्र मला आकळत नाहीं. तें संकल्पित कार्य करून, पांडव वंश खंडनासाठीं गर्भही छेदील." यावर श्रीकृष्ण ह्मणाला, " वंश छेद करण्यासाठीं बालहत्या जोडणारा तूं दुराचारी तीन हजार वर्षे पिशाच्च होऊन भटकशील. तुला गलित कुष्ठ भरेल. सर्वांगीं पू रक्त वाहून, तूं दारुण क्लेश भोगशील. तुला कर्म भ्रष्टाला एक ठाव ठिकाण मिळणार नाहीं. सज्जनाचें तुला दर्शनही होणार नाहीं. दिव्यापोटीं जसें काजळ तसा देदीप्यमान द्रोणगुरु पोटीं तूं कुलांगार जन्माला आलास. " अर्जुनानें बाण सोडून अश्वत्थाम्याच्या डोक्यांतला त्याचा तेज मणी काढून घेतला. मग चिरंजीव गुरुपुत्र मेल्याहून मेला होऊन त्याच्या डोकीच्या चिरंजिव जखमेंतून दुर्गंधी पू रक्ताची चिरंजिव घाण वाहूं लागून, अखंड दैन्यवाणा महापिशाच्च बनून तो उत्तर दिशेकडे रडत गेला. '

स्वमंतक मण्यासारखा तो दिव्य द्रौणी मणी अर्जुनानें याज्ञसेनीला दिला. हातीं चाप न धरणाऱ्या आणि चिरंजीव असलेल्या द्रोण पुत्राला दिलेली शिक्षा मरणाहूनही कडक आहे, असें तिचें समाधान केल्यावर द्रौपदीनें तो मणी धर्मरायाला दिला—धर्माच्या मुकुटांत तो मणी चंद्रासारखा झळकूं लागला. युद्धाअंतीं उत्तरेला दिव्य पुत्र होईल. असा वर होता. तिच्या गर्भाचें आश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून श्रीकृष्णानें सूक्ष्मरूप घेऊन संरक्षण केलें. अस्त्रशक्ति गदा प्रहरानें पार वितळून टाकली. पुढें यथाकालीं उत्तरा प्रसूत होऊन आजानुबाहु परीक्षिती जन्मास आला. गर्भांत "पाहिलेल्या हरिरूपीं त्याचा हेतु जडल्यामुळें तो बाळ जन्मल्यावर, प्रत्येकाला न्याहाळून पाहिलेला. तो हा हरि नव्हे असें परीक्षित होता. ह्मणूनच त्याचें नांव परीक्षित. हाच पांडवांचा उरलेला वंश दीप होय.

# प्रकरण २२ वें

## भेटी.

पुत्रहितार्थ नीतिदृष्टीनेंही लोभाविष्टपणें अंधच झालेल्या दृष्टिहीन धृत-राष्ट्रांवर तर, कौरवांच्या मरणानें दुःखाचे पर्वतच कोसळल्यासारखे झाले होते. अंधळ्याला मायेच्या सत्तेची काठी नाहींशी झाली. धृतराष्ट्राला पांडव फार पूज्यतेनें आणि खऱ्या कळकळीनें प्रथम पासूनच मान देत खरे, पण अंधाचें मन आंतून शुद्ध नसल्यामुळें, त्याला आतां पांडवांवरच विसंबून राहण्याचें संकट झालें होतें. त्याच्या शोकाकुल वृत्तींत, संजय, विदूर, व श्रीव्यास यांनीं त्याच्या सांत्वनार्थ मायामय लटक्या जगद्-व्यवहाराची खरी कल्पना आणून, दुःखभार कमी करण्याचा पुष्कळ यत्न केला. " पांडवाकडे काडीचाही अपराध नसून कौरवानींच आपल्या हातानें आपल्या पापमूळ दुष्कृतीमुळें आपल्या पायावर कुलक्षयाची कुऱ्हाड मारून घेतली. यांत पांडवाचा काडीइतकाही दोष नाहीं. पांडव हे कांहीं अंधाला वास्तवीक परके नव्हेत. तेव्हां त्यांनाच जवळ करून राहिलेली आयु-मर्यादा हरिभजनांत घालवून चित्तशांति जोडावी, व उरलेल्या जन्माचें खरें सार्थक करण्यासही चुकूं नये " असा व्यासानीं उपदेश केला. पांडव खरोखरच निर्दोषी आहेत त्यांची वासना केव्हांही खोटी नव्हती, याबद्दल अंधाचें मनांतलें मनही साक्ष देतच होतें. प्रेमानें पांडव जवळ केले. धर्माला तो कडकडून भेटला, भीमही भेटण्यास पुढें सरणार, तोंच कृष्णानें त्याला खुणेनें थांबवलें. मुद्दाम तयार करवलेली अत्यंत मजबूत अशी लोखंडाची भीमाएवढी भीममूर्ति वस्त्राभरणांनीं मंडित करून सज्जच ठेवली होती. तो लोहभीम खरा भीम म्हणून अंधाला भेटण्यास पुढें केला. धृतराष्ट्र अंधत्वानेंच पंगु झाला होता. एरवीं नवसहस्र नागाचें बळ त्याच्या अंगीं होतें. दुष्टबुद्धि दुर्योधनाचाच बाप धृतराष्ट्र आपले सारे पुत्र मारणाऱ्या भीमाविषयीं त्यानें मनांत द्वेष धरला होता. लोहभीमाला अंधत्वानें खरा भीम समजून, त्याला रगडून पार पीठ करण्याच्या मत्सरी हेतूनेंच. अंध त्या कृत्रिम भीमाला कडकडून भेटला. त्याबरोबर त्या लोह-

भीमाचा नुसता चूर होऊन गेला! क्रोधावेशांत सर्वशक्ती, भीम-मर्दनासाठीं, एकवटण्याच्या श्रमानें, तोंडावाटे रक्त येऊन धृतराष्ट्र मूर्च्छित पडला.

मग तो आपणच कपाळावर हात मारून म्हणतो, "कसला मी कर्म चांडाळ! पुत्रदुःखानें राग अनावार होऊन, मी भीमसेन रगडून मारला. जळो हा माझा कोप आणि आग लागो या खुनशी तामस वृत्तीला! तिनेंच तर घर बुडविलें!" या वतावणीवर श्रीकृष्ण म्हणाला, "आपल्या हातून असें होईलच असें आगाऊ अजमावून मी खरा भीम पुढें न करतां लोहभीमच आपल्या भेटीस पुढें केला होता. खरा भीम जिवंत आहे. आपण शोक करूं नये." तेव्हां अंधानें समाधानाचा आविर्भाव आणला. पण पुढें धृतराष्ट्राला मोकळ्या मनानें पांडव भेटले नाहींत. विश्वास उडाल्यावर पत बुडते मग श्रीकृष्ण ज्ञानांजन घालण्याच्या हेतूनें म्हणाला, "धृतराष्ट्रा, तुला मी पूर्वीं किती तऱ्हेनें हितकर अशा नीतीच्या गोष्टी सांगितल्या! पण त्या तूं मुळींच ऐकल्या नाहींस. आपल्या हातूनच अगणित अन्याय होऊन, दुसऱ्यालाच वृथा दोष देत देत, कांगावखोरपणा केल्यानें सत्य दडतें काय? तुमचे अन्याय मी पोटांत किती घालावे याचा कांहीं सुमार? द्रौपदी दरदरा ओढीत सभेंत आणली, तेव्हां तुला मनांतून संतोष वाटला नाहीं काय? मुलं एकत नाहींत, या ढोंगाखाली स्वहितमनोरथ दवडण्यांत दवडण्यात काय होशील? मृगघात करूं सजलेल्या पारध्याला कडकडून सर्पदंश झाल्यास, साप चावल्याचा तेवढा बोभाटा! पण स्वतःच्या घातकी बुद्धीचा कोणीं मनापासून डंका केला आहे? खाटकानें गाय कापतांना, चुकून आपलें बोट तोडून घेतल्यामुळेंच अनर्थपात आक्रोश करण्यासारखाच तुझा हा कष्ट शोक आहे! तुझ्या पुत्राचे दारुण दोष दिसत नाहीत, आणि मत्सर विषानें ग्रस्त होऊन, मुद्दाम भीम मारण्यास मात्र तूं प्रवृत्त झालास, हे लोहभीमाच्या चुर्यावरूनच दिसत आहे. वरती पुन्हा निळाजरी संपादणी कायमच! वृंदावन फळ जसें जसें जास्त पिकतें, तसें तसें तें अधिकच कडू होत जातें. कोरफड माजली म्हणजे विशेषच घाणते. तसा तूं जो जो अधीक वृद्ध होतोस तों तों प्रौढत्वहीन अज्ञान तुला ग्रासून बसतें! व्यवस्था जोडणारा श्रीव्यासाचा अमृतमय उपदेश, त्याला

अभाग्याला काय होय ? तुझ्या कर्मानेंच तुझ्या नशिबी हाय हाय ! " अंध गप्प बसला. श्रीकृष्ण कृपेनेंच आज भीम वाचला-नव्हे-नवा भीम जन्मास आला, असें वाटून पांडवांनीं व द्रौपदीनें गहिंवरून कृतज्ञपूर्ण दृष्टीनें हरिरूप न्याहाळिलें.

पुढें पांडव गांधारी मातेला भेटले. तिनें शोकपूर्ण प्रेमभरांत पांडवांना जवळ घेतलें. मग पांडव कुंती मातेला भेटले. माय लेकरांची भेट, त्यांतही ती मुलांच्या वनवासादि बिकट आपत्ती भोगून झाल्यावर, आणि पुरुषार्थी रणविजयानंतर ! तेथचें दैवी प्रेम, दैवी कृपेशिवाय बरोबर कसें कळावें ? वनवास संपवून रामलक्ष्मण परत आयोध्येला आल्यावर, जशी कौसल्या माता ब्रह्मानंदानें त्यांना भेटली, तशी कुंती माता पांडवाना मातृप्रेमाच्या उमाळ्यानें कडकडून भेटली. द्रौपदीनें गांधारी व कुंती यांचे चरण वंदून, पुत्रशोकानें धरणीवर अंग टाकलें. सुभद्राही अभिमन्यूचे पराक्रम गुण आठवून, आक्रोश करूं लागली. उत्तराही पतीसाठीं त्याच शोकसागरांत गटकळ्या खाऊं लागली. एकच आकांत उसळून गेला. साऱ्या कौरवस्त्रिया रडत आरडतच गोळा झाल्या. रणमर्दांच्या प्राणघात विशारद युद्ध चातुर्याचें हें ठरलेलें रडवें पर्यवसान पाहून, वीरांना रणधुमाळीचें नवें स्फुरण चढत असल्यास त्यांना कोणत्या कोटींत गणावें, या बद्दल कदाचित पंचाइतच पडेल ! अबलांच्या अपार शोकानें धरणी माता उकलते कीं काय, असें होऊन गेल्यावेळीं, विलाप विकाळ शोकरसानें वर्णन करणारी समर्थ लेखणीही दिपें गाळून, असमर्थपणें पुढें चालेनाशी होते ! गांधारी म्हणाली " कृष्णा, तुझी शिष्टाई विफल होऊन, तूं उपलव्याला परत गेलास, तेव्हांच मी माझ्या पुत्रांची आणि त्यांच्या दळभाराची आशा सोडून बसल्यें अखेर तुझें खरें केलेस ! ही सारी संहार कर्तांनी करविता, तूंच मूळ सूत्र चालक आहेस. त्या तुला माझा पतिव्रतेचा असा शाप आहे कीं, तुम्हां यादवांचाही कुलक्षय होईल ! " श्रीकृष्ण शांतपणें ह्मणाला, " माझ्या पिंडब्रह्मांड घडामोडींत मला तें कर्तव्यच आहे, ह्मणूनच तुला महासाध्वीला असलें शापवचन बोलण्याची बुद्धि झाली. माते, यादव संहारानें सतीचा शाप खरा करण्याचीही काळजी मलाच घेतली पाहिजे. "

कुरुक्षेत्रावर रणांगणीं एकंदर सहासष्ट कोटि वीर पडल्याचें गणित आहे. इतक्यांचें यथाक्रम उत्तरकार्यादि अंत्यविधी आटोपून घेण्याचें खेद-जनक प्राप्तकार्य शिस्तवार व्यवस्थेनें सुरू असतां कुलहीन कर्णाच्या क्रियेला वाली कोण अशाबद्दल प्रश्न निघाला. तेव्हां कुंतीमातेनें आपलें गुपित उघडें करून, कौमार्य दशेंत सूर्यवीर्यापासून, आपल्या उदरींच कर्ण अवतारल्याचें सांगितलें. यामुळें कर्ण पांडवांचाच वडील बंधू होतो. धर्माला समजतांच त्याला मनस्वी खेद झाला. हें आपल्याला पहिल्यानेंच समजतें, तर उदार कर्णाचे पाय धरून, त्याच्याच छत्रछायेनें ही वीर्य निःपाताची भयंकर आपत्ति ओढवली नसती, असें धर्मास वाटलें. कुंतीमातेनें हें सत्य आपल्या पासून लपविल्याबद्दल धर्माला—शांतिसमुद्र धर्माला—बरें वाटलें नाहीं. कर्णासाठीं तळमळत, त्यानें साऱ्या स्त्री जातीला असा शाप दिला कीं, यापुढें स्त्रियांच्या पोटांत गुजगोष्टी राहणार नाहींत. सुशीलतेनें स्वकीयांचे सद्गुण समर्थन साधण्याचा स्वभाव धर्म धर्माला तरी कसा सुटेल ? दुर्योधन दुःशासन, शकुनी व कर्ण या चांडाळ चौकडींतलाच कर्ण अत्यंत निकट अशा रक्त संबंधानें आपला कळतांच, त्याचें दानशौर्य, रणधैर्य, वचनस्थैर्य असले अद्वितीय खरे गुण, धर्मराजाला चटका लावूं लागले. अशा कर्णाला त्याच्या जिवंतपणीं मी अंतरलों याबद्दल धर्माला सारखी चुटपुट लागून राहिली. त्याला कर्णावांचून अन्य नादच नाहींसा झाला.

कुलहत्येनें प्राप्त झालेलें राज्य धर्माला नकोसें झालें. तपाचरण करूनच जन्मसार्थक्य करावें, असें त्याला वाटूं लागलें. त्याला चैन पडेना. बरें वाटेना द्रौपदीला ही एक काळजीच वाटूं लागली. पण तिचा पाठि-राखा, तिच्या हितकार्यासाठीं उभाच होता. गंगातिरीं उत्तर कार्यार्थ एक महिना घालविल्यावर अनेक ऋषींनीं धर्माची गांठ घेऊन आशीर्वाद दिले. त्याचे गुणानुवाद गाइले. राज्यासनीं बसून मग भीष्म मुखानें चित्तशांति जोडणारा धर्मोपदेश ऐकण्याची ऋषींनीं धर्माला मखारूप आज्ञा केली. मग कृष्णानें शुभ काळीं मोठ्या थाटानें सार्वभौम सिंहासनावर धर्म व द्रौपदी यांना यथ विधि राज्याभिषेक झाला या वेळीं दुर्योधन [illegible] कपट [illegible] ब्राह्मण स्वरूप धरून, चार्वाक [illegible] ता म्हणाला [illegible]

गुरुहत्या, गोत्रहत्या, मित्रहत्या, आप्तहत्या, ब्रह्महत्या, अशा असंख्य हत्यांची स्वार्थानें जोड मिळवून, हत्याशापित वृत्तीत, राज सिंहासन भ्रष्ट करण्यांत काय थोरपणा !" चार्वकाला आत्मज्ञानी ब्राह्मणाला तेव्हांच ओळखिच, व तो तेथेंच शापें करून भस्म होऊन गेला.

प्रजा संतोषित झाल्या. रणभूमीवर पतन पावलेल्यांच्या आप्तजनाची योग्य तर्तुद लागली. धर्मानें भीमाला अधिराज्य दिलें. अर्जुन सेनापति झाला. नकुल सहदेव जनहित मंत्री झाले. कृपाचार्य राजगुरु बनले. धौम्यांना आतिथ्य गुरु नेमलें. शरपंजरी भीष्म महाराजांचें कृष्णासह साऱ्यांनीं दर्शन घेतलें. तेथें कृष्णकृपेनें वैराग्य-शाली, कडक ब्रह्मचारी, भीष्मानें धर्माला रणांगणावर युद्धकर्मात हत्या दोष नाहीं असें समजावून सांगितलें, व मग राजधर्म, आपद्धर्म, दानधर्म व मोक्षधर्म विशदपणें प्रतिपादन करून, धर्माच्या चित्ताला दुर्लक्ष असें शांति-सुख दिलें. मग भिष्म देवांनीं कृष्णरूप डोळेभरून न्याहाळीत तें रूपच अक्षय हृदयांत साठवून, माघ शुद्ध अष्टमीस देह ठेवला. देवांनीं देवव्रतावर सुमन-वृष्टी केली. मोठ्या थाटानें गंगातीरीं भीष्माचें उत्तरकार्य उरकण्यांत आलें. निर्वैर अशा स्पर्धाहीन स्थितींत धर्म द्रौपदी, सार्वभौमपदीं. इतर पांडवासह आनंदानें नांदू लागली. इंद्रप्रस्थाहून विदुराच्या बोलावण्यावरून हस्तनापुरास येऊन, कर्मानुसार बुद्धि झाल्यामुळें, कृतकर्माला धर्मराज उत्कृष्ट होऊन, राजलक्ष्मीचा जो एकदां वियोग झाला, तो पुन्हा तिचा संयोग होऊन स्वकीयत्वाच्या हक्कानें पुनरपि राज्यपदाची भेट होण्यास असह्य अपमान, कष्टप्रद वनवास, दुस्तर अज्ञातवास, अनेक प्रयास, बहुविध यातायाती, असंख्य प्राणहानी, असल्या दुर्धर संकटावस्थेच्या अनर्थ परंपरेतून दिव्यतेनें पार होतां होतां, कृष्णकृपा छायेतल्या पांडवासारख्या दानतशील, उदार चरि-तांनाही पुरेवाट झालेली पाहून. देवाच्या विचित्र लीलेबद्दल कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं ?

# प्रकरण २३ वें.

## निष्कंटक व्यवहारसुख.

आपल्या राज्यपद प्राप्तीच्या आड पापराशी अमित जीवहत्या दडली असून, सहोदर कर्णाच्या बाबतींत, आपण फसवणुकीनें सर्वथा अन्यायी आहोंत, अशी जाचणुकीची जडजाणीव, धर्माच्या मनावर दडपणा सारखी बसून राहिली होती. वास्तवीक सर्व धर्मकर्मांची कैवल्यदानी फलश्रुती ह्मणजेच भगवान श्रीकृष्ण परमात्मा तो तर पांडवांच्या सद्भक्तीनें सदैव त्यांच्या अंकितच होता. तथापि धर्माची तळमळ निववून, त्याची समजूत पटण्यासाठीं हत्या निरसनार्थ अश्वमेध करण्याची सल्ला श्री व्यासांनीं दिली. परोपकाररत पांडवांना केव्हां ही धर्म कृत्याच्या समारंभाची मनापासून आवडच होती. पतिसुखाकांक्षी द्रौपदीही असल्या सत्कर्मास सदोदित अनुकुलच असे. साहाय्यकारी कृष्णानेंही अश्वमेध करण्यास अनुमोदन दिलें पण तसें करण्यांत त्या भक्तवत्सलाचा असा एक मुत्सद्दी हेतू असावा असें वाटतें कीं त्याला भक्ताच्या ठिकाणीं सत्व सिद्धीची हानि करणाऱ्या गर्वाचा यत्किंचितही प्रादुर्भाव झालेला खपत नाहीं; आणि पांडव तर भारतीय युद्धाच्या प्रचंड थोरवीचें जगतींतळावर आपल्यापेक्षां वीर्यवंत कोणी आतां उरलेंच नाहीं. अशा घमेंडीकडे नकळत झुकूं लागल्याचा कृष्णाला साधार संशय आला होता असें दिसतें, आणि म्हणूनच कदाचित् अश्वमेध निमित्तानें दिग्विजयाच्या वेळीं, पांडवांना सर्वथैव दिपविणारे भक्तिपूर्ण खरें क्षात्रतेज प्रत्यक्ष त्यांच्या प्रत्ययास आणून देऊन, त्यांना गर्वग्रहांत सावधानतेत विलीन करण्याचाच श्रीकृष्णाची धूर्त योजना असावी असें वाटल्यास अश्वमेध कथाच कारणीभूत झाली आहे. कारण या सरस कथा भागांत, एकावरएक वरचढ असे अनेक भगवद्भक्त पांडवाहून केक पटीनें बलाढ्य असे पुढें आले असून जागोजाग पांडवाचा पराजय झाला आहे; व भारतीय वीरत्वाची ओळख देऊन, पांडवांना जागृती दिली आहे. बभ्रुवाहनानें तर शौर्याची कमालच करून, रणांगणीं अर्जुनाचेंच शिर उडविलें आहे ! मान्यागोष्टी. केवळ कृष्ण

प्रसादानें पांडवांच्या अश्वमेधासाठीं, अवसानी अनुकुलतेनेंच झुकून आल्या, ही गोष्ट वेगळी. पण त्यांतील ईश्वरी वर्म मात्र पांडवांच्या गर्वाचें मर्म छेदन करण्याचेंच असावें, आणि ह्मणूनच या अश्वमेधाची हीच खरी व्यवहारी फलश्रुती आहे, असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

कौरवामागें पांडवांनीं चौपनवर्षें राज्य केलें. धृतराष्ट्र गांधारी हीं आपल्या शतपुत्र मरणानंतर अठरा वर्षें जिवंत होतीं पैकीं त्यांनीं पंधरा वर्षें पांडवगृहीं हस्तनापुरांतच काढलीं. त्यांना पुत्रविरहानें सुख पारखेंच झालें होतें. हें खरें, तरी देखील त्यांचा पांडवांच्या सांनिध्यांतला काळ, जावातसा सुखसमाधानांत गेला नाहीं. धर्म त्यांना फार जपे. वास्तवीक त्यांना कोणाच वाईट पाहात नसे पण अंधाला सर्वतोपरी संकोचच वाटे. कारण ज्याची त्याची पूर्वकृती, ज्याला त्याला मनोवृत्तीनें साधकबाधक होतच असते. शिवाय भीमाच्या दगा करण्याचा फसलेला अंधाचा यत्न, स्मरण्या भीम वर चेवर उजगरून बोलून दाखवी. अशा एहाछिद्रांच्या जाळ्यांतून सुखलेश गळून जात असल्यामुळें, समाधानास जागा उरत नसे. घरांत बायकांकडून त्याला काडीइतकाही त्रास पावत नसे. त्यांची सेवासुश्रुषा ह्याची दशीं होत असे पण तें वृद्ध अंध जोडपें सदोदित कुढत असे. अन्नत्याग करी. यामुळें सान्याच गृहसौख्यावर असमाधानाची छाया पसरूं लागे. एवंच धृतराष्ट्र गांधारी स्वःतही समाधानानें सुखी नसत, व त्यांच्या या वृत्तीमुळे घरांतही कोणाला वस्तुत सुख होत नसे. पुढें तीं दोघें, कुंती माता, व विदुर तप आचरण्यासाठीं वनांतरी गेलीं. पांडवांना दुःख झालें. कांहीं काळानें पांडवही सहपरिवारासह वडिलांच्या भेटीस नागरिकजनासुद्धां वनीं गेले विदुर हरिरूपी लीन होऊन देहभान विसरला होता असे, अंध, गांधारी व कुंती ही तापसी वृत्तींत परमकृश झाली होती. द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा वगैरे वडिलाकडील बायकामंडळी व सान्या कौरव स्त्रिया, गांधारी कुंतीला भेटल्या व्यास दर्शन आले. त्यांनीं धृतराष्ट्राला वृत्तीची शुद्धता झाली कीं नाहीं, असें विचारून, कांहीं विशेष इच्छा असल्यास पुरवीन, असें सांगितलें यावर पांडवपुत्रांची व आपल्या शतपुत्रांची, कैवान्या मृतवीरांची, व एकंदरींत समरांगणी पडलेल्या या सान्या भारतीय योद्ध्यांचीं दर्शनें घडल्यास समाधान होईल, असें

म्हटलें. व्यासांनीं गंगेंत बुडी मारून, तीरावर एक रात्र भारतीय युद्धाचा सारा चमत्कार दाखविला. व्यास कृपेनें अंध व गांधारी यांनीं तो चमत्कार प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला. सर्व्यानाच आपआपले जिवलग जिव्हाळे पाहून अचंबा वाटला. धर्मानें कर्णाला वडील बंधू म्हणुन भेटण्यास कमी केलें नाहीं. रात्र संपतांच हें स्वप्नही संपून नाहींसें झालें. व्यासाज्ञेनें कौरव स्त्रियांनीं गंगा प्रवेश करून, त्या परलोकीं आपआपल्या पतीला जाऊन मिळाल्या. व्यासांनीं धृतराष्ट्राला सांगितलें कीं हें जसें भारतीय युद्धाचें चुटकीचें स्वप्न पाहिलेंस, अशाच तऱ्हेची थोडी जास्त लांबीचीं स्वप्नें, म्हणजेच इहलोकाची यात्रा होय, हें जाणूनच आत्मरूपीं सावधान राहा.

स्त्रियांसह पांडव हस्तनापुरास परत गेले. इकडे धृतराष्ट्र, गांधारी व कुंती अगदीं थकत चालली होतीं. तीं एकदां गंगेहून स्नान करून आश्रमास परत येत असतां वनांत भयंकर वणवा पेटला. त्यांत तीं तिघें सांपडण्याच्या वेळींच प्राण निरोधन करून, ईश्वरस्मरणांतच नाशिवंत देहाचा त्याग केला. अग्निनारायणानें त्यांचीं जर्जर शरीरें जाळून टाकलीं. ही हकीकत नारदांनी हस्तनापुरी धर्मसभेंत सांगतांच एकच आकांत झाला. मातेहून द्रौपदीला अधिक प्रिय असलेली सासू कुंती परत्र पावलेली कळतांच, तिच्या दुःखास पारावारच उरला नाहीं. पांडवांनी मृतांच्या उत्तर क्रिया, गंगातीरीं यथा-विधी श्रद्धापूर्वक संपादल्यावर, जड अंतःकरणांनींच ते परत राजधानीस आले. वडीलधाऱ्या माणसाचे संरक्षक विश्रांति छत्र नाहींसें झाल्यानें पांड-वापेक्षां कोंवळ्या मनाच्या गृहिणीपद भूषण द्रौपदीलाच घडोघडी, अहल्या-सारखें होई. तिला निष्कंटक व्यवहार सुख निरस वाटे. पण विश्वभक्षक काळाच्या पोटांत क्रमाक्रमानें सारेंच पचले जाणार असल्यामुळें कालच-क्राच्या फेऱ्यांत, येईल तो दिवस, आसक्त जागृतीनें, आला तसा संपादन नेला पाहिजे. हे सुजाण द्रौपदीला पुरें ठाऊक होतें. यामुळे मृतांच्या आठ-वणीनें, स्वतः दुःखी होऊन, पतींना दुःखी करण्याचा अविचार, सहसा तिच्या हातून घडत नसे. कृष्णचरणीं ती अखंड विलीन वृत्तीनें सावधान असे आणि म्हणूनच कृष्णही तिच्या ठिकाणीं आत्मत्वानें सदा

ग से.

" मनमोहन श्रीरंगाला आपलासा करून घेण्यासाठीं, आह्मी अहोरात्र जिवापाड धडपड करीत असतां, वन्स, तिकडची स्वारी, आपल्याला मात्र कशी अगदीं हुकमतीनं वश असते, याचंच बाई नवल वाटतं ! आह्माला तेव्हां आपलं वशीकरणं विद्या शिकवाना ! " ही विनोदी पण मर्मज्ञ पृच्छा एकदां सत्यभामेनें द्रौपदीला केली असता, द्रौपदीनें आपल्या खऱ्या भक्ति भावाचें इंगित " भाव तोची देव " या साध्या आणि सरळ श्रद्धेतच असल्याचें सांगून, ह्मटलें, " वहिनी. माझा भाव भुकेला भाईराया कृष्ण, भक्तिवश राहण्याला कध्धीं नाहीं हो चुकायचा ! जसा भक्तीचा रंग, तसा देवाचा संग ! हा उघडा हिशेब नव्हे का ? यांत त्याला तरी कां फुकट दोष ? नी. नसल्या वशीकरणाचा कशाला जयघोष ? सुभद्रेची अशीच एक गोष्ट हरिगुण गाणाराकडून ऐकावयाला सांपडते, कृष्णभगिनी सुभद्रा हिनें एकदा कृष्णाला विचारले कीं, कृष्ण, मी तुझी सख्खी बहीण असतां, तुझें घुसल्या मानलेल्या द्रौपदी बहिणीवरच अधिक प्रेम कां असावें ? यावर दयाघन कृष्ण नुसता हंसला. तो तेव्हां हातांत चाकू घेऊन, लेखणी तासीत होता. बहिणीच्या प्रश्न कौतुकांत, हात कसा चाचरी गेला, हें खरोखर हरीच जाणे. चाकूनें कृष्णाचें बोट बरेंच कापलें गेलें, व भळभळ रक्त वाहूं लागलें. पाण्यांत चिंधी भिजवून पाणीपट्टी दिल्यानें, रक्त बंद होण्याचें काम सहज होणार होतें ह्मणून प्रेमळ बहिण सुभद्रा चिंधी आणण्यासाठीं घरांत धावली पण हरिमायेचा अगाध खेळ कोणाला कळणार ? सुभद्रेला चिंधीच सापडेना. इतक्यांत द्रौपदी तेथें सहजी आली. तें कृष्णाच्या बोटाचें रक्त पाहून, तिचा जीव कळवळला. तत्क्षणी आपल्या अंगावरल्या वस्त्राच्या पदराची चिंधी फाडून, ती पाण्यांत भिजवून, द्रौपदीनें कृष्णाचें बोट बांधलें, व मग ती त्या बांधलेल्या बोटावर थेंब थेंब पाणी सोडीत, कृष्णाशीं गोष्टी बोलत बसली. अर्जुनानें इंद्र लोकाहून आणलेल्या बहुमोल शालूचाच पदर आपण फाडला, हें कृष्णकार्याच्या भरांत द्रौपदीच्या लक्षांतही आलें नाहीं. इतक्यांत " कृष्णा, चिंधी सांपडणारे, तुझं एखादं जुनं धोतर तरी कुठं आहे तें नेमकं सांग, म्हंजे त्याची धांगोटी फाडून आणतें. तोंवर बोट दाबून धर. " असें आंतून म्हणत सुभद्राबाहेर आली पहाते तो द्रौपदीनें

आपल्या अंगावरच्या पृथ्वीमोल वस्त्राची चिंधी फाडून, कृष्णाचें काम केव्हांच होऊन गेलें आहे. सुभद्रा व द्रौपदी, या दोन वहिणींतले, कृष्णाविषयींच्या आस्थेचें अंतर दाखविणारा हा साधा प्रसंग पाहून सुभद्रादेवी उमजली. या व्यवहारी उदाहरणावरून द्रौपदीच्या ईश्वरपरायण भावनेचे शुद्धतेची कल्पना करतां येण्यासारखी आहे.

निस्सीम ईशभक्ती, अलोट पतिनिष्ठा, सत्यत्व पूर्ण आत्मश्रद्धा, दंभहीन, दानशूरता, न्याय निष्ठूर, सदयता, प्रसंगशूर, सधीरता, सशील प्रपंच कुशलता, असल्या अनेक अलौकिक सद्गुणाचें उत्कृष्ट उदाहरण घालून देणाऱ्या देवी द्रौपदीची जीवयात्रा, जिवाच्या जिव्हाळ्याच्या भारी किमतीनें, दुष्कृत विनाशानंतर, साधुच्या परित्राण काळांत, अनुरूप सार्वभौम पतिसमा[illegible] प्रपंचरंगांत, निष्कंटक व्यवहार सुरू उदासीन वृत्तींत भोगीत भोगीत, [illegible] पसे खाचखळ्गे न उरलेल्या काळ गतीच्या सरळ रस्त्यानें, अपेक्षित [illegible] आक्रम गाठीत होती; इतकें सांगून हें नवल कथा परिप्लुत पुण्यप[illegible]न चरित्र येथेंच पुरें करूं.

९९२—

REFBK-0000992

श्रीकृष्णार्पणमस्तु.